म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
सं.क्र. : 3०९
REFBK-0024570
REFBK-0024570

संदर्भ निबंध
३०९७
२४५७०
टापाल्य

REFBK-0024570

# पंचम

मंगेश
विठ्ठल
राजाध्यक्ष

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

सुपर्ण प्रकाशन,
पुणे.

प्रथमावृत्ती :
११ डिसेंबर, १९८४

प्रकाशिका :
सौ. सुनीता मिरासदार,
सुपर्ण प्रकाशन,
१५५२, चिमणबाग,
सदाशिव पेठ,
पुणे–४११ ०३०.

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

©
मंगेश
विठ्ठल
राजाध्यक्ष

मुखपृष्ठ व मांडणी :
चंद्रमोहन कुलकर्णी

मूल्य रुपये :
चौवीस रुपये

डॉ. द. कृ. सुखठणकर
यांना–
साठाव्या
वाढदिवसानिमित्त

# प्रस्तावना

या पुस्तकात संग्रहित केलेले लेख गेल्या तीस-पस्तीस वर्षांतील आहेत.
यापलीकडे या लेखांविषयी विशेष काही सांगावे,
असे नाही; अशा लेखांविषयी वेगळे
सांगण्यासारखे सहसा नसतेच. त्यांत कोठे टीका असेल,
तिची धार उतरल्यासारखी कोणाला वाटेल.
ते समजण्यासारखे आहे. पण काळाशी बांधलेल्या
अशा टीकेशिवाय या लेखांत काही आहे, असे मला वाटते.
म्हणून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा
हा खटाटोप तो अगत्याने केल्याबद्दल प्रकाशक
प्रा. वसंत मिरासदार यांचा मी ऋणी आहे.
मला आठवते, त्याप्रमाणे यांतील बहुतेक लेख लिहिले
जाण्यामागे ज्या नियतकालिकांत ते प्रसिद्ध झाले,
त्यांच्या संपादकांचा उत्साह लेखकाच्या उत्साहापेक्षा अधिक होता.
विशेष करून त्या संपादकांचा, आणि अन्य संपादकांचाही, मी ऋणी आहे.

मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष
६ डिसेंबर १९८४

# मुंबईने काय काय पाहिले ?

गेल्या काही वर्षांत या मुंबई शहराने कित्येक संस्थांची आणि व्यक्तींची शंभरी साजरी केली. संस्थांच्या जन्माची आणि व्यक्तींच्या जन्माप्रमाणे अंताचीही. यंदाच जगन्नाथ शंकरशेट यांची शंभरावी पुण्यतिथी. अव्वल इंग्रजीत या मच्छीमार बेटाचा विलक्षण कायाकल्प होऊन त्याची वैभवशाली नगरी झाली. ' मुंबई, ग, नगरी बडी बांका, जशी रावणाची दुसरी लंका– वाजतो, ग, डंका ' अशी शाहिरी तारीफ आणि ' भारतातील सर्वश्रेष्ठ नगरी ' अशी लॅटिन पदवी तिला लाभली. त्या वैभवाच्या आद्य शिल्पकारांपैकी जगन्नाथ शंकरशेट हे एक. मुंबईच्या अशाच एका गाजलेल्या संस्थेची पन्नाशी नुकतीच साजरी झाली. ती संस्था म्हणजे चौपाटीवरचे भेळवाले !

तशी मुंबईत भेळीबाबत आता चौपाटीची नवलाई राहिलेली नाही ! कोरडी नेमस्त भेळ नव्हे– ती भडभुंज्यांकडेदेखील मिळते– तर पाचां बोटांनी कालवायची आणि पाचां बोटांनी ओरपायची, ओलीचिंब आणि कमीकधिक जहाल भेळ. ती टायीटायी मिळते; अलीकडे तर अगदी कोट भागातल्या कित्येक सुखवस्तू दुकानांतूनही मिळते. ( मात्र तेथे ती बोटांऐवजी चमच्याने कालवण्याचा आणि खाण्याचा पोशाखी प्रघात आहे ! ) रंगाच्या आणि चवीच्या अनेक परी निघाल्या आहेत; जाणकारांना त्या कोठे मिळतात, ते तोंडपाठ असते. पण त्या सर्वांचे मूळपीठ चौपाटी; असे तिचे स्थानमाहात्म्य. कालपरवापर्यंत पोरेसोरे जी चोरून भक्षीत आणि पोक्त माणसे जिला चवचाल, थिल्लर म्हणून नावे ठेवीत ठेवीत

उसन्या आंबटपणाने चाखीत, ती आता खाद्यपदार्थांच्या खानदानीत सामील झाल्यासारखी आहे. थोड्याफार पारदर्शक, अद्ययावत ललना परीटघडीच्या हॉटेलांतून (कधी फूटपाथवरही) ती उजळ माथ्याने आणि नाजूकपणे खाताना आढळतात. या प्रतिष्ठेचा इतिहास चौपाटीवर घडला आहे. मुंबईच्या जीवनातल्या या आणि अशासारख्या अनेक अकल्पित बदलांची चौपाटी साक्षीदार आहे.

या पन्नास वर्षांत चौपाटीने काय काय पाहिले असेल! खुद्द तिची कळा किती पालटली! मलबार हिलवरून दक्षिण मुंबईचे छायाचित्र घेण्याची टूम जुनी आहे. जुन्या चित्रात तळाशी चौपाटीचे शुभ्र वाळवंट उठून दिसते आणि पलीकडे दक्षिण टोकापर्यंत पसरलेला खडकाळ किनारा. दूरवर कोटातील अंधूक इमले आणि झाडीची रांग. पण अलिकडच्या चित्रांत मनावर छाप पाडतो, तो मरीन ड्राइव्हचा बाकदार राजरस्ता आणि त्यावरील इमारती– आणि रात्र असल्यास त्यावरील रोशणाई. चौपाटी शोधून काढावी लागते. त्या सगळ्या पायघोळ मिजाशीच्या फ्रिकर पावलासारखी ती दिसते.

जे चौपाटीचे झाले, ते जुन्या मुंबईतील कित्येक स्थळांचे आणि भागांचे झाले. ते आता पेन्शनीत निघाल्यासारखे दिसतात.

मलबार हिल आणि खंबाला हिलवरचे उगाच उत्तुंग वाटणारे, शानदार बगीच्यांत विसावणारे ऐसपैस बंगले घ्या. ते कोणत्या लक्ष्मीपुत्राचे, की किताबधारी श्रेष्ठाचे, याची परस्थांना मुंबई दाखवायला निघालेला मुंबईकर अभिमानाच्या सुरात, पण दबल्या आवाजात माहिती देई. पण आज त्यांतील बहुतेकांची काय अवस्था झाली आहे! दहा बारा मजली गगनविहारी इमारतींच्या पायांत असले कित्येक बंगले गाडले गेले आहेत; बगीचे उद्ध्वस्त झाले. जे बंगले–बगीचे उरले आहेत, ते त्या अजस्र इमारतींच्या वळचणीला अंग चोरून, लाज सावरत उभे राहिल्यासारखे दिसतात. उद्या कोण काळा धनाढ्य जरीपुराणवाल्याच्या आविर्भावात सवाल पुकारून आपल्याला विकत घेईल आणि परवा आपली पाळेमुळे खणून काढील, याच्या भीतीने, आणि काहीशा ओशट आशेने, वाट पाहत ते दिवस कंठीत आहेत! पुन्हा ही लाखांची गोष्ट कचकड्याची वाटत असावी, कारण या एकेका बंगल्यातील स्नान–शौचगृहे आणि व्हरांडे यांच्या एकत्रित क्षेत्रफळाएवढा ज्यांचा समग्र ऐवज, अशा घरट्याला लाखापर्यंत पैका मोजावा लागतो, म्हणे; आणि या नवीन इमल्यांत दरमजल्यावर अशी चार–आठ घरटी दाटीवाटीने कोंबलेली असल्याचे उघड दिसते.

तेच अन्य ठिकाणी. कोट हा जुना साहेबी भाग– कचेऱ्यांचा आणि सार्वजनिक इमारतींचा. 'अबब' आणि उद्गारचिन्ह यांशिवाय त्याच्या भव्यतेचा पूर्वी उच्चार करीत नसत. आता नव्या साहेबांनी भव्यतेचे किती मजले त्यावर चढवावे! सचिवालयाने जुन्या सेक्रेटेरिएटला 'जिल्हा कचेरी' म्हणून 'डिग्रेड' केल्यासारखे वाटते, तरी दहा वर्षांपूर्वीपर्यंत तेथून समस्त मुंबई राज्याचा राज्यकारभार पटाईतपणे हाकला जाई! सचिवालय (गुजरात गळले, तरी) फोफावतच आहे. पण त्याला मत्सराने आक्रसल्यासारखे वाटावे,

अशी लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनची इमारत त्याच्या समोरच खिजवीत ठाकली आहे. तेच व्यापारी संस्थांचे. त्या चहूबाजूंनी फुगत आहेत. बँकांच्या तळघरांतून कडेकोट बंदोबस्तात काय काय ठेचून भरले आहे, कोण जाणे!

हिंदी क्रिकेटचे सनातन कुरुक्षेत्र म्हणजे कापाच्या मैदानावरील बॉम्बे जिमखाना. पण अठ्ठावीस वर्षांपूर्वी ब्रेबर्न स्टेडिअमचे प्रचंड धूड उभे राहिल्यापासून त्या कुरुक्षेत्रावर केवळ क्षुल्लक झगडे निकालात निघतात. बॅकबेवरील धर्मवार जिमखाने ही तेव्हाची दुय्यम तीर्थ-क्षेत्रे. आता रेल्वेचा पसारा सामावण्यासाठी ती संकोचून शाळकरी अंगणांसारखी होत आहेत.

पांडूतात्या, बंडूनाना वगैरे श्रीपाद कृष्णांचे मानसपुत्र मुंबईची रोशणाई पाहण्याला भुलेश्वर– काळबादेवीतून फिरून आले. आज ते तसे फिरू लागले, तर त्यांना पाहायला मुंबईकर जमतील!

मुंबईचे रंगस्वरूपच नव्हे, तर आकारही बदलून गेला. ती गेल्या काही वर्षांत कोठच्या कोठे सुटली. सुस्थिती मानवली. दुसऱ्या लढाईमुळे उद्योगांची आणि लोकसंख्येची स्वप्नात नाही, अशी भरभराट झाली. बेटापुरत्या आवरून असलेल्या मुंबईला साष्टीचा जोगेश्वरी ते भांडूपचा भाग जोडण्यात आला; नंतर बोरिवली–दहीसर ते मुलुंडचा भाग. अशी या बारा–तेरा वर्षांत मुंबईची बृहन्मुंबई झाली. येत्या दहा वर्षांत काय होईल, कोणी सांगावे? पण पूर्वेला पनवेल–उरणपर्यंत ती पसरेल, असे भाकित आहे. मग ठाणा–पनवेलची खाडी मध्ये; तिच्या पश्चिमेला जुनी मुंबई आणि पूर्वेला नवी मुंबई, अशा जोडशहरांची योजना सुचवली गेली आहे. ती तरी या बकासुरी भुकेला पुरी पडेल का? आजच मुंबईची वस्ती पन्नास लाखांच्या घरात आहे. पंधरा वर्षांत ती सत्तर लाखांवर जाईल, असा संख्याशास्त्रज्ञांचा होरा आहे. पन्नास वर्षांपूर्वी मुंबईची वस्ती दहा लाखांची होती (तरीही 'अबब!') आणि आता तिच्यात सामील झालेल्या उपनगरांची दीडएक लाख होती. म्हणजे सगळा मिळून साडेअकरा लाखांचा प्रपंच; तो आता पन्नासपर्यंत फुगला आहे. म्हणजे चौपटीहून अधिक. अर्थात अगोदरच भरलेल्या काटकुळ्या बेटात या फुगवटीला तेवढा वाव नव्हता; साष्टीतील उपनगरात हवा तेवढा होता. ही फुगवट मुख्यतः चाळीस सालानंतरची; लढाईचा तो पराक्रम. त्या दहा वर्षांच्या मानाने पुढच्या दहा वर्षांत कमी वाढ झाली, असे कोष्टकांचे म्हणणे. पण तो पटत नाही– अशी माणसे बुजबुजत आहेत भोवती!...

ही उपनगर वगैरे भाषाही तशी अलिकडचीच. मुंबईतून निघणाऱ्या दोन रेलमार्गांवरच्या, विशेषतः हल्लीच्या 'वेस्टर्न' रेल्वेच्या (म्हणजे तत्कालीन बी. बी. सी. आय्. च्या), नजीकच्या खेड्यांना जरा रूप आले. लोकल गाड्यांमुळे रोजगारासाठी शहरात जाता येऊ लागले. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका आत्मचरित्रात लेखकाने सांगितले आहे, की गिर-

गावात राहून अग्निमांद्य झाले, म्हणून तो विलेपार्ल्याला राहायला गेला– ते चाळीस वर्षांपूर्वी. (त्याचे अग्निमांद्य बरे झाले!) अंधेरीच्या उत्तरेला वस्ती आणखी विरळ. शनि-रविवारी तिला भरती येई. शहरातील लोक 'पार्टी'साठी तेथे जात आणि नेहमीचा संभावितपणा बाजूला ठेवून थोडाफार उनाडपणा करीत. त्या गावातले बरेचसे बंगले इतर दिवशी सहसा रिकामेच असत.

पुढे शहरात नीट मावेना, म्हणून तेथील वस्ती येथे सांडू लागली. बंगल्यात बारमाही वावर चालू झाला. बाजारहाटांच्या सोयी वाढल्या आणि त्या गावांची उपनगरे झाली. गेल्या दहा–पंधरा वर्षांत तर मोठमोठे कारखाने या भागात निघाल्यामुळे त्या बहुतेक माजी उपनगरांची बकाल शहरे बनून गेली आहेत. बकालपणाचा मक्ता जुन्या मुंबईकडे राहिला नाही.

पण जुनी मुंबई म्हणजे सगळे बेट नव्हे. तीस–पस्तीस सालापर्यंत उत्तरेकडचे अर्धे शहर उपनगरासारखेच होते. झाडी होती, वाड्या होत्या. दादरचा कारकून दररोज 'मुंबई'ला जायचा म्हणजे 'कोटा'त. रविवारी तो सहकुटुंब खरेदीला, नाटक-सिनेमाला किंवा भेटीगाठीला 'मुंबई'ला जायचा– म्हणजे गिरगावात. आता ते मुंबईपण अख्ख्या शहराकडे नव्या भागांसकट आले : जवळजवळ त्याच सोयी, आणि गैरसोयी, सगळीकडे सापडतील.

अशी ही चौपट वाढलेली नवी मुंबई एका अर्थाने जुन्या मुंबईहून अधिक एकरंगी आहे, निदान सरमिसळ आहे. तिचे साहेबी आणि देशी असे पूर्वीसारखे सुटसुटीत कप्पे दाखविता येणार नाहीत. मूठभर साहेब होते, ते गेले, मात्र साहेबीपणा शहरभर पसरला आहे. त्याचा वर्ख कोठेही झगझगताना दिसतो. उलट, राजकीय रंग पालटल्यामुळे अगदी कोट–विभागाच्या गाभ्यातदेखील देशीपणाला मज्जाव नाही.

पण तशी मुंबई खरोखरच एकवटलेली आहे का? की ती नुसतीच गोधडीवजा आहे? 'विविधतेतील एकते'चा तिच्यात साक्षात्कार दिसल्याची ग्वाही आपण ऐकतो. ती 'कॉस्मॉपॉलिटन्' (विश्वकुटुंबी) असल्याचा गवगवा महाराष्ट्राचे राज्य होण्यापूर्वी– आणि ते होऊ नये, म्हणून– केवढ्या मोठ्या प्रमाणावर होत असे! ते सगळे खरे का? कितपत खरे?

या वीस वर्षांत मुंबईची लोकसंख्या वाढली; त्यात वाढीचे प्रमाण मराठी लोकांपेक्षा बिनमराठी लोकांचेच अधिक आहे. याचा राजकीय आणि आर्थिक अन्वयार्थ सोडला, तरी मुंबईचे मराठीपण ओसरत चालल्याची भीती अगदीच अनाठायी नाही. पूर्वी साहेबांचे सोवळे लक्ते असत. निमसाहेबी गोत्राची मंडळी तेथे थोड्याफार शूद्रभावाने वावरत. पण मराठी माणसांना ते ओवळयासारखे असायचे. याला अर्थात दुसरी बाजू आहे. आमचे सोवळेओवळे पोटजातींपर्यंत आखीव असायचे. अगदी ज्ञातिगृहात जागा मिळाली नाही, तरी शेजारचा वास घेऊन चूल मांडायची. शक्यतोवर आपल्या वासाचा बोळ वा चाळ

शोधायची. गोलंकाराचा धसका मोठा. परिणामी मुंबईतील पांढरपेशी मराठी वस्ती ठरावीक कोंडवाड्यांतून पोटाशी पाय घेऊन दाटीवाटीने बुजबुजली, आणि समुद्रकाठच्या व टेकड्यांवरच्या हवेशीर भागांत बिनमराठी माणसे आरामात पसरली. वांद्रा–कुलाब्याचा दूरदूरचा बाटगा किनारा सोडा (तेथे म्लेंच्छ, इसाई, पारशी असले परधर्मी धोके होते!); पण चौपाटी–मलबार हिलवरही गुर्जर बंधूंनी ठाण मांडले; आम्ही तेथे फिरकलो नाही. किंवा नुसतेच फिरण्यासाठी जात असू.

फार कशाला, पंचवीस–तीस वर्षांपूर्वी दादरचा शिवाजी पार्क उभा राहिल्यावरही त्याच्या किनाऱ्यावरील भागातील घरांना मागणी नसे. याला कारण दारिद्र्य नव्हे, आपल्या हाडांत मुरलेली ती केविलवाणी सबब येथे चालायची नाही. फार थोडे अपवाद सोडता गब्बर मराठी माणसेही त्या वाटेला गेली नाहीत. ते उघड्यावरचे वारे तीस–चाळीस वर्षांपूर्वीच्या कानटोपी संस्कृतीला मानवत नसे, हेच खरे! शाळा–कॉलेजांतील मुले उपनगरांत दिवसभरच्या सहलीसाठी निघाली, तर त्या छचोर फंदांकडे काणाडोळा करताना पालकधर्माला केवढे कष्ट व्हायचे! मुलींनी जाणे महाकठीण; आणि 'संमिश्र' म्हणतात, तसे जाणे म्हणजे अब्रह्मण्यच!

जमाना बदलला; कानटोप्या सैल होतहोत टोप्यांप्रमाणेच उडाल्या. विशेषतः दुसऱ्या लढाईनंतरच्या वावटळीने. माणसे थोड्या मोकळेपणाने वावरू लागली– जागेच्या टंचाईमुळेच नव्हे, तर नवे वारे खेळू लागल्यामुळे. पण याच काळात बाहेरून लोंढे घुसायला सुरुवात झाली. फाळणीच्या निमित्ताने सिंधी आलेच; पण नोकरीधंद्याच्या निमित्ताने पंजाबी आले, तामिळी आले, मल्याळी आले आणि कोणकोण आले. पुन्हा बेकारांनाही मुंबई मानवते, म्हणून चहूंबाजूंनी तेही आले. असे पाहुण्यांचे पेंढार जमा झाले. त्यांची अंथरुणे सामावता सामावता यजमानाला राहायला भुई थोडी झाली. किंबहुना, यजमान कोण, मूळ घर कोणाचे, असा संदेह निर्माण झाला. पुन्हा यजमान जरा भिडस्त; आणि बराचसा अगतिक. आता तोच उपरा ठरणार काय?

'रोमला गेलात, की रोमन लोकांसारखे वागा!' या इंग्रजी आदेशानुसार ही पाहुणेमंडळी मुंबईकर किंवा महाराष्ट्रीय बनतात का? बिलकूल नाही! ती या अर्थानेही घरच्यासारखी वागतात: सिंधी कराचीत असल्यासारखे आणि तामिळी मद्रासेत असल्यासारखे. त्या त्या गटाच्या खास वसाहती सोडल्या, तरी अन्यत्र ते सर्व मराठी लोकांनिशी सरमिसळ राहतात; राहावे लागते. पण परस्परांशी मिसळून मात्र नव्हे! एका भिंतीआड राहूनही मूळचा शेकडो मैलांचा अलगपणा अबाधित ठेवतात. कोठे देवघेव नजरेत भरते, ती मुख्यतः वरवरची: वेषभूषेतील अथवा आहारधर्मातील. मराठी स्त्री सलवार–कमीज चढवील आणि स्त्रीपुरुष इडली–डोसा खातील. यात मराठी माणसे 'घेण्याची' जबाबदारी अधिक उचलतात, असे वाटते. पण इतक्यापुरतेच. एरवी सणावारीदेखील घरी येणे–जाणे नाही; माज-

घरापर्यंत तर नाहीच.

असा हा वेगळेपणा टिकून धरणारा सक्तीचा सहवास. त्यात भारतीय एकात्मता, विश्व-कुटुंबी विशालता, इत्यादी गहिवरदायी गुणांना फारसा वाव नाही. एकमेकांची भाषासुद्धा परकी राहते. महाराष्ट्राच्या भर राजधानीतील परभाषिकांना मराठी येत नाही; येण्याची गरजही वाटत नाही. आणि मराठी लोकांना शेजाऱ्याची भाषा समजत नाही. मला वाटते, हल्लीच्या मानाने पूर्वीच्या मुंबईकर गुजरात्याला कामचलाऊ मराठी अधिक येई, ते घरातील 'रामा'मुळे आणि बाहेरच्या व्यापारधंद्यामुळे असावे. पण मुख्यतः ती मुंबई अधिक मराठी होती, हेच खरे.

पण नेमके बोलायचे, म्हणजे या बहुरंगी म्हणून वर्णहीन वाटणाऱ्या शहरात एक वर्ग असा आहे, की ज्यात ही मातृभाषेची विविधता नडत नाही आणि चालीरीती समान वाटतात आणि वृत्तीचे साधर्म्य आढळते. या वर्गाच्या व्यवहारात मातृभाषेची अडचण नसते; कारण त्याचा निर्वाह इंग्रजीवर चालतो. मातृभाषा हे जरूर पडल्यास (उदाहरणार्थ, खानेसुमारीत) कबूल करायचे कलम; एरवी जरा लाज वाटण्यासारखे! यातील मुलांना आई-बाप हे ममी आणि डॅडी: केवळ जन्मामुळे जो देशीपणा अंगाला चिकटला असेल, तो पुसून काढण्याचे काम विशिष्ट प्रकृतीच्या शाळांवर जबर फी देऊन सोपवलेले असते. अशा शाळांत आणि घरांत (धर्म कोणताही असो) नाताळचा आनंद अधिक; देशी सण गणतीत नाहीत; स्वातंत्र्यदिन हा त्यांतलाच एक! दक्षिण मुंबईतील एका मराठी स्त्रीसंस्थेने चालविलेल्या बालवर्गाची बोधभाषा इंग्रजी आहे! या जातीचे सांस्कृतिक पोषण होते, ते सहसा (लहान वयात) 'कॉमिक्स', (कोणत्याही वयात) इंग्रजी चित्रपट, ललनांसाठी फॅशनची नियतकालिके आणि (वाचनाची थोडी सवय असल्यास) या सगळ्या साजाला अनुरूप असे ग्रंथ.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हा वर्ग संख्येने आणि सामर्थ्याने वाढता आहे. त्यात अधिकाधिक मराठी कुटुंबे सामील होत आहेत. आपण 'कॉस्मॉपॉलिटन' आहोत, अशी यांची प्रौढी असते; तसे नसलेले—म्हणजे मराठी वगैरे देशी भाषा बोलणारे—लोक त्यांना मागासलेले वाटतात. 'मराठी ही नोकरांची भाषा' असे अडाणी उर्मटपणाने म्हणणारे महाराष्ट्रीयेतर धनिक पूर्वीही असत. आता अनेक मराठी कुटुंबांच्या हिशेबीही मराठी ही मुख्यतः नोकरांची आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची भाषा झाली असावी, अशी शंका येते. असो! ही भारतीय एकात्मता वगैरे नव्हे; एकरंगीपणाही नव्हे. हा प्रकार भारतीय नाही; नुसताच भडक आहे.

याच्या उलट ख्रिश्चन, पारशी, इत्यादी जमातींतील काहीजणांत तरी— विशेषतः स्त्रियांत पूर्वी फारच विरळ असलेला देशीपणा आता दिसतो; निदान काही बाबतींत. भारतीयत्वाची

नवीन जाणीव हे त्याचे कारण असेल किंवा आणखी काही. साडी–चपला आल्या; अगदी अलीकडे पंजाबी पोशाखही. ' शकुंतला डिसूझा ' असली गंगाजमनी नावे कानांवर पडू लागली. हे अर्थात केवळ मुंबईतच होत नाही; देशभर होत आहे.

मुंबईतील मराठी समाजाचा अगदी वरचा पैसेवाला पापुद्रा आणि तळाशी दैन्यात रुतलेले अर्थशूद्र हे सोडता, उरलेल्या समाजाचे मध्यमवर्ग ( पोटवर्ग वरचा आणि खालचा )! आणि कामगार वर्ग अशी सोईस्कर वर्गवारी वर्षानुवर्षे केली जात आहे. त्यांच्यामधील ( खऱ्या व मानीव ) विग्रहाला उठाव देणाऱ्या गिरगाव आणि गिरणगाव अशा चटपटीत चिठ्या तीस वर्षांपूर्वी त्यांच्यावर डकविल्या गेल्या. पण या दोन गावांच्या सीमा आता तेवढ्या अलग राहिलेल्या नाहीत. लढाईनंतर कामगारांना बरकत आली; त्या मानाने चाकरमान्या मध्यम-वर्गाला कासवचालीने चढणाऱ्या महागाईभत्त्यावर आशा टांगून ठेवावी लागली. कामगार चांगले कपडे घालू लागला; थोडी चैन करू लागला. सिनेमातील वरच्या वर्गांत अथवा हॉटे-लात शेजारी ' गिरणबाबू ' आढळल्यामुळे कित्येक शुभ्र पांढरपेशांना मळ(मळ)ल्यासारखे होई; आता त्याची सवय झाली आहे. गिरणगावची मुले कॉलेजात जाऊ लागली; त्यांतील अनेक कारकुनी अगर वरिष्ठही पेशांत आले. याने त्या दोन वर्गांतील घसट पूर्वीपेक्षा वाढली असली, तरी त्यांतील भेदभाव फारसा भंगलेला नाही. पांढरीचा पीळ कायम राहिला आहे.

अर्थातच हे भेद आणि पीळ मुळात जातिसंस्थेतील : ते वरपासून खालपर्यंत आहेत. ती गुंतागुंत येथे हाताळता येणार नाही. पण या पन्नास वर्षांत मुंबईतील मराठी मध्यमवर्गात जातीजातींतील व्यवहाराचे रंग कसे बदलत गेले, ते आठवण्यासारखे आहे. ब्राह्मण्याच्या पुरातन अहंकाराला पेशवाईने धार चढवली, ती कालपरवापर्यंत बोथट झाली नव्हती. अजू-नही पेशवाईचे अवशेष टिकटिकाणी कुढत आहेत. तेथे आपापसांतील कुजबुजीत कधी ती चमकून उठत असली, तरी काळाच्या करामतीमुळे ती पूर्वीसारखी उघडपणे तळपू शकत नाही. तिचे हसे होण्याची भीती आहे. ब्राह्मणांच्या कडेकोट संस्थांतून आता प्रसंगविशेषी तरी ' इतरां ' ना प्रवेश असतो. त्याचप्रमाणे त्या ' इतरां ' च्या संस्थांतूनही.

रोटीव्यवहार आता इतका अनिर्बंध झाला आहे, की पंचवीस–तीस वर्षांपूर्वीपर्यंत पंक्तिभेद पाळला जात असे, हे आजच्या तरुण पिढीला कपोलकल्पित वाटेल. पण ते खरे आहे. अनेक सुशिक्षित कुटुंबांतही तो पाळला जाई. कमरेला अडकविण्याच्या सोवळ्याप्रमाणे तोही सुटला. तो होता, तेव्हा ' खऱ्या ' ब्राह्मणाला ( म्हणजे चित्पावनादी ) स्वतःला ब्राह्मण म्हण-विणारा सारस्वत (म्हणजे शेणवी) ओवळा वाटायचा; सारस्वताला कायस्थप्रभू, अशी ओव-ळ्याची उतरती भांजणी असे. ' हॉटेलमध्ये खाण्याचा भ्रष्टाचार ' त्या सोवळ्याला बाधला, हे सर्वच खरे नव्हे. कारण हॉटेलांतून कुणाच्याही मांडीला मांडी लावून काहीही–अभक्ष्य-

देखील–चापणारा सद्‌गृहस्थ कुळाचार म्हणून घरी जात पाहून पान मांडायचा– म्हणजे मांडलेच, तर !

असा रोटी–व्यवहार.

बेटी–व्यवहार तेवढा नसला, तर बराचसा सैल झाला आहे. पोटजातीचे कोट ढासळून गेल्यासारखे आहेत. चित्पावन, देशस्थ आणि कऱ्हाडे ब्राह्मण अथवा गौडसारस्वत आणि नुसतेच गौड ब्राह्मण ( म्हणजे कुडाळदेशकर ) असले पोटसंबंध पंचवीस–तीस वर्षांपूर्वीसुद्धा क्रांतिकारक मानले जायचे. मग निरनिराळ्या जातींतील संबंधांचे काय ! अशा लग्नाला वाजंत्री नसत; सारा गुपचुपीचा प्रकार. कुळाच्या ( किंवा जातीच्या ) प्रतिष्ठेला काळे फासल्याची आततायी भाषा; घराबाहेर जाण्याचे नाट्य, लोकांनी रस्त्यात बोटे दाखविणे आणि तुरळक आस्थेवाईक समाजसुधारकांकडून अभिनंदन–असे सोहाळे त्या जोडप्याच्या नशिबी असत. आता कोणी अभिनंदनदेखील करीत नाही. अलीकडे ‘ स्थळां ’ च्या जाहिराती येतात, त्यांत बहुधा ‘ कोणत्याही पोटजातीचा ( ची ) चालेल ’ अशी उदार सवलत असते. कधीकधी तर ‘ कोणत्याही पुढारलेल्या जाती ’ पर्यंत मजल असते. कोणी मोघमपणे ‘ चांगल्या संस्कृती ’ ची अपेक्षा व्यक्त करतो. मोजदादच केली, तर मला वाटते, जातीपेक्षा वर्णाबाबत अधिक आग्रह आढळेल ( म्हणजे वधूच्या ! ) पन्नास वर्षांपूर्वी झोपी गेलेला एखादा सज्जन आज जागा झाला, तर ही कालवाकालव पाहून पुन्हा कदाचित कायमचा झोपी जाईल.

या पंधरा–वीस वर्षांत मुंबईतील बेटी-व्यवहारात इतका बदल घडून यावा, याला कारण कोण ? केवळ शिक्षण ? की सुधारण्याचा प्रचार करणारे पुढारी आणि साहित्यिक ? की झुंडींनी नोकरीवर जाणाऱ्या बेस्ट्या ? त्या कॉलेजातही अशाच झुंडींनी जातात. त्यांपैकी स्वतः जमविणाऱ्या फार थोड्या. ( कथांतच फार ! ) पण इतके सगळे शिक्षण आणि वर नोकरी म्हणजे वय काही थबकून राहत नाही ! तेव्हा व्यवहारी पालकही जुन्या अभिमानाला मुरड घालतात. असो. परजातीचा वर वर्ज्य न मानण्याची धमक प्रथम मुख्यतः कायस्थ कन्यकांनी दाखवली, असे वाटते.

सुमारे चाळीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद जोरात होता. मुंबईलाही त्याची झळ लागली होती. उभयपक्षींच्या अतिरेकापणामुळे कडवटपणा आणि अधिक दुरावा निर्माण झाला. गांधीजींच्या तीस सालच्या चळवळीमुळे मुंबईत तरी तो वाद मावळल्यासारखा झाला. सगळा कडवटपणा नष्ट झाला नाही; त्यातील काही भाग भूमिगत झाला. अजून मध्येच एखादे वेळी त्याचा फूत्कार कानी येतो. पण तो तेवढ्यापुरताच. म्हणजे मोठी मनमिळवणी झाली, असे नव्हे; निराळेपण उरलेच आहे.

आहारधर्माबाबतचे निराळेपण आणि कट्टर अभिमान मात्र मुंबईत तरी ओसरत चालले

आहेत. ब्राह्मणी शाकाहारातसुद्धा पोटजातींचे सवतेसुभे असतात. चित्पावनी आमटी आणि देशस्थी आमटी आपली वेगळी कृती आणि चव किती शतके राखून आहेत, कोण जाणे! शिळ्या भाताला फोडणी देण्याचे तंत्रही वेगवेगळे. सारस्वतांचे आमटीचे चोचले कायस्थांहून निराळे; पाठारेप्रभूंचे पुन्हा स्वतंत्र. आणि दैवज्ञांचे आणि कोणाकोणाचे मत्स्याहार आणि मांसाहाराचे तेच. आता काही जेवणखाणांत कालवाकालव झालेली नाही; पण दुरभिमानाचे भुरके कमी ऐकू येतात. कोठे मसाल्यांची देवघेव होऊ लागली आहे. नव्या तऱ्हेच्या संसारात ते तयार विकत आणावे लागत असल्याकारणाने विविधता साधणे कठीण पडत नाही. फराळाच्या खाद्यांत तर ती अधिकच. बाहेर तऱ्हेतऱ्हेचे खाणारे रामभाऊ पंचवीस वर्षांपूर्वी जानकीबाईपाशी ( त्यांचा नूर पाहून ) उडपी हॉटेलातल्या पातळभाजीची तारीफ करीत असावेत. आज जानकीबाईच ( किंवा जयश्रीबाई ) त्यांच्या रामभाऊंपाशी ( किंवा रमेशला ) तिची शिफारस करतील. शेजारणीच्या रामभाऊंपाशीही करतील. आणि पातळ भाजीचीच नव्हे, तर कसकसल्या अभक्ष्याची! दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळात सभ्य ( दिसणारी ) स्त्री हॉटेलात शिरली, तर खाणारांचे घास घशात अडकत. आता तिच्याकडे कोणी ( ती फारच पाहण्यासारखी नसल्यास ) धड पाहतही नाही! काही काळ 'फॅमिली रूम'चा आडोसा तरी आवश्यक वाटे; आता तोही नाही—म्हणजे आडोशाची निकड नसेल, तर! ती एकटी किंवा मैत्रिणीसमवेत जाते; मर्दांनी सोबत लागत नाही.

या शतकाच्या आरंभीची कथा. राजारामशास्त्री भागवत इराण्याच्या हॉटेलाबाहेर उभे राहून त्याच्याकडून घेतलेला पाव खात—आहारात धर्मजातिभेद आपण मानीत नाही, हे दाखविण्यासाठी. इराण्याकडे चोरून खाणारी माणसे मधल्या वर्षांत हजारांनी निघाली. इराण्याकडे ऑम्लेट खाल्ले, ही समवयस्कांत प्रौढी मारायची आणि वडील मंडळींपासून लपवून ठेवायची गोष्ट होती. आता इराण्याची लज्जत सरली, आणि अगदी ब्राह्मणी बालेकिल्ल्यांतील महिलाही तेथे सर्व काही भक्षण करतात. राजारामशास्त्र्यांच्या आत्म्याला नक्कीच मोठी शांती लाभली असेल!

साधारणतः बेचाळीस साली मुंबईतील मराठी स्त्रीच्या आझादीच्या चळवळीला एकाएकी जोर चढला. रॅशनिंग आले. त्याच्या कारकुनी पसाऱ्याला पुरुषांची टंचाई पडू लागली. तेव्हा स्त्रियांची भरती सुरू झाली. मग ती लाट आवरेना; सगळ्याच कचेऱ्यांतून ती घुसली. पहिल्यावहिल्या रंगरूटांचे धड कौतुक आणि कुचेष्टा होण्याआधीच त्यांच्या पलटणी सकाळ संध्याकाळ सैरावैरा जाऊ लागल्या. ज्या घरांतल्या मुलीबाळी मैत्रिणीकडे बसायला जायचे असेल, तरीसुद्धा वडीलधाऱ्यांच्या परवानगीशिवाय घराबाहेर पडू शकत नव्हत्या, त्या दररोज आठ–दहा तास राजरोस नोकरीवर जाऊ लागल्या. त्या घरांचा इलाज नव्हता. लढाईच्या तंगीला तोंड देऊन उभे राहायचे, म्हणजे बायकांनाही कंबर कसणे अवश्य होते. कोठे विरोध झाला, तो परिस्थितीनेच पाचोळ्यासारखा उडवून दिला.

लढाई संपली, स्वातंत्र्य आले, पण तंगी संपली नाही. ती संपली असती, सुबत्ता झाली असती, तरी चाकरीची आणि स्वातंत्र्याची चटक लागलेल्या स्त्रियांनी पुन्हा घरबंदी स्वीकारली नसती. स्त्रियांच्या या मुक्त संचाराने तेव्हा कित्येकांचे डोळे फिरण्याची वेळ आली. पापभीरूंना प्रलयकाळाची शंका भेडसावू लागली. हरिभाऊंची यमू स्वत:च्या नवऱ्याबरोबर कोठे दिवाणखान्यातल्या सभेला गेली, म्हणून केवढा हलकल्लोळ माजला ! पण ती पाऊणशे वर्षांपूर्वीची गोष्ट. चाळीस–पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत या बाबतीत फरक पडलाच असला, तर तो तपशिलापुरता–फार तर कल्लोळाचा सूर जरा कमी तीव्र आणि त्याच्या साथीला कुचाळकीचा सूर ! तेव्हा कुलस्त्री घराबाहेर पडलीच, तर देवदर्शन, हळदीकुंकू, लग्नमुंज असल्या सात्त्विक कार्यासाठी. तीही सहसा एकटीदुकटी नव्हे. तिला सदैव सासुरवाशिणीची कळा असे ! पुराण–कीर्तनाची सवलत मिळायला पोक्त वयाचा दाखला लागे, वैधव्याचा विशेष उपयोगी पडे.

पुढे गणेशोत्सवात खास स्त्रियांसाठी एखाद्या दुपारी कार्यक्रम असे. त्याला हजर राहणे म्हणजे माफक सुधारणा. यजमानांबरोबर गंधर्वांच्या नाटकाला जाणे म्हणजे तर थोडीशी बंडखोरीच ! पण बरोबर जायचे, म्हणजे चालताना मध्ये पुरुषभर अंतर सोडून– आडवे नाही, उभे. मागून फरफटणारे 'खटले' आपलेच, याचा उघड संशय येऊ नये, इतकी दक्षता बाळगत पतिदेव पुढे चालायचे. मग बोलणे कुठचे ? आणि हसणे-खिदळणे ? शांतं पापम् ! हे लग्न हाडीमाशी खिळलेल्यांचे, नवविवाहितांचे त्याहून बिकट.

लहानपणची मला एक स्वच्छ आठवण आहे. एका लग्नप्रसंगी अकस्मात कोलाहल झाला; आम्हां लहानग्यांपर्यंतही तो पोचला. कारण लग्नविधी चालू असताना वर वधूशी बोलला, म्हणे ! स्त्रीधर्म असा खडतर असे. ( गरती ) स्त्रीने ( रस्त्याकडच्या ) खिडकीत अथवा सज्जात उभे राहणे, अंधार पडल्यावर बाहेर फिरणे, हे चवचाल गणले जाई. मग नोकरी करणे कुठले ? अगदीच आपद्धर्म म्हणून प्राथमिक शाळेतील मास्तरकी फार तर मंजूर व्हायची.

दुसरा एक खास स्त्रियांसाठी व्यवसाय म्हणजे नर्सचा. पण तो फारच शंकास्पद, म्हणून बाष्कळ लिहिण्याबोलण्याला मोठा सोयीचा असे. त्या काळच्या ओवळ्या कादंबऱ्यांतून नर्सचे पाऊल हमखास वाकडे पडायचे. सोवळ्या साहित्यात तर तिला मज्जावच होता. ( कामुक स्वप्नरंजन पुरविणाऱ्यांना अजूनही ती बिचारी उपयोगी पडते– स्त्रियांच्या पावित्र्याचा वाङ्मयीन व्यापार करणाऱ्यांनासुद्धा ! )

या शतकाच्या तिशीत स्त्री–मुक्तिपरायण साहित्याचा मोठा उद्रेक झाला, त्यावर कडाक्याचे वाद झडले आणि या पुस्तकी वल्गना प्रत्यक्षात उतरायला कित्येक पिढ्या लोटाव्या लागतील, असा सुज्ञ आणि तुच्छ विचार करून रूढिवादी स्वस्थ बसले. पण दहा–पंधरा वर्षांत त्या वल्गनांपारची मुक्ती अकस्मात अवतरेल, हे त्या साहित्याच्याही स्वप्नीही नसेल ! मुंबईतील

आजची स्त्री निःसंकोचपणे वावरते. तिला गर्दीचे, अंधाराचे, परपुरुष नामक प्राण्याचे भय वाटत नाही. तिच्या मोकळिकीचा विपरीत अर्थ लावणाऱ्या आशाळभूत किंवा रोगट लेखकांचेही भय वाटत नाही!

हे मोकळे वारे स्त्रियांभोवतीच घोटाळत राहिले नाही; सगळ्या कुटुंबांतून ते खेळू लागले. लिंपून टाकलेली खिडक्या–दारे जणू खाडकन् उघडली गेली आणि पिढ्यान्‌पिढ्या जतन केलेल्या कुबट, कोंदट संबंधांना थोडे ऊन्ह मिळाले. मुलांशीच नव्हे, तर पत्नीशीही बोलताना 'मुसक्या'ची भाषा गुरगुरणारा आणि वेळोवेळी तिचे कृतीत रूपांतर करणारा बाप आता संग्रहालयात ठेवावा, इतका हळूहळू विरळ होऊ लागला आहे. पूर्वी तो घरोघर सापडायचा. बाप ही मुलांच्या हिशेबी धाक वाटण्याची वस्तू होती.

लहानपणीची आणखी एक आठवण येते. वडिलांना बघायला आलेले एक वयस्क डॉक्टर अभिमानाने सांगत होते :

"आमच्या वेळी वडलांपुढं उभं राहण्याची आमची छाती नसे!"

मला उगाच अपराध्यासारखे वाटू लागले.

'लाडाने मुले बिघडतात. बसता लाथ, उठता बुक्की; उलट उत्तर देणे म्हणजे भयंकर पाप!' असले शिस्तीचे मूलमंत्र वडील मंडळींच्या नित्यपाठात असत. ('छड्या खाई छमूछम्, विद्या येई घमूघम्' हा याच मंत्राचा विद्याक्षेत्रातील प्रतिध्वनी!) त्यांचा प्रत्यक्षात उपयोग करताना, परिणाम बिंबविण्यासाठी, हात, पाय, काठी किंवा तत्सम अन्य पदार्थ यांच्याप्रमाणेच कित्येकदा खरपूस शिवीगाळही असायची. अशिष्ट शब्द वर्ज्य नसत. हा प्रयोग व्हायला मुलगा लहानच हवा, असे नव्हते; मिशांची आडकाठी नसे! अलिकडची शहरी बापमंडळी शेळपट झाल्याची तक्रार कधीकधी ऐकू येते. बाप हा नवराही असतो. यांतील दुसरी आघाडी ही अगोदरची. तेथे मऊ झाल्यामुळे बाप म्हणून तो निरुपद्रवी होतो, असे त्याचे अर्धवट विनोदाने स्पष्टीकरण केले जाते. असो. पण या नव्या बापाला सणसणीत शिव्या फारशा येत नाहीत, हे मात्र खरे.

बाप असा, तेव्हा वात्सल्याची भरपाई आईकरवी होत असल्याची लोकप्रिय कादंबऱ्यांची साक्ष आहे, पण ती सांभाळून मानायला हवी! बापाच्या गैरहजेरीत त्याची वाण भासू न देणाऱ्या कर्कश आणि कजाग मातुःश्रीही हव्या तेवढ्या असत. फक्त त्या तुलनेने उजव्या, इतकेच. पण आईची पराधीनता, तिने आपल्यासाठी खाल्लेल्या खस्ता आणि मारकुट्या बापाच्या तडाख्यातून तिने कधीकधी केलेला बचाव यांच्या संमिश्र स्मरणांतून वरीचशी महन्मंगल मातृत्वाची स्तोत्रे स्फुरली असावीत– म्हणजे अगदीच नाटकी आणि पोटभरू नसतील ती!

त्या कुटुंबात हा असा कोरडेपणा का? लहानांना मोठ्यांची भीती का? ही कठोर

शिस्त काहीशी परंपरेने चालत आली असेल, पण मुंबईसारख्या पुढारलेल्या शहराचे काय? मौज अशी, की त्या काळच्या पुढारलेपणाच्या कल्पनेत तसली शिस्त ठीक बसत होती. पन्नास वर्षांपूर्वीच्या शिक्षित समाजापुढे आदर्श होता, तो नेमक्या त्या काळच्या इंग्रज समाजाचा नव्हे, तर त्यापूर्वीच्या म्हणजे महाराणी व्हिक्टोरियाच्या अमदानीतील समाजाचा. त्याचे गृहजीवन असेच कुंद असे; त्यात बाप शिरजोर असे, आणि पत्नी व मुले त्याच्या जरबेत असत. आपल्याकडे परिस्थितीच्या दाबामुळे एकत्र कुटुंबे विभक्त झाल्यावरही असल्या शिस्तीचा काच कमी झाला नाही. कदाचित वाढला असेल– एकछत्री अंमल म्हणून! तिच्याविरुद्ध कधी जोराचा आवाज उठला नाही– विशेषतः मुलांच्या कुचंबणे-बाबत. पुस्तकातल्या आज्ञाधारक बाळूचे नेहमीच भले व्हायचे. आज्ञाधारकपणा हा आपल्या प्राथमिक आर्यगुणांपैकी एक, त्याला इंग्रजी दुजोरा मिळाला. या बाहेरून खडकासारख्या असणाऱ्या आईबापांच्या अंतरंगात मायेचे झरे असत, म्हणे! असतील, पण त्यांचा ओलावा लाभण्यापूर्वी किती मुले खरचटली असतील, याची गणती नाही. त्यांतील कित्येक जन्माची पांगळी झाली असतील.

या समाजाच्या मनोरंजनालाही शिस्तीच्या या नन्नाच्या परवचा लागू होत्याच. चाळीस-पन्नास वर्षांपूर्वीचा काळ म्हणजे आपल्या रंगभूमीच्या वैभवाचा काळ, असे आपण पुनःपुन्हा गळा भरून म्हणतो; पण तेव्हा कॉलेजांतील मुलांनीही नाटकाला जाणे हे बहुतेक संभावित कुटुंबातून बिघडल्याचे लक्षण मानीत. मग ती चोरून जात, आणि त्याने नाटकाला निराळी लज्जत येत असावी. तरुण माणसांना बिघडविण्याचे श्रेय इतर कलांनाही दिले जाई. 'संगीत' हा अलिकडचा प्रतिष्ठित शब्द, त्याबद्दल संपूर्ण अज्ञान आणि अनादर असलेले स्त्रीपुरुष तो एक संस्कृतिवर्धक प्रकार म्हणून हल्ली मैफलीत मिरवितात. तेव्हा 'संस्कृती' या शब्दाला केवळ सदाशिवपेठी अर्थ होता आणि त्यात संगीत अस्पृश्य होते. त्याला 'गाणे-बजावणे' म्हणत आणि तेही अशा सुरात, की त्यातून ते अनेक पातकांचा आरंभ, हे सूचित व्हावे! (मग गायिकेच्या गाण्यात विशेष धोके, हे सांगणे नलगे.)

पण पातकालाही पळवाट ठेवण्याइतके आपण उदार! संगीताला मिळाल्या त्या अशा: नाटकातील गाणे जलशाहून कमी निषिद्ध. गणेशोत्सवासारख्या प्रसंगीचे गायन इतर जलशांहून सात्त्विक, कीर्तनातील तर विशेष सोज्ज्वळ! उत्सवात त्या काळी मेळ्यांचे कार्य-क्रम फार लोकप्रिय असत, ते बाळबोध संगीत पुरवत. नाटकांनी आणि जलशांनी शास्त्रीय संगीताचे लोकांना नकळत शिक्षण दिले, ग्रामोफोनच्या तबकड्यांनाही दिले. आता संगीताला प्रतिष्ठा आली. घरंदाज मुलीबाळी गाऊ लागल्या. मोठमोठ्या कलावंतांचे मुंबईत एकसारखे कार्यक्रम झडत असतात. शिवाय घरोघर रेडिओ चालू असतोच; आणि रस्त्यारस्त्यावर ट्रॅन्झिस्टर. पण या प्रसाराच्या मानाने शास्त्रीय संगीताची आवड आणि जाणकारी वाढली नसावी, असे वाटते.

इतर कलांविषयी काय लिहावे ? नृत्याला तेव्हा सरळ 'नाच' म्हणत. आणि त्या पातकाला पळवाट जवळजवळ नव्हतीच ! पण या पंधरा–वीस वर्षांत त्या जुन्या पातकाला संस्कृतीचा मुलामा चढला आणि आज शाळकरी विविध कार्यक्रमही नृत्याशिवाय पुरा होत नाही.

चित्रकलेच्या प्रेमाची सामान्य धाव कॅलेंडरवरील चित्रापर्यंत, फार तर रविवर्म्यांच्या आणि तत्सम चित्रापर्यंत, असे. तीस-पस्तीस सालच्या सुमारास मासिकांची आणि पुस्तकांची मुखपृष्ठे आणि खास अंक यांनी लोकांचे लक्ष वेधण्यास सुरुवात केली. आता नवचित्र-कलेचा दबदबा आहे. तिची प्रदर्शने सारखी भरत असतात. पण थोडी– अपवाद म्हणण्या-इतकी थोडी कुटुंबे सोडल्यास चित्रकलेची रुची नाही, असे म्हणावे लागते.

!. नाटकांप्रमाणेच चित्रपटही विद्यार्थ्यांना हानिकारक, अशी कर्मठ पालकांची धारणा असे. तो देवादिकांचा अथवा ऐतिहासिक ( म्हणजे राष्ट्रभक्ती वगैरे बिंबविणारा ) असला, तर सद्गुणी विद्यार्थी तो पाहण्यास थोड्या मिनतवारीने पालकांची परवानगी मिळवीत. पण त्या वयात साधारणतः चित्रपट ही चोरटी करमणूक असे. आता ती सहकुटुंब सहपरिवार घडते आणि त्यासाठी पुराणेतिहासाची सहसा अट नसते. मराठीचीही नसते, म्हणून मराठी वस्त्यातही हिंदी चित्रपटांची चलती असते. आणि गुणगुणायची गाणी मराठीपेक्षा हिंदीच अधिक. इंग्रजी चित्रपटांचा दबदबा आहेच. ती भाषा चांगलीशी न कळणारी मंडळी त्यांचे नेमाने दर्शन घेतात. विशेषतः, अमेरिकन साहेब बोलतो, ते इंग्रजी त्याला आफ्रिकेतल्या एखाद्या भाषेइतकेच अगम्य असते. पण त्याचे डोळे सुखावतात. मधूनमधून कानालाही काही आवाज सुखवीत असावेत ! एकंदरीत बोलका चित्रपट त्यांना मुक्यासारखा असतो.

मुंबईतील कपड्यांच्या आणि केसांच्या नव्यानव्या फॅशन्स चित्रपटांतून उचलतात, असा एक प्रवाद आहे (आणि लौकरच मुंबईतून त्या अन्य शहरे उचलतात !) कोण जाणे, चित्रपटांची नकल होते, की चित्रपटच नक्कल करतात ? पण यात नवीन काही नाही. पूर्वी, म्हणे, स्त्रिया बालगंधर्वांच्या वेशभूषेची आणि चालण्याबोलण्याची नक्कल करीत, आणि मुंबईवर सैल पायजमा व तोकडा कोट बापूराव पेंढारकरांनी चढविल्याचे ऐकिवात आहे. त्या-वरून पोशाखात कसे बदल होत गेले, याची आठवण होते. त्यांची जंत्री द्यायला येथे वाव नाही. पण चाळीस वर्षांपूर्वीच्या काळात पोशाखावरून जात अजमाविण्याची सोय होती –पुरुषांची आणि बायकांचीही– ती केव्हाच गेली. तीस सालच्या चळवळीने समाज ढवळून निघाला, तेव्हा हे फरक नष्ट होऊ लागले. साड्यांचा पाच वारांत संक्षेप झाला. पुन्हा नऊ वारांत जावे, असा मराठी बाण्याचा आग्रह क्वचित कानी येतो, पण तो एकांडाच. आता तर खुद्द साडीलाच सलवारीचे आव्हान सतावीत आहे. केशरचनेचे प्रकार इतक्या झपाट्याने बदलतात, की तो गुंतवळा सोडवायला येथे वेळ नाही. तीस–चाळीस वर्षांपूर्वी

स्त्रियांच्या फॅशन्स या निंदेचा आणि निषेधाचा विषय असत, आता त्या विनोदाचा विषय झाल्या आहेत– यापलीकडे त्यांना कोणी महत्त्व देत नाही.

आता पुरुषांच्या 'फॅशन्स'. तीस–चाळीस वर्षांपूर्वी मुंबईतल्या लहानमोठ्या कारकुनाचा जामानिमा लाँग कोट, धोतर, टोपी (वयस्क असला, तर रुमाल किंवा पगडीही) असा असे. रुमाल, पगडी लवकरच बाद झाली, कोट आखुडला, पण हळूहळू; टोपीचे आकार बदलत शेवटी घडीवर स्थिरावले. पुढे तरुण मंडळी धोतराचा ऐटबाज काचा मारून दोन्ही बाजूंना पंख फडफडावू लागली, मग पायजम्यात शिरली. (शिरली म्हणण्याइतका त्याचा घोळ असे!)

प्रत्येक बदलाला अगोदरच्या पिढीतील माणसे नाक मुरडीत, हे सांगणे नलगे! तीसच्या चळवळीने झब्बा (ऊर्फ नेहरू शर्ट) आणला, पण त्याचा वापर आरंभी तरी घर आणि राजकीय सभामिरवणुकीत अधिक असायचा. तेव्हा खादीही आली आणि थोडे लोक सोडल्यास इतरांत ती निष्ठा लौकरच ओसरली. खरे म्हणजे तीस सालानंतर सुटांचा वापर वाढला. धोतरातला कारकून बढती मिळाल्याचे निमित्त करून सूट शिवू लागला. टोपी अंतर्धान पावली. आता मुंबईत टोपी घ्यायची झाल्यास ती कोठे मिळते, याची चोरून चौकशी करावी लागते. सूट आल्यानंतर टोपीची जागा हॅटने घेतली. मुख्यत: खाकी सन्-हॅटने. मौज अशी, की गेल्या दहा–पंधरा वर्षांत ती हॅटही अंतर्धान पावली, आता तसली हॅट घालणारा माणूस मुंबईत दिसला, की तो परगावचा, असे आम्ही समजतो. मागच्या लढाईनंतर बुशकोट आणि बुशशर्ट आले, ते अजून जोरात आहेत. त्यांच्या लांबीत व ढिलाईत बारीकसारीक बदल झाले, एवढेच. त्यांच्या पोरकटपणावर अजूनही काही बुजुर्गांचा कटाक्ष असतो. स्वातंत्र्यानंतर बंद गळ्याचा कोट आला, पण मुंबईच्या बारमाही (निदान दसमाही) उकाड्यामुळे त्याचा वापर सरकारी समारंभापलीकडे फारसा जाईल, असे दिसत नाही. असो. एकंदरीने मुंबईकर पुरुषाचा पोशाख पूर्वीच्या मानाने साधा आणि सुटसुटीत झाला आहे.

जुन्या शिस्तीची धार कमी झाली; पण त्या शिस्तीमागील ध्येयवादही हरवला. तो सगळाच ध्येयवाद आंबट आणि टाकाऊ नव्हता. छानछोकीचा ध्यास घेतलेली; तासन् तास चित्रपटगृहाबाहेर वळवळणारी, आणि वेळीअवेळी हॉटेल व तत्सम ठिकाणे पूजणारी तरुण मंडळी पाहिली, की पंचवीस-तीस वर्षांपूर्वीचा थोडासा ध्येयवाद पुन्हा अवतरला, तरच बरे होईल, असे वाटू लागते.

असे या मुंबईचे रंग पालटत गेले. ते आणखी पालटतील. तिला नव्याचा सोस आहे, म्हणून, किंवा तिची प्रकृती चंचल आहे, म्हणून नव्हे. हे तिच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. तिला नावे ठेवणारे कळत न कळत तिच्यातील नवे उचलतात. तोपर्यंत ते जुने झालेले असते, हा तिचा दोष नव्हे!

# पुस्तक-चोरांविषयी बरेचसे

पन्नास वर्षांपूर्वी अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी ' चोरी कशी करावी ? ' या मथळ्याचे पुस्तक लिहिले. मथळा आकर्षक, म्हणजे भडक हवा; मजकूर त्यामानाने सपक, किंवा असंबद्धही चालेल, ही अच्युतरावांची खास लकब. तिच्यापायी त्यांनी एकदा मार खाल्ला. आणि एकदा तर मुसलमानांचा दंगा ओढवून घेतला. पहिल्या प्रसंगाचे निमित्त ' टिळक बाळंतीण झाले. ' हा त्यांच्या ' संदेश ' मधील मथळा, आणि स्थळ मुगभाटातील शांतारामची चाळ.

दुसऱ्या प्रसंगाचे निमित्त ' रंगीला रसूल ' हा त्यांच्या एका पुस्तकाचा मथळा. ' रसूल ' म्हणजे ईश्वराचा प्रेषित, म्हणजे खुद्द मुहम्मद पैगंबर, आणि त्याच्या रंगेल लीला ! साहजिकच यवनबंधू खवळले, अर्थात पुस्तक न वाचताच खवळले. एकतर, त्यांच्यापैकी फारच थोडयांना मराठी वाचता येत असावे. उर्दूची त्यांनी उगाच धर्माशी सांगड घालून ठेवलेली; ती तरी किती जणांना वाचता येई– ते रसूलच जाणे– दुसरे असे, की एखाद्या पुस्तकाविरुद्ध खवळायला ते स्वतः वाचावे, किंवा समजून घ्यावे लागते, असे नाही. पुढारी सांगतात, ते ऐकायचे. आणि पुढारी एकदा व्यासपीठावर चढला, की ते व्यासपीठच त्याच्या डोक्यात चढते. तो तारस्वर लावतो, आणि त्याकाळी मायक्रोफोनची सोय नसल्यामुळे तोच स्वर लावावा लागे. ( आज ती सोय असूनही अनेकजण लावतात. व्यासपीठावरच नव्हे, तर अगदी रेडिओ–टीव्हीवरही ! ) असो. अशा सभेत कानी पडलेले

सांगीवांगीने, मसाला घालून, चहूबाजूंना फैलावायचे; म्हणजे पुढारी कृतकृत्य! अर्थात पुढाऱ्यानेही ज्याचा जळजळीत निषेध करायचा, ते पुस्तक वाचायला हवे, किंवा त्याला ते नीट समजायला हवे, असेही नाही, किंबहुना, वाचन आणि समज जेवढी कमी, तेवढे मग्रूर पुढारीपणाला अधिक सोयीचे. धर्म, नीती, संस्कृती, इत्यादींच्या पवित्र क्षेत्रांत तर विशेष. 'रंगीला रसूल'ने तीच मौज केली. ते मुहम्मद पैगंबराविषयी नव्हतेच मुळी. ते होते श्रीकृष्णाविषयी! त्याच्या प्रेमळ लीलांविषयी...

'टिळक बाळंतीण झाले' हा केवळ त्रात्यपणा. बेछूट मथळेबाजी. त्या पुरुषसिंहाची अशी जाड टाइपात असहाय अवस्था करायची म्हणजे विटंबनाच. त्यामुळे महान क्षोभ झाला. टिळक हे तेव्हा दैवतपदी पोहोचलेले. अच्युतरावांची त्यांच्या ठायी जाज्वल्य विरोधभक्ती होती. भक्तीइतकाच विरोधही कडवा वाटायचा. पण त्या विरोधाचे खरे लक्ष्य म्हणजे टिळकांच्या आसऱ्याने उभी असलेली उपदैवते. या आश्रितांवर केलेले आडवेतिडवे वार अनेकदा टिळकांना चाटून जात, कित्येकदा त्यांनाच ते झेलावे लागत असावेत.

अच्युतरावांचे 'चोरी कशी करावी?' हे पुस्तकही श्रीकृष्णाविषयीच. खरे म्हणजे भगवान हे त्यातील आदर्श. दही-दूध-लोण्यासारख्या सात्त्विक वस्तूंपासून ते गोपींच्या वगैरे हृदयांपर्यंतच्या राजस वस्तू सफाईने चोरण्याचे भगवंताचे जन्मजात कसब कित्येक शतके आध्यात्मिक कवीपासून ते तमासगीरांपर्यंत आणि गाण्याच्या चिजा वनवणाऱ्यापर्यंत चांगलेच कामी आले आहे. त्यांच्या स्त्री-विषयक लीला अनेक पंडितकवींनी चवीने तपशिलात शिरून, घोळ घोळ घोळवल्या. सोवळ्या घराघरांतून आणि कीर्तनाच्या मार्गाने तालसुरावर देवळादेवळांतून त्या वावरल्या. त्या काळच्या एखाद्या कृष्णराव मराठ्यांनी भगवंतांच्या स्त्रीवैपुल्याचा असा उल्लेख आणि उपयोग होताच पावित्र्य-विडंबनाची हाकाटी केली असेल का? नसेलही, कारण अनीतीचा गवगवा करणे हा ज्यांचा धर्म, ती वृत्तपत्रेच तेव्हा नव्हती. मात्र अजूनही त्याच शिळ्या लीलांना चालू संगीताची, आणि कधी रटाळ विनोदाची फोडणी देऊन कित्येक नाटककार आणि सिनेमावाले स्वार्थ आणि परमार्थ यांची चटपटीत सांगड घालीत असतात.

चोरी हा शब्द फारच व्यापक आहे. त्या कर्माच्या अनेक पातळ्या आहेत. 'सर्व खाजगी मालमत्ता ही चोरी असते,' असे म्हणणाऱ्या विचारवंताने त्याची सर्वांत संभावित पातळी सांगितली आहे. (असे काही म्हणणाऱ्याला आपण सहसा विचारवंत म्हणत नाही, ते सोडा!) दुसऱ्या टोकाला शेजारच्या मुलाचा खडूचा तुकडा अथवा खोडरबर खिशात टाकणारा मुलगा. नीती, संस्कार, इत्यादींबाबत फार दक्ष असणारे गुरुजी आणि पालक मुलाला शासन, निदान धमकीवजा उपदेश करतात.

पुस्तके चोरणाऱ्याची पातळी कोणती? म्हणजे इतर नगांप्रमाणे पुस्तके चोरून ती

तावडतोब जुन्या बाजारात विकून टाकणाऱ्या धंदेवाईक चोराची नव्हे. त्याला पुस्तके चपला, मंगळसूत्र सगळे सारखेच. तो सामान्य चोर–कशालाही हात घालणारा. पण खरा पुस्तक-चोर मिळेल ते पुस्तक चोरत नाही. तो चोखंदळ असतो; त्याला चांगल्या-वाईटाचा, पात्रापात्रतेचा विवेक असतो.

अशा जाणकार, अभिरुचिसंपन्न पुस्तक-चोरांतही दोन वर्ग आहेत. एकाला बंधन असते, ते पुस्तकाच्या लायकीचे; त्याच्या विषयाचे नव्हे. दुसऱ्याला आपला खास विषय सोडून इतर वर्ज्य ! मग ते पुस्तक कितीही थोर असो. वैद्यकीय व्यवसायातल्या स्पेशालिस्टासारखे आतड्यांचा सर्जन यकृताकडे ढुंकून पाहणार नाही. दंतवैद्य, रोग्याने जबडा कितीही वासला तरी त्याच्या वशाकडे काणाडोळा करतो. इतकेच काय, पण दंतवैद्यांतही, म्हणे, दोन पंक्ती असतात. एक 'ऑर्थोडोंटिस्ट (म्हणजे हाडवैद्य; वाकडेतिकडे दात कुंदकळ्यांसारखे करून देणारे कारागीर) आणि दुसरे 'पेरिडोंटिस्ट' (म्हणजे दातांचा परिसर साफ आणि टाक-ठीक करणारे). असो. एक दुसऱ्याच्या क्षेत्रात घुसणार नाही.

त्याचप्रमाणे इतिहाससंशोधक चोर कवितेच्या पुस्तकाला हात लावायचा नाही– मग ती कितीही श्रेष्ठ असो. (एरवीही त्याने कधी लावलेला नसणारच !) कायदेपंडित चोर इतिहासाच्या महान ग्रंथाला फडतूस कादंबरी मानील. (कित्येकदा त्यात तथ्यही असते, म्हणा !) पुन्हा हा खास विषय ऐसपैस नसतो. तो पोटविषय असतो. त्याचा जेवढा अधिक संकोच, तेवढा तज्ज्ञाचा अधिकारही मोठा. ज्ञानाच्या आपल्या गल्लीचा तो दादा; तिची त्याला खडान्खडा माहिती. इतर गल्ल्यांशीच नव्हे, राजरस्त्यांशीही त्याला कर्तव्य नसते. कोणी महायुद्धोत्तर युरोप हा मुलूख आपल्या व्यासंगासाठी तोडून घेतलेला असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी त्याला कर्तव्य नसते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला ज्याने स्वतःला वाहून घेतले आहे, त्याच्या बुद्धीला, इतर देश सोडाच, पण भारतातील इतर विभागही अस्पृश्य. फार कशाला, तिला पेशवाईचेही सोयरसुतक नसते. किंबहुना, महाराजांच्या इतिहासकाराला त्यांच्या प्रजेशी कर्तव्य नसते ! नसो. अशी आपल्या विषयाच्या नेमक्या अंगावर, गल्लीवर म्हणा, विद्वानांची अव्यभिचारी निष्ठा असते.

अशा निष्ठावंतांतही एक वेगळा पंथ आहे. त्याला आस फक्त दुर्मीळ पुस्तकांची. सहजप्राप्य पुस्तके त्याला तृणासमान असतात. नवे कोरे पुस्तक त्याला निषिद्ध असतेच; पण बांधणीत घट्ट असलेले, न काळवंडलेल्या आणि डाग किंवा भोके नसलेल्या पानांचे पुस्तक, किंबहुना संपूर्ण पुस्तक, त्याला संशयास्पद वाटते. पडके वाडे, अंधारमय माळे, कुबट पेटारे, हे त्याचे आनंदवन. त्याच्या वासावर विश्वनाथ काशिनाथ राजवाडे वणवण हिंडले. पण ते हस्तलिखितांसाठी. आपण बोलत आहोत पुस्तकांविषयी.

या पंथातील एका निष्ठावंत चोराविषयी मी अलीकडेच वाचले. त्याचे नाव खुदाबक्ष.

तो पाटण्याला न्यायाधीश होता; आणि न्यायाधीश म्हणून निःपक्षपातीपणाबद्दल त्याची मोठी ख्याती असे. त्याला दुर्मीळ पुस्तकांचे व्यसन लागले होते. त्याच्या तो इतका आहारी गेला होता, की त्यासाठी कसल्याही सूक्तासूक्त मार्गाचा अवलंब तो बिनदिक्कत करी. पुस्तके चोरून ती विकणाऱ्या सामान्य चोरांकडून ती राजरोसपणे खरेदी करणे हा तर (जवळजवळ) प्रामाणिक मार्ग झाला. अशा चोरांशी तो खेळीमेळीचे संबंध राखीत असे, हे सांगणे नलगे. पुस्तके मागून आणायची आणि ती परत करायची नाहीत, किंवा न मागताच ती उचलायची, हे दोन कमीअधिक रुळलेले मार्ग होतेच. पण न्यायाधीशमहाशयांनी आपली स्वतंत्र बुद्धी चालवून एक अकल्पित आडमार्ग शोधून काढला. तो असा : एखाद्यापाशी अशी मूल्यवान दुर्मीळ पुस्तके आहेत, आणि ती कडक बंदोबस्तात आहेत, हे समजले, की आपल्या हस्तकांकरवी त्याच्यावर कसला तरी खोटा खटला भरायचा. आणि मग उदारपणे न्यायमूर्ती त्या पुस्तकांचीच लाच घेऊन आरोपीला निर्दोष ठरवून सोडून देत. ही हिकमत कधी धोक्याची ठरे– विशेषतः पुस्तकांचा मालक ही मोठी असामी असली, तर! पण खुदाबक्षच्या चातुर्याला आणि ग्रंथासक्तीला अशी आव्हाने मानवत. त्याच्या बेडर, कल्पकतापूर्ण चातुर्याचे एक इस्से भी जादा उदाहरण नमूद आहे. कोणा एका मशहूर सूफी संताकडे एक फारच दुर्मीळ धार्मिक ग्रंथ असल्याचे त्याला समजले. तेव्हा त्या संताकडे जाऊन अति लीनतेने खुदाबक्ष त्याचा चेला बनला. आणि काही काळात त्याची मर्जी संपादून इष्ट ग्रंथ त्याने पठनासाठी मिळवला. पठन सावकाशीने, मन लावून केले, आणि स्वभावधर्माला जागून तो परत केलाच नाही. वैतागून गुरूने वरिष्ठ न्यायाधीशांपुढे चेल्याविरुद्ध तक्रार नोंदवली. वरिष्ठाने खुदाबक्षला हुकूम केला, की पुस्तक फौरन परत करावे आणि ते मिळाल्याची पावती आपल्यापुढे हजर करावी. खुदाबक्षने हुकुमाची तत्परतेने तामिली केली. एक जाडजूड पुस्तक त्याने इस्लामी रूढी पाळून हिरव्या वस्त्रात लपेटले आणि गुरूकडे ते पाठवून त्याची पावती मिळवली, आणि ती आपल्या वरिष्ठांकडे पाठवली. वस्त्र सोडून आतील ऐवज पाहिल्यावर गुरूने काय केले, ते मी वाचलेल्या पुस्तकात नव्हते. संतापाने तो हिरवानिळा झाला, की चेल्याची करामत पाहून त्याचा गुन्हा त्याने माफ केला, कोण जाणे!

दुर्मीळ पुस्तकांचा आपला प्रचंड संग्रह खुदाबक्षने मृत्युपत्रान्वये पाटण्यातील एका ग्रंथालयाला दान करून टाकला. त्या संग्रहाला त्याचे नाव दिले गेले; असा तो अमर झाला. मध्ये खूप काळ लोटला आहे. त्यांतील काही खुदाबक्षाच्या ग्रंथव्यसनामुळे त्या संग्रहाची कदाचित जर्जर अवस्था झाली असेल; नाहीसाही झाला असेल. असो. संग्रह नसला, तरी नावाची पाटी अमर आहे!

आपल्याकडेही अलिकडच्या काळात– अगदी कालपरवा– एक खुदाबक्ष होते. आणि ते त्या बिहारी खुदाबक्षाहून कितीतरी मोठ्या पदावर चढले होते. आपल्या खास विषयातील

त्यांची विद्वत्ता असामान्य होती; आणि त्यांचे ग्रंथप्रेम इतके गाजले होते, की ते हयात असतानाच त्याची दंतकथा झाली होती— पण चांगल्या अर्थाने आणि सार्थपणे. मात्र या ग्रंथप्रेमात थोडी 'खुदाबक्षी' होती, असे माहीतगारांकडून ऐकले आहे. त्यांच्या ज्ञान-साधनेबद्दल फार मोठा आदर बाळगणाऱ्या एका नामांकित ग्रंथपालावर आपल्या ग्रंथाल्या-तून यापुढे पुस्तके मिळणार नाहीत, असे त्यांना सांगण्याचा अवघड प्रसंग आला. त्या विद्वानाचा खाजगी ग्रंथसंग्रह कित्येक सार्वजनिक ग्रंथालयांहून मोठा होता. मात्र तो पाहून अचंबा करणाऱ्यांच्या मनात अशी शंका चुकचुकत असे, की त्या मोठेपणाला सार्वजनिक ग्रंथालये आणि इतर खाजगी संग्रह यांचा किती हातभार लागला असेल!

पण समजा, ती शंका खरी असली, तरी असाही विचार करावा, की त्या विद्वानाने जी पुस्तके अशी उचलली असतील, ती त्या मूळ सार्वजनिक ग्रंथालयात, आणि कदाचित खाजगी संग्रहातही, तशीच दुर्लक्षित होऊन बापुडवाणेपणाने, सुकत राहिली असती. वाळवी आणि तिच्या गोत्रातील कृमी यांनाच तिचा उपयोग झाला असता. पण त्यांच्या भाग्याने त्या पंडिताने त्यांची अर्थहीन, वांझ अस्तित्वातून सुटका केली—हरण, अगदी अपहरण केले म्हणा ना– आणि त्यांतील विचारांचे सत्त्व आणि सौंदर्य आत्मसात करून अधिक समृद्ध झालेले आपले ज्ञान मुक्तहस्ताने समाजाला दिले.

आपल्या बहुतेक सार्वजनिक ग्रंथालयांतील, ज्यांनी विचारधनात मौलिक भर घातली, असे म्हणता येईल, त्या पुस्तकांपैकी बहुतेकांची अशीच अवस्था असते. विशेषतः जुन्या पुस्तकांची. काही वाचक, आजतागायतपणा मिरवण्यासाठी का होईना, आपल्या विषयाची नवनवीन पुस्तके नेमाने हाताळीत असतात. जुन्या पुस्तकाचे मात्र कर्म कठीण. पुस्तक जेवढे अधिक जुने, आणि अधिक गहन, तेवढे कर्म अधिक कठीण. प्रत्येक ग्रंथालय हे अशा पुस्तकांची कबर असते.

अर्थात गहन विषयांच्या वाटेला न जाणाऱ्या आणि जुनी पुस्तके फुंकून टाकणाऱ्या व्यवहारदक्ष ग्रंथालयांना हे लागू नाही. पण खाजगी ग्रंथसंग्रहांपैकी जे शोभेसाठी असतात, किंवा केवळ वारसाहक्काने आलेले असतात, त्यांना हे खास लागू आहे. पुस्तके, म्हणजे पुस्तकांची कपाटे, हा दिवाणखान्याच्या सजावटीचा भाग मानणाऱ्यांची संख्या वाढत आहे —कारण गृहसजावटीची महागडी कलाही प्रगतिपथावर आहे. कपाटातील खान्यांच्या उंचीप्रमाणे आणि त्याच्या पॉलिशशी व सजावटीतील इतर नगांशी रंगसंगती साधेल, असा दर्शनी भाग, विशेषतः 'कणा' असलेली पुस्तके ते कटाक्षाने निवडत असावेत. या दृष्टीने इंग्रजी पुस्तके फार सोयीची. त्यांचे 'जॅकेट' कसे मोहक असते; जॅकेटशिवाय असतात, त्यांची बांधणी किती देखणी असते—त्यांचा अनेकदा 'सट' असतो. त्याने डोळ्यांचे पारणे फिटते. सहसा सुंदर रंगीत चित्रेही असतात. ती पाहुणे कौतुकाने, आणि

मुलेबाळे उत्साहाने पाहतात.

संस्कृतीचा वर्ख लावू इच्छिणाऱ्या एका नवश्रीमंताने, म्हणे, अशी खूप शानदार इंग्रजी पुस्तके खरेदी केली; मग त्याचा मातृभाषेचा अभिमान एकाएकी जागृत झाला. त्याने मराठीतील काही प्रतिष्ठादायक आणि जरा जाडजूड अशा पुस्तकांची यादी करवून घेतली. ती यादी पुस्तकविक्रेत्याकडे धाडताना शेवटी लिहिले :

'याशिवाय चार–पाच वाचण्यासारखी पुस्तकेही पाठवावीत.'

या जातीच्या पुस्तक–मालकांविषयी विक्टर ह्यूगोचे म्हणणे असे :

'आपल्याचकडे असलेली पुस्तके जो वाचीत नाही, ती त्याच्याविरुद्धचा सर्वांत मोठा संशयास्पद पुरावा होय.'

अशा कैदखान्यातून पुस्तकांची सुटका करणे हे पाप, की पुण्य ? मग तो कैदखाना कितीही वैभवशाली असो ! असे ऐकतो, की अशाच एका शोभिवंत संग्रहात एकत्र ठेवलेली चार–पाच पुस्तके गहाळ झाल्याचे ध्यानात आले. तेव्हा मालकाला फार दुःख झाले—कारण मधल्या मुंड्या जागेमुळे पुस्तकांची ती रांग विशोभित दिसू लागली. त्यातच योग्य आकाराची आणि रंगाची पुस्तके मिळविण्याइतका वेळही नव्हता. तेव्हा मालकाने तात्पुरती क्लृप्ती लढवली, ती अशी : गेलेल्या पुस्तकांच्या दर्शनी भागाइतक्या पुठ्ठ्यांवर ते रंगकाम हुबेहूब नावांसकट करून घेतले आणि त्या पुठ्ठ्याने रिकामी जागा, दुरून शंका येऊ नये, अशी छान भरून काढली. हे जरा अतिरंजित वाटते; पण ऐकले खरे !

पण नाही म्हटले, तरी थोराड पुस्तके उचलून नेणाऱ्याला, सदसद्विवेकबुद्धी म्हणतात, तिचा थोडा त्रास होत असावा. आणि ती न्यायलाही गैरसोयीची. एकोणीसशे पस्तीस साली छोटेखानी आकाराची आणि अति स्वस्त अशी 'पेंग्विन' पुस्तके निघू लागली—आणि पाहतापाहता खिशात मावणाऱ्या पुस्तकांची लाट आली. ती ओसरलीच नाही. अशी पुस्तके पळवायला आकाराने सोयीची आणि माफक किमतीची, म्हणून सदसद्विवेकबुद्धीलाही कमी गैरसोयीची. आणि, पळवणाऱ्यांचे सोडा, पण मागून नेणाऱ्या ( आणि परत करायला विसरणाऱ्या ) पुस्तकप्रेमींच्या डोक्याला अशी पुस्तके उगाच ताप देत नाहीत; जे वाचायला देतात, त्यांच्याही डोक्याला. 'Paperbacks make for friendship; hard-cover books make enemies.' हे वचन सत्य आहे, याची ग्वाही, पुस्तके देणारे आणि नेणारे दोघेही देतील.

—आणि या दोन काही स्वतंत्र, एकमेकांहून अलग अशा जाती नाहीत. आपली पुस्तके देणारा हा लोकांची आणत असतो; आणि नेणारा ( त्याच्यापाशी असलीच, तर ) आपली देत असतो. नेणाऱ्यांची संख्या अधिक, एवढेच. पुस्तक मागून नेताना त्या सर्वांच्याच मनात काळेबेरे असते, असे नव्हे. आरंभी ज्या दोन श्रेष्ठ चोरांची उदाहरणे दिली आहेत.

तसे थोडे ! म्हणून ते श्रेष्ठ. आणि सामान्य चोरही फार नसावेत, कारण चोरीचा खटाटोप करून शेवटी हाती फार थोडे लागत असते. पण एरव्ही सभ्य, सोज्ज्वळ, सच्छील, वगैरे माणसाच्या मनाचीही सुंदर पुस्तकाने चलबिचल होते– जशी व्रतस्थ ब्रह्मचाऱ्याची सुंदरी-दर्शनाने. ती सौंदर्याला दाद असते. मन मरगळलेले नाही, याची साक्ष असते. इतकेच, की अधिकाधिक परिचयाने पुस्तक अधिकाधिक सुंदर वाटू लागते.

एक गमतीचा योगायोग असा, की हा लेख लिहीत असतानाच श्री. पु. ल. देशपांडे यांचे पत्र आले. ग्रंथालयातून आणलेले एक पुस्तक परत करावे लागले; त्याविषयी ते म्हणतात :

> " खरं तर, हे पुस्तक हातातून जाऊ देणे जिवावर येते. किंमत-दंड, इत्यादी भरून दडपावे, असाही एक विचार मनात आला. परदेशी मित्रांना पत्रे पाठवून एखादी कॉपी मिळते, की काय, ते पाहिले; पण व्यर्थ. अशा वेळी ग्रंथप्रेमी ×××ची आठवण येते. दुर्मीळ पुस्तके त्यांच्या हाती कशी हातोहात येत असत. असो. गेली ती आदरणीय ग्रंथप्रेमी माणसे. ह्या बाबतीत तुम्हांला काही चलाखी करता येत असल्यास पाहा. लोकं कशी शंभर शंभर कोटी रुपये हडपतात—आपल्याला एक पुस्तक दडपता येत नाही. जाऊ दे. "

मला हीच काय, कोणतीच चलाखी करता येत नाही. 'कोणतीच' हे मात्र सर्वस्वी खरे नाही. काही बारीकसारीक बाबतींत मी चलाख असल्याचे माझी पत्नीही कबूल करते. उदाहरणार्थ, मासळी खरेदी करणे, टेलिफोन नंबर शोधून काढणे, इत्यादी. पुस्तकाआड दडून राहिलेली झुरळे मारणे ही आणखी एक बाब. नुकताच आमच्याकडे झुरळ—संहाराचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात झाला. त्यात पुस्तकांची उलथापालथ करताना सात—आठ पुस्तके अशी आढळली, की ज्याच्यावर दुसऱ्या कोणाचे तरी नाव आहे, किंवा एखाद्या ग्रंथा-लयाचा शिक्का आहे. ही पुस्तके माझ्यापाशी अनेक वर्षे असावीत, असे झुरळांच्या आणि वाळवीसारख्या कृमींच्या कित्येक पिढ्यांनी त्यावर उठवलेल्या खुणांवरून वाटते. नक्की काही आठवत नाही. ही पुस्तके दुर्मीळ नाहीत. पण मला ती फार आवडली असावीत ! अजून आवडतात !

# वाळीत टाकलेला मोठा लेखक

मामा वरेरकर गेल्याला दहाच वर्षे झाली; पण शे–पन्नास वर्षे लोटल्यासारखी, त्यांची स्मृती फिकट होऊन गेली आहे. अर्थात हे अनपेक्षित नव्हते ! त्यांची एकंदर साहित्यिक हयात छप्पन वर्षांची. त्यातील पूर्वार्धात तरी त्यांच्या काही नाटकांना रंगभूमीवर यश लाभल्यामुळे त्यांच्या नावाभोवती थोडी झळाळी होती. रंगभूमीच्या झळाळीबरोबर पुढे तीही मावळली. उरले जुने दुस्वास आणि दूषित ग्रह आणि त्यांतून निपजलेली कुचेष्टा. तिला जोर चढत गेला. एकंदरीने त्यांचे नाव वृत्तपत्रांतून कोठे आलेच, तर ते सहसा कुचेष्टेसाठीच येई. एरव्ही त्यांची संपूर्ण उपेक्षा झाली. त्यांच्या मृत्यूनंतर कुचेष्टा थांबली–तसाच एखादा रोगट लेखक सोडल्यास ! म्हणजे तिच्या निमित्तानेही त्यांचे नाव येईना ! साहित्यिक जमातीने त्यांना जवळजवळ वाळीतच टाकले—अगदी त्यांच्या सगळ्या पुस्तकांनिशी !

मामांच्या पुस्तकांची संख्या पावणेदोनशे आहे, हे सुद्धा आज बहुतेकांना ठाऊक नसेल. म्हणून त्यांची वर्गवारीही देतो–उलटीकडून सुरुवात करून. रहस्यकथा पंचवीस—त्या अनुवादित असणार : आपली ती परंपराच आहे. हे लेखन विसरावे, असेच आहे. मामाही त्याचा उल्लेख सहसा करीत नसत. पण त्याचे स्मरण राहावे, ते एका विषादकारक गोष्टीसाठी. मामांना आपत्काळी दुपारची भ्रान्त पडे, ती निभवून नेण्यासाठी ही लेखनकामाठी त्यांना करावी लागली. तीही साठीच्या आसपास ! नंतर बंगालीतून केलेली भाषांतरे.

मामांनी संपूर्ण शरच्चंद्र ( ३६ कादंबऱ्या ) आणि संपूर्ण बंकिमचंद्र (१४ कादंबऱ्या) मराठीत आणले. तसेच प्रभातकुमार मुखर्जींच्या २ कादंबऱ्या. याशिवाय रवीन्द्रनाथांच्या नाटकांचे दोन खंड, कथांचा एक आणि निबंधाचा एक. यांतीलही कित्येक भाषांतरे मामांनी पोटाच्या आचेने केली असतील, म्हणून त्यांत डावेउजवे असणारच. पण त्यामागील सातत्य आणि बंगालीविषयीची निष्ठा मनात ठसल्याशिवाय राहत नाही. आपल्या एका देशी भाषेतून दुसऱ्या देशी भाषेत इतकी सत्तावन-पुस्तके कोणी उतरली असतील, असे वाटत नाही. किंबहुना सर्वांनी केलेली भाषांतरे देखील कदाचित एवढी भरणार नाहीत ! मामांची ही भाषांतरे परिपूर्ण नसतील; पण परिपूर्ण भाषांतरांचा आपल्याकडे मुळीच सुकाळ नाही. इंग्रजी ही आपल्या बहुतेक भाषांतरांची गंगोत्री—उघड किंवा छुपी ! ती भाषा आपण दीडएकशे वर्षे शिकत आहोत; तरीसुद्धा तिच्यातून केलेल्या बऱ्याच भाषांतरांतील अर्थाची कुतरओढ पाहिली, की मामांना थोडीफार सूट द्यावी लागेल. त्यांना दुवा द्यायचा, तो अशासाठी, की मुख्यतः त्यांच्यामुळे त्या श्रेष्ठ बंगाली कादंबऱ्या मराठी वाचकांपर्यंत पोचल्या; आणि यासाठीही, की त्यात कोठे शब्दांचा नेमकेपणा हुकला असला, तरी शरच्चंद्रासारख्यांचा खास ढंग आणि गंध समरस होऊन मामांनी या भाषांतरात जतन केला.

मामांनी ४७ नाटके लिहिली—त्यांतील एकच अनुवाद आहे. तो म्हणजे इब्सेनच्या Doll's House चा ' खेळघर ' हा. आणि एकांकिकांचे तीन संग्रह. यांतील निम्म्याहून अधिक नाटके आपली जुनी रंगभूमी पांगळी झाल्यावर लिहिली गेल्यामुळे त्यांपैकी काही रंगभूमीपर्यंत कधी पोचलीच नाहीत; तर जी पोचली, त्यांची धाव पाच—दहा प्रयोगांपलीकडे गेली नसेल. पण जुनी रंगभूमी जोसात होती, त्या काळातही, म्हणजे तिच्या ' सुवर्णयुगा 'त— मामांची फार तर पाच—सहाच नाटके ' धंदेवाईक ' दृष्टीने यशस्वी झाली. तेव्हा उत्तम धंदा केला, तो मुख्यतः एका विशिष्ट जातीच्या नाटकांनी. पौराणिक, किंवा पुराणात खपून जाईल, असे ऐतिहासिक वा काल्पनिक—कथानक; त्याला शोभतील, आणि बहुसंख्य प्रेक्षकांना रुचतील, असे नीतिपाठ; आणि पचेल असा विनोद या साजाला अनुरूप अशी नाटकी भाषणे. पण हुकमी यशाच्या अनुपानातील हे गौण घटक. मुख्य घटक म्हणजे संगीत. गाणारे नट आणि त्यांना तालीम देणारे बुवा यांच्या सोयी—मागण्या पुरविणारी पदे आवश्यक असत. त्या पदांना अर्थ असावा, ' शारदा ' किंवा ' सौभद्र ' नाटकांतल्या पदांप्रमाणे ती गद्यभागाशी एकजीव व्हावीत, अशी फारशी अपेक्षा नसे. त्या जातीच्या नाटकांची आता पुन्हा एकदा चलती आहे. असो. अशा त्या रंगभूमीवर मामांनी महान क्रांती घडवून आणली, हे म्हणणे अगदीच साहित्यिक ठरेल ! पण या रंगभूमीचा मोहरा आधुनिकतेकडे वळवण्याची ईर्ष्या धरून आपल्या कुवतीप्रमाणे मामांनी धडपड केली. आपल्या रंगभूमीच्या सुधारकांत कालक्रमाने ते पहिले ठरतील, आणि इतर क्षेत्रांतील आद्य सुधारकांप्रमाणे ते निंदाटवाळीचे धनी झाले ! त्यांचे ' हाच मुलाचा बाप ' १९१६ सालचे.

हुंड्याच्या चालीनें गांजलेल्या एका बंगाली मुलीने आत्महत्या केली, या ताज्या घटनेतून ते नाटक स्फुरले. या ताजेपणाचेही दूषण झाले; कारण रंगभूमीने आपल्याला भोवतालच्या जीवनाचा विसर पाडावा—फार तर धूसर रूपकाच्या दूरान्वयाने तिने प्रचलित राजकारण मांडावे, एवढेच कार्य तिच्यावर सोपवले होते. यापलीकडे समकालीन लोकचरिताशी तिला कर्तव्य नव्हते. मामांनी हा दंडक धुडकावला; विषयाचे सोवळे पाळले नाही. 'सोन्याच्या कळसा'त मजुरांची चळवळ आली; 'सत्तेच्या गुलामा'त गांधीजींच्या असहकार चळवळीतील 'खेड्यात जा' आणि 'कोर्टावर बहिष्कार घाला' ही दोन सूत्रे आली; 'अपूर्व बंगाल'मध्ये देशाची फाळणी आली. 'सिंगापुरातून' आणि 'चला व्हाईवर' यांत दुसरे महायुद्ध आणि भारतीय स्वातंत्र्य हा विषय आला. ही काही उदाहरणे. ही नाटके प्रचारकी आहेत, नाटककाराला त्यांतून तुमच्या गळी काही उतरवायचे होते, हे त्या नाटकांवरील आरोप फारच लोकप्रिय आहेत. नव्या विषयांवर मामांना काही नवे सांगायचे होते—ते तुम्हांला पटो, न पटो—त्यासाठी त्यांनी रंगभूमीचा उपयोग केला, हे खरे. शिळ्या विषयांवर शिळेच सांगणाऱ्या हरदासी नाटकांवर ज्यांची रुची पोसली होती, त्यांना हे नवेपण न बोचते, तरच नवल. कलावाद्यांनाही ते बोचले; तेही साहजिक होते!

तेच संगीताविषयी. आपल्या नाटकांवरील पदांचा भार मामांनी कमी कमी करत शून्यावर आणला. याचे महत्त्व समजायला त्यावेळची परिस्थिती ध्यानात घ्यायला हवी; आणि गाण्याची आतशबाजी पुरवल्याशिवाय गल्ला जमणे कठीण असताना लेखणीवर जगणाऱ्याने गाणी छाटावीत, यालाही फार महत्त्व आहे.

भाषेची आतशबाजी ही भाबड्या रसिकांची दुसरी मागणी. मामांनी तीही झिडकारली. त्यांची भाषा साधी आहे, तिला अलंकाराचे वावडे आहे; आणि तिच्यात जिवंत बोलभाषेचा ठसका आहे.

मामांच्या कथा—कादंबऱ्यांची भाषाही तशीच आहे. कादंबरीसाठी ललित, म्हणजे गुळगुळीत भाषा वापरावी, हे तंत्र तेव्हा जारी होते. ते न पाळण्याचा धोका मामांनी पत्करला. विषयही गुळगुळीत असावा, ना-पोर, ना-तरुण अशा अर्ध्यांकच्च्या वयातील वाचकांना गुदगुल्या कराव्या, त्यांच्या दिवा-स्वप्नांची सोय करावी, यांसारख्या यशस्वी कादंबरी—लेखनाच्या फॉर्म्युल्यांचीही त्यांनी पत्रास बाळगली नाही. याचे बक्षीस त्यांना अर्थात मिळालेच. एकोणतीस कादंबऱ्या लिहूनही त्यांची गणना प्रमुख कादंबरीकारांत होत नाही; आणि त्या कोणी फारशा वाचत नाही. त्यांत विषयांची विविधता आहे, व्यक्तींची आहे. हेच चुकले असावे. एकाच वेटाळ्यातून डझनावारी कादंबऱ्या पाडणारा लेखक आपल्या मालाचे ग्राहक बांधून ठेवत असतो; या ग्राहकांपैकीच काही टीकाकार असतात. मामांचे पाच कथासंग्रह आहेत; पण कथाकार म्हणून त्यांची नावनिशाणी उरली नाही. त्यांच्या अनेक कथा—कादंबऱ्यांत कोकणी लोकांचे रसरशीत चित्रण आहे; पण त्यांचे हुकलेच! त्या काळी त्यांच्या कोकणच्या अभिमानाची टवाळी झाली; आता त्या

अभिमानाचे प्रादेशिकता म्हणून कौतुक झाले असते !

पण मामांच्या पंधरा-सोळा कादंबऱ्याची तरी हिंदी वा गुजरातीत भाषांतरे झाली आहेत; आणि त्या साहित्यात त्यांना मानाचे स्थान आहे; आणि बहुतेक भारतीय भाषांतील साहित्यिक त्यांना मोठ्या आदराने वागवीत—अर्थात मराठी सोडून. मामांच्या मृत्यूनंतर सात–आठ महिन्यांनी 'लहर' या अजमेरच्या हिंदी मासिकाने त्यांचा गौरव करणारा दोनशे पानांचा अंक काढला. त्यात हिंदीच नव्हे, तर बंगाली, गुजराती, मल्याळी, उडिया, इत्यादी भाषांतील श्रेष्ठ साहित्यिकांनी मामांचे गुणगान केले. मराठीत आजवर त्यांच्याविषयी झालेले एकूण लेखन–म्हणजे निंदा न करणारे लेखन–इतके भरेल, असे मला वाटत नाही.

मामांच्या घरी—मुंबईतील वा दिल्लीतील—अनेक भाषांतील साहित्य आणि रंगभूमी-वरील माणसांची ये–जा असे. मराठीपुरते बोलायचे, म्हणजे कामगार रंगभूमीवरील नट आणि लेखकही त्यांत असत. मामांचे या सर्वांशी ऋणानुबंध होते—सर्व भाषांशी, सर्व वर्गांशी. आंतर-भारतीचा आदर्श तेथे काहीसा प्रत्यक्षात उतरे !

## पुरुषजन्मा, ही तुझी कहाणी !

पुस्तकसंख्येची वाढ बेसुमार होत आहे, कागदाचा पुरवठा अपुरा पडू लागणार आणि पुस्तके ठेवायला जागा नाही, अशी स्थिती येणार, या जागतिक संकटावर उपाययोजना म्हणून पुस्तक–नियमन ( किंवा नियोजन ) कसे करावे, याचा विचार करण्यासाठी विद्वानांची परिषद भरली होती. कोणत्याही परिषदेप्रमाणे तेथेही पुष्कळ गुळमुळीत, गैरलागू आणि वक्तृत्वपूर्ण भाषणे झडली, तरी मूळ मुद्दा लोंबकळतच राहिला, तेव्हा कोणी एक निःस्पृह आणि फटकळ विद्वान निर्धाराने म्हणाला,

" जालीम उपाय एकच : स्त्री हा लेखणीचा विषय म्हणून त्याज्य समजावा. ही बंदी पाळली, तर पुस्तकांची निपज खाडकन् उतरेल. "

असला निर्वाणीचा निर्णय ह्या परिषदेला पचला नाही, हे सांगणे नलगे.

—आणि तो कठीणच आहे पचायला. तो ऐन गळ्यालाच हात घालतो. कोणता हाडाचा ललितलेखक असले कठोर पथ्य पाळील ? इतर लेखकांचे सोडा. त्यांची निर्मिती खुरटी, आणि तीही कपाटशोभेसाठी. अर्थात त्यांच्यापैकीही कित्येकजण मागील दाराने ललित्याचा सोस करतात, पण ते सच्चे नव्हेत, सोंगाडे. आजपर्यंतचे साहित्य पाहा, कोठेही तेच. युरोपचा वाल्मिकी होमर, त्याचे महाकाव्य ईलिअड म्हणजे ग्रीक सुंदरी हेलन हिची सुरस कहाणी. ' जा जरा पूर्वेकडे '. चिनी आद्य कवी वॅन्ग त्से फू ( टोपण नावः चौ फुयांग ) याने खिस्तपूर्व एकविसाव्या शतकात मिंग लू या राजकन्येच्या प्रणय–प्रकरणावर

म्हणे 'शंभर शब्दफुले उमलू दिली.' एकेक फूल तीन सहस्र ओळींचे. (नायिकेचे पाऊल फक्त पावणेपाच इंची असल्याचा प्रत्येक ओळीत खुबीदार उल्लेख आहे, म्हणतात.) प्राचीन इजिप्तचे तसेच काही आहे, असे ऐकतो. आपल्या आर्यावर्तात तेच. रामायण हे शेवटी सीतेचे, राम हा वनवासाचा धनी. (आणि रामकथेचा जो नवीन अन्वय लावला जात आहे, त्यामुळे खलपुरुष रावण, की तो, असा संदेह निर्माण होऊ लागला आहे. रामराज्याच्या कल्पनेचेही जरा हसेच होत आहे.) महाभारतातही कौतुक आहे, ते द्रौपदीच्या पंच-भर्तृक योजनेचे! ही प्राचीन, प्रातःस्मरणीय उदात्त महाकाव्ये, मग लैंगिक लघुकथा, काव्यांचे काय, आणि तेही अर्वाचीन? त्यात स्त्रिया जेठा मारून बसणारच. फार मागे जा, हवे तर. पुराणांची तीच चालचलणूक आहे. ग्रीक पुराणे तर ओवळ्यानेच वाचावीत. आणि आपली पुराणे आपण सोवळ्यात गुंडाळून ठेवत असलो, तरी ती काही 'लहानथोर स्त्री–पुरुषांनी एकत्र बसून वाचण्याजोगी' आहेतच, असे शपथेवर सांगणे कठीण. या सोवळ्या–ओवळ्याचे धागे शेवटी पोचतात, ते पौराणिक स्त्रियांपर्यंत (म्हणजे देवींपर्यंत), हे कटाक्षाने सांगावे, असे नाही.

असो. हा पौराणिक, ऐतिहासिक, जागतिक वा वैश्विक व्याप आवरून ठेवावा आणि आपल्या घरामाजघरापुरते पाहावे, अगदी मराठी आणि महाराष्ट्र यांपुरते, आणि तेही आजकालच्या. आपल्या साहित्यात आणि संसारात स्त्रीचा किती बडिवार आहे, आणि तो का, हे स्वच्छ नजरेने तपासले पाहिजे. विशेषतः साहित्यात, कारण त्याचे प्रतिबिंब पाहता पाहता संसारात उमटत असते. छापल्याबरहुकूम संसार करण्याची कसोटी कमीअधिक प्रमाणात सर्वत्र आहे...

'मनोरंजन' मासिकाचे ब्रीदवाक्य 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' असे होते. सरसकट आधुनिक साहित्यावर त्याचाच पगडा चालत आला आहे. नारीपूजा हा जणू स्थायिभाव, इतका, की 'नारी' हा भुंडा शब्द पूजेचा भाव बिघडवू लागला. 'स्त्री'चा एकाक्षरी तुटकपणा नकोसा वाटला. म्हणून महिला, ललना, वनिता, असली तलम पैदास सुरू झाली. युवती शब्दाचाही सैल आणि सर्रास वापर होऊ लागला. बोलताना 'बाई' म्हटले, तरी लिहिताना तिला महिला वा ललना करायचे. पण का? आपल्या वृत्तपत्रांतील मथळे आणि बातम्या या दृष्टीने तरी वाचनीय असतात. 'केळीवाल्या महिलेस अटक' किंवा 'फणसवाडीत काल संध्याकाळी दोन युवतींनी एकमेकींच्या झिंज्या ओढल्या, ते नेत्रदीपक दृश्य पाहण्यात शेकडो ललना जमल्या होत्या', इत्यादी. या शब्दलालित्याचे परिणाम हसून विसरण्याइतके वरवरचे नाहीत. आपला मनःपिंड बाळपणापासून बराचसा भाषाविषयावर पोसलेला असतो. शब्दब्रह्माचा बाऊ मानगुटीला असतो. तेव्हा शब्द आणि अर्थ यांतील तफावतीची समज येण्यापूर्वी (म्हणजे पन्नाशीपूर्वी) आपली अशी हिरवट निष्ठा असते, की ज्या प्राणिविशेषाला 'ललना' इत्यादी नाजूक नावे आहेत, तो अतीव मधुर आणि त्रिकाळ भक्ती करण्यासारखा असतो. 'भावबंधना'तील महेश्वर हा काही जगावेगळा खुळा नव्हे. कथा-काव्यादींच्या अति-

रिक्त आणि भाविक वाचनामुळे तारवटलेल्या कल्पनेने स्त्रीकडे पाहणारा हा प्रेमी गल्लोगल्लीत आढळेल. त्या नशेत कोणतीही स्त्री त्याला देवीसमान भासते, आणि तिच्या सेवेत आपल्या जिण्याचे साफल्य आहे, अशी त्याची श्रद्धा असते. स्त्रीशरण साहित्याच्या असल्या कारवाईस आता चित्रकलेचीही चिथावणी आणि मदत असते. सुमार कल्पनाशक्तीच्या प्रेमिकाला देवी-रूपाची जमवाजमव करण्याची मानसिक यातायातही नको. दलाल-मुळगावकर त्या देवीचा लहान-मोठा स्वर्गीय तपशील रंगरंगांत खुलवतात. संपूर्ण नग समोर हजर. महेश्वर चाळीस वर्षांमागचा, त्याच्या बॅगमध्ये फार तर एखादा दुसरा फोटो असेल (त्याच्या तापलेल्या डोक्यातील गरगरता मीनाबाजार सोडून द्या !), आजच्या महेश्वरापाशी मुखपृष्ठांची चळत असते. किंबहुना त्याची वाचनलालसा मुखपृष्ठापाशी थबकते, आणि त्याभोवती पिंगा घालते. या स्त्रैण प्रवृत्तीला शह म्हणून पुण्याच्या एका सोज्ज्वळ मासिकाने वर गाईचे चित्र दिले. पण युगमहिमा असा, की ती तिरंगी गाय अकारण पुष्ट आणि रेखीव होऊन अगदी ' युवती 'सारखी दिसू लागली.

साहित्याचा हा स्त्री-गंड तसा सनातन आहे; आता तो चेकाळला आहे, इतकेच. नायकाशिवाय कादंबरी होऊ शकते, म्हणे, नायिकेशिवाय नव्हे. प्रा. ना. सी. फडके तंत्राचे प्रयोग सांगूनसवरून करीत आले आहेत, पण नायिकेशिवाय कादंबरी किंवा काहीही लिहिण्याचे ते धाडस करतील, असे वाटत नाही. निदान नायिकेइतके नायकाचे त्यांनी वर्णन केले, तरी खूप झाले. ' राजकीय ' कादंबरी हट्टाने लिहिणाऱ्यांचे काय झाले ? त्यातील बाईला ( किंवा ललनेला ) निराळे मखर दिले फक्त. कोणी नवाईसाठी ' ग्रामीण ' साज चढवला. आता, जीवनाचा सखोल शोध घेणारी, अंतर्मनाची चित्तंबातमी सांगणारी, अनुभवाच्या विविध पातळ्यांचे ' काहीसे ' करणारी नवी कथा घ्या. तिच्याही शोधाचे वळण स्त्रीच्या अंगानेच अधिक असते आणि ते वास्तव नाही, असे कोण म्हणेल ? महिला मंडळांसाठी पुरुषपात्रविरहित, अथवा शाळकरी मुलांसाठी स्त्री-पात्रविरहित नाटिका, त्याप्रमाणे पुरुषांसाठी ' स्त्रीपात्रविरहित ' कादंबरी कोणी लिहिली, तर वाङ्मयाच्या नवतेत भर पडेल. एरव्ही, आपले बरेचसे ललित वाङ्मय स्त्रियांविषयी, जणू स्त्रियांनी आणि स्त्रीवजा पुरुषांसाठी लिहिलेले असावे, अशी कधी कधी टीका येते. नाटकांचे आठवले. आपल्या कित्येक जुन्या श्रेष्ठांची नाटके नायिकेवरच बेतलेली नाहीत का ? कित्येक नव्यांचीही. फरक इतकाच, की त्या जुन्या नायिका ' स्त्री-पार्टी ', नव्या खुद्द स्त्रियाच ! एकूण साहित्याचेच महिला-मंडळ होत आले !

हे कथा-कादंबरीचे. मग काव्याचे काय पुसावे ? थोडे अपवाद सोडल्यास असे दिसेल, की विषय कोणताही असो, अंती ब्रह्म एकलेच : स्त्रीब्रह्म. त्याचेच स्तोत्र वाजत असते. कधी सरळ, कधी आडवळणाने. सरळसोट ( कंकण घाटाची ) प्रेमकविता, किंवा राधा-कृष्णाची आध्यात्मिक डूब देऊन बनविलेली, किंवा प्रतिमांच्या गुंतवळ्यात छपविलेली.

रूपकाचा पायघोळ बुरखा आहेच. गोविंदाग्रजांच्या वृक्षाच्या नशिबी ' इश्काचा जहरी प्याला ' आला, तो विजेसाठी. माधव जूलियनांचा डोह नदीसाठी सुक्त होता, कुसुमाग्रजांच्या पृथ्वीने सूर्यासाठी जीव टाकला, तर मर्ढेकरांच्या डांबरी फलाटदादाने चक्क आगगाडीसाठी. असल्या पडदानशीन प्रेमाचा काही हवाला देता येत नाही. या सगळ्या साहित्यातील गृहीततत्त्व हेच, की स्त्री ही निष्पाप, प्रेमळ, कोमल, विनयशील. कधी कठोर झालीच, तर ती अजाणपणे वा अगतिकतेने, निदान हुलकावण्या दाखविण्याच्या अल्लडपणामुळे. ती प्रेमळपणाचीच दुसरी बाजू!

ही स्त्री–प्रशस्तीही क्षणभर स्वीकारता येईल; पण तिचा उपसिद्धांत तेवढा साधाभोळा नाही. तो म्हणजे पुरुष हा पापी, स्वार्थी, दुष्ट आणि अरेराव. पाजीपणाचे कंत्राट त्याच्याकडे. साहित्यात खलपुरुषांची लंबीचौडी फौज खडी आहे. पण समस्त खलस्त्रियांचे हळदीकुंकू करायचे म्हटले, तर मुंबईच्या चाळीतल्या खोलीतही दाटी होणार नाही. पतिव्रतांची भक्कम यादी हरएकाच्या नित्यपाठात; सच्छील पुरुषांची नावनिशाणी उरली नाही. किंबहुना, पतिव्रता याला विरुद्ध–लिंगी शब्दच भाषेत नाही! पु.भा.भाव्यांसारखा पुरुषांचा पाठीराखा भाषाप्रभूही तसा शब्द आजवर बनवू शकला नाही! पवाडे काय ते स्त्रीच्या पुण्याईचे, पुरुषाच्या फार तर शौर्याचे; पण त्या शौर्यालाही तिचीच पुण्याई आणि स्फूर्ती कारणीभूत हा बुला संकेत आहेच! सिंधूच्या सद्गुणांचे दळण आणि रडगाणे तीन पिढ्या गाजत आले. सुधाकर केवळ तिला विरोधाने उठाव देण्यासाठी, सबबवजा! त्याच्या दुर्दैवाची तमा नाही. वसुंधरेच्या मानाने भूपालाचा काहीच गाजावाजा नाही. जणू स्त्रीचे पावित्र्य क्रियाशील (active) आणि पुरुषाचे क्रियाशून्य (passive); पापात मात्र उलट. तेथे पुढाकाराची मिरास पुरुषाची; स्त्री ही सक्तीची सोबतीण. ती फसते, तो फसवतो. अशी ही पापपुण्याची लिंगभेदाने वाटणी : सोपी आणि सुटसुटीत.

स्त्रियांविषयी बोलताना गहिवर चढवायचा एक जुना खात्रीचा गुणकारी उपाय आहेच. तिच्या विविध रूपांपैकी मातृरूपाविषयी गळा दाटून बोलणे हा तो उपाय. ' हे माते ' (अथवा आई) हा नाटकी हंबरडा अजूनही कोणीतरी नव्या उमाळ्याने फोडीत असतोच. ' स्त्री ही अनंत काळची माता असते ', असा अत्र्यांनी विनोद केला. तो धूर्त स्त्रिया आणि भोळसट पुरुष या युतीच्या प्रभावाने बोधवचनात जाऊन बसला. ' पुरुष हा अनंत काळचा पिता असतो ' असे अत्रे म्हणाले असते, तर जो तो खदखदून हसला असता. वस्तुतः दोन्ही विधाने सारखीच मौजेची; पण पुरुषांच्या लाचारीमुळे पहिल्याचे भाग्य फळफळले. ' पुरुष हा क्षणाचा पती असतो ' हे मात्र पुष्कळसे खरे; पण ते बोलायचे नाही! असो. आईप्रमाणे बापावर कोणी कविता रचीत नाही; पितृप्रेमावर कधी परीक्षेत प्रश्न पडायचा नाही. मातृदिनाची मुलांना सुटी आणि त्या दिवशी सभासमारंभ. पितृदिन कोणाच्या ऐकिवात आहे? पितृपक्ष असतो, पण तो सुतकी सोहळा. ही पित्याची पुल्लिंगी परवड.

तीच विषमता बंधुभगिनीसंबंधांत; भगिनीचा भाव चढा.

दैवाची वक्रगती अशी अजब, की न्याय हवा, समता हवी, ही आरोळी स्त्रियांच्या बाजूने होत आली आहे; त्यातही उपरोध असा, की त्या ओरडीत सर्वांत अधिक आणि सर्वांत मोठे आवाज पुरुषांचे असतात. स्त्रियांचे पुजारी ही पुरुषाची दुरवस्था निसर्गाच्या दाबाने होते, असे म्हणता येईल; पण स्त्रियांचे कैवारी ही शंकास्पद अवस्था केवळ मानसिक पोकळीमुळे होत असावी. हे कुऱ्हाडीचे दांडे जाणूनबुजून आपल्या गोताचे काळ होत असतील, हे खरे वाटत नाही.

पन्नास–पाऊणशे वर्षांपूर्वी अशी आवई उठली, की स्त्रीवर्गावर घोर अन्याय होत आहे. त्यापूर्वी शतकानुशतक स्त्रियांच्या छळाची करुणरम्य कवने आपण ऐकली होती; त्या साध्वींबद्दल आदर बाळगून होतो. पण आता संपूर्ण स्त्रीवर्ग चिरडला जात असल्याची भाषा होऊ लागली. तीही अतिशयोक्तीच्या भडक अलंकारासाठी नव्हे, तर वस्तुस्थितीचा उच्चार, म्हणून. आणि तेथून या विक्षिप्त वर्गविग्रहाला आरंभ झाला आहे. एका यमूचे दुर्दैव ओढवले, म्हणून समस्त स्त्रियांनी केविलवाणे दिसण्याचे काय कारण ? पण लक्षात कोण घेतो ? मला वाटते, यमूचे दुःख एकाग्रतेने समजून घ्यायचे, त्याऐवजी आपली सहानुभूती सगळ्या स्त्रीजातीत पांगून टाकल्यामुळे तिची आबाळ होते. त्याने ती अधिक कष्टी होत असेल बिचारी. शंकरमामंजी पुरवले, पण हे पढत-रसिक नकोत.

यमूचे कमनशीब तेथेच थांबले नाही. तिचे नाव सांगणारी पुस्तकी प्रजा वाढू लागली. तिला अजून खंड नाही. स्त्रियांचा उद्धार करण्याच्या एकुलत्या कार्यासाठी त्यांनी अवतार घेतलेला असतो. अशा अवतारी पुस्तकांच्या पुण्याईनेच समाज सुधारल्याचे आपण ऐकतो. स्त्रियांचा उद्धार ही अव्वल सुधारणा. (या स्त्रियादेखील खरोखरच सर्व मराठी स्त्रिया नव्हेत; हा पांढरपेशांतील एक गट, म्हणजे पोटवर्ग!) उद्धार आणि रक्षण करायचे कोणापासून ? अर्थात पुरुषांपासून. खल तोचि! तिच्या सर्व खऱ्याखोट्या व्यथांची जिम्मेदारी त्याची. अक्षरओळख झाल्यापासून हे बाळकडू मिळाल्यामुळे पुरुषद्वेष रक्तात भिनतो. स्त्रीपेक्षा पुरुषांच्या अधिक, कारण त्याच्या रक्तात कोण्या एकेकाळी आपल्या रानटी पूर्वजाने (स्व) स्त्रीशी केलेल्या दंडेलीची अंधूक स्मृती आणि त्याबद्दलची उपरती या आलटून पालटून चाळवत असतात. लेखणीशी लगट जमत असली, तर तो परतफेडीच्या उदात्त अवसानात स्त्रीदास्यविमोचनाच्या गर्जना करतो आणि तिच्या वेदनांनी कण्हतो.

हरिभाऊ आपट्यांपासून आजतागायत हे स्त्री–रक्षण–व्रत अनेक पुरुषांनी नेकीने पाळले आहे. त्यांत स्त्रियाही आहेत. विभावरीचे कढत निःश्वास अजून निवले नाहीत. ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' असे कोठे मनु चुकून बोलून गेला, त्यावर केवढा गहजब. तो डाग मनूच्या पुत्रांना अजून चिकटून आहे. ही समाजरचना, म्हणे, पुरुषांची. स्त्रीला त्यात स्थान नाही. तिचा स्वाभिमान जागृत झाला ( १९३४ मध्ये) आणि ती तरातरा घराबाहेर पडली. ती ज्या बाहुलीच्या चिथावणीने, ती नॉर्वे देशातील नोरा मराठी पेहरावात आणखी काही

वर्षांनी अवतरली. त्याच सुमारास रांगणेकरांची ' कुलवधू 'ही अशीच गाता गाता बाहेर पडली. बाहेर पडून या बहाद्दर स्त्रियांनी काय केले असेल बरे ?

घराचा कोंडवाडा झाला एकूण— म्हणजे फक्त स्त्रीसाठी! नाही तरी स्त्रीला गाय म्हणण्याचा प्रघात आहेच. गायच का? ती गरीब, निरुपद्रवी, (आखूडशिंगी) आणि उपयोगी असते, अशी काहीशी या चतुष्पाद दुभत्या रूपकाची संगती लावावी लागते. पुढची पायरी म्हणजे पुरुष हा म्लेंच्छ— अगदी कसाई. तेव्हा गो–प्रतिपालक शिलेदार लेखणी परजावीत टाकलेच. खऱ्या गाईवरची श्रद्धा आता मावळली, पण या आलंकारिक (आणि अलंकृत) गाईचे माहात्म्य ओसरले नाही. तिच्या वतीने अजूनही कित्येकजण हंबरत असतात! तिला चारा घालण्याचे सुकृत मोठे लोकप्रिय आहे.

गाईच्या पोटात सगळ्या देवांची वस्ती असते, म्हणतात; (मानवी) शरीरशास्त्राच्या तक्त्यासारखे गाईच्या उघड्या उदराचे चित्र पाहिल्याचे आठवते. त्याला वीक एंडला पुण्याला जाणाऱ्या ' जनतेची ' कळा होती, अशी देवांची झुंबड! स्त्रीमध्येही अशीच सद्-गुणांची खेचाखेची असते, असाही रूपकाचा अर्थ असावा. मनुष्ययोनीत जे जे सद्गुण शक्य आहेत, ते ते तिच्यात जन्मतःच असतात. त्यांची यादी कितीही लांबवली, तरी पाच–दहा गुण राहणारच. स्त्री–निष्ठ पुरुषाची कल्पना एकदा पेटली, की तिला मर्त्य-लोकात नसलेले गुणही स्त्रीठायी दिसू लागतात. 'स्त्रीसुलभ' हा छान शब्द फक्त गुणांनाच लावतात, नाही का ?

स्त्रीच्या विविध भूमिकांचा ओझरता उल्लेख वर आलाच आहे; त्या भूमिकांत या गुणांची वाटणी करण्याचा प्रघात आहे; सर्वांत अधिक अर्थातच मातेला. तिच्या हाती पाळण्याची दोरी असते (मग ती खेचो कोणीही!), म्हणून तिच्याकडे जगाच्या उद्धाराचा मक्ता. तिला ' मंगल ' वगैरे विशेषणे लावायची असतात. आई म्हणजे श्यामची. सगळ्या खस्ता तीच खाते (त्यामुळेच तिची कीर्ती एवढी पुष्ट झाली), निःस्वार्थ माया करते, (चांगले) वळण लावते; तसेच स्फूर्ती (आणि कवितेला व निबंधाला विषय) देते. आपल्या अवती-भोवती पोरांना बदडणाऱ्या, त्यांची आबाळ करणाऱ्या, त्यांच्यांत भेदभाव करणाऱ्या, शेजाऱ्यांचे खुसपट काढावयाला लावणाऱ्या व तसल्या लांड्यालबाड्यांकडे प्रेमळपणे काणा-डोळा करणाऱ्या मातामाऊली हव्या तेवढ्या असल्या, तरी त्या अपवाद समजायच्या— पुस्तकांतील नियमाला. भगिनी ही त्या माऊलीची छोटी आणि शिकाऊ आवृत्ती. तीही आपल्या कुवतीप्रमाणे बंधुराजाला हिडीसफिडीस करते; चहाड्याचुगल्यांचे धडे देते, ' माझे-तुझे ' चे हेवेदावे उगाळीत बसते. पुन्हा भाऊबीजेच्या हळवेपणात हे सगळे पुसून टाकण्याची सोय आहेच. तो एकुलता दिवस ' भाऊराया ' च्या कवतिकाचा; त्याने चिकट झालेली लोकगीते कोठूनकोठून खरवडून काढण्याच्या लडिवाळ उद्योगाला अलीकडे भरती आली आहे. बहिणाबाईला एकच डाचते : नणंद या भूमिकेत नायिकेच्या छळाची थोडी जबाबदारी तिला उचलावी लागते. पण त्या अपकीर्तीचा अर्धा वाटा तिला भावाकडे लोटता

येतो. त्याचप्रमाणे आईच्या ' सासू ' या जोडभूमिकेत तसले किल्मिष आहेच. पण तिच्या खाष्टपणाचा संबंध नवऱ्याच्या मैंदपणाशी लावता येतोच !

स्त्रियांच्या आधुनिक कैवाऱ्यांत मामा वरेरकरांचा मान मोठा — म्हणजे पुरुषांच्या वैऱ्यांत. पुरुष ही स्त्रीच्या संसारसुखाच्या मार्गातील धोंड आहे, असा काहीसा त्यांचा दावा आहे. दुर्गुणांची कडक यादी करून त्यांनी ती पुरुषजातीच्या पाठीवर चिकटवून दिली. इतकेच, की त्यांच्या नायिका कजाग, भांडखोर आणि तोंडाळ असतात. यातील वास्तवतेबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत !

शेवटी स्त्रीची प्रमुख भूमिका : पत्नीची. तीही गुणांची खाणी, असा तिचा कथा–काव्य –लौकिक; व्यवहारातील लौकिक मात्र तसा नाही. म्हणून असेल कदाचित, पण आपल्या प्रेमाच्या कांदबऱ्या या सहसा विवाहापाशीच विराम पावतात. विवाहपूर्व ( किंवा विवाहान्त ) सुख हाच त्यांचा विषय. फडक्यांच्याच पाहा. पुढील सगळे गृहीत धरायचे : म्हणजे; कोवळ, अजाण वाचक असेल, तर नायक नायिकेच्या भावी सुखाच्या कल्पनेने तो स्वतःच गुदमरून जातो बापडा. जाणता असला, तर कादंबरी खाली ठेवून म्हणतो, ' संपले ! आणखी एकाचे सुख संपले ! ' हे तो सावधपणे, स्वतःशीच म्हणतो किंवा एखादा समसुखी असेल, त्याच्यापाशी. त्याला ठाऊक असते, त्या नायकाचे पुढे काय होणार ते. त्याविषयी अनेकांनी लिहिलेही आहे— कथा–नाटकांतून. पण, दुर्दैवाने, ते विनोद म्हणून खपते. ' गांजलेला नवरा ' हा हसण्यावारी विसरला जातो. स्त्रियाही हसून बिलंदरपणे प्रसंग साजरा करतात, आणि खाजगीत त्याचे उट्टेही काढतात. एकूण लहानपणी आई हिडीसफिडीस करते, वाढत्या वयात जोडीला वहीणही, ' मोठे 'पणी बायको. ती ते हक्काने करते; तऱ्हातऱ्हांनी करते. हा सगळा जाच आजवर पुरुषाने का सहन केला ? आणि वर स्त्रीपूजेच्या सोंगात तो का सामील झाला ?...उंदरालाही आपण, निदान आपले बापजादे, एके काळी सिंह असल्याची स्वप्ने पडतात; आणि जागेपणी त्या आधारावर तो नसती आयाळ झटकून ' चीं चीं ' करतो; आणि आपण ज्याला ' रोमान्स ' हे नाव दिले आहे, त्या गुळगुळीत परंपरेत पुरुषाकडे सिंहाची व स्त्रीकडे शेळीची मऊ भूमिका असते. तो वातड असल्याची तक्रार ती नंतर पडद्याआड गुरकणार असली, तरी हे नाटक चालू ठेवणे त्याच्या हिताचे असते. छळाचा विसर पडायला, आणि छळवादिनीला खूश ठेवायला...

या सत्यस्वरूपातील स्त्रीचे संपूर्ण साहित्यात कधी फारसे दर्शन होत नाही; झालेच, तर तिकडे दुर्लक्ष होते. तेथे हरघडी डोळ्यांत भरणारी स्त्री सुंदर, नाजूक, आणि प्रेमळ असते; तीही तिची एक भूमिका आहे, हे मान्य केले पाहिजे. ती प्रणयिनीची–म्हणजे क्षणिक, तात्पुरती भूमिका आहे. त्यावेळी ती कलावती असते; तिचे रसरंग उठून दिसतात. श्रीमंतांच्या मठ्ठ मुली विवाहासाठी ' तयार ' केल्या जातात; त्या तयारीत नृत्यसंगीतादी कलांचा अंत-

र्भाव असतो. पण तसे पाहिले, तर सर्वच ' युवती ' आपल्या अंगच्या सर्व कला, त्यांच्या अत्यंत मधुर रूपांत, त्यावेळी दाखवतात. ते डावपेच उपजत् येतात; शिकवावे लागत नाहीत. तेव्हा वाणी मंजुळ होते, हालचाली अकारण बाकदार होतात, पळभर बुद्धीलाही धार येते. ती यायचीच. कारण सावज सापळ्यात येण्याचा तो मोका असतो. तो साधला, की हे पळाचे लावण्यवैभव विखरून जाते; पुन्हा रखरखीत उजेड पडतो. स्त्रीपूजेचा सगळा देव्हारा त्या निसटल्या पळावर आधारलेला असतो. म्हणून ' स्त्री ही क्षणाची प्रणयिनी आणि अनंत काळची पत्नी असते ' असे म्हटले, तर ते सत्याला अधिक जवळ होईल.

हे सत्य ठसविले पाहिजे; विनाकारण स्त्री म्हणताच भक्तीची कवाईत नको. तिच्या दुःखाचे नाटकी अवडंबर नको. ते डोळ्यांतून पाणी काढायला सोपे आहे खरे; तोटी फिरविताच लागले वाहायला. पुरुषांचीही दुःखे आहेत, ती अधिक बिकट आहेत आणि त्यांतील कित्येक स्त्रीनिर्मित आहेत. हे उघड्या डोळ्यांनी पाहिले पाहिजे. स्त्रीगौरवाच्या दीर्घ परंपरेमुळे तिच्याच स्वतःबद्दल अवास्तव कल्पना झाल्या आहेत. हा दोष केवळ तिचा नव्हे, काहीसा पुरुषांचाही. पण तो निपटून काढला नाही, तर पुरुषजातीचे भविष्य खडतर आहे. आता पुरुषांचा उद्धार करण्याची वेळ आली आहे. त्यांना कैवारी हवा. तसा कोण मामा निघेल, तो निघो... तोवर ' पुरुषजन्मा, ही तुझी कहाणी ' म्हणून निदान काय झाले व काय होत आहे, याची स्वच्छ जाणीव ठेवली पाहिजे. तरच त्या दलितवर्गाला काही तरणोपाय आहे.

## लिहिल्याने होत आहे, रे

श्रावण सरला; भाद्रपद उजाडला. आरशासमोर उभा राहून दाढीच्या खुंटांवर हात फिरवीत मोरू म्हणाला,

" मोऱ्या, आता अळंटळं बस्स् झाली, लागा उद्योगाला. "

मग केसाचे गुच्छ काढीत त्याने स्वगत पुढे चालू केले :

" सव्वा-दीड महिन्यात सगळे उरकायला हवे; दिवाळीचे वायदे तर करून बसलो आहे. आठ ठिकाणी लघुकथा टाकायच्या आहेत. त्यांतली एक दीर्घकथा ! आणि तीन लघुनिबंध, एक एकांकिका आणि साहित्यावर दोन लेख... त्यांतला एक, म्हणे, मार्मिक आणि चुरचुरीत हवा, म्हणजे दुसरा नुसताच सखोल चालेल, तर !... आणि नाही म्हटले, तरी तीन-चार लेख–नुसतेच लेख... वाटेल तो विषय !... छान, मोरोबा... बुळ्यासारखे शब्द देऊन बसलात... पैशाची हाव सुटली, नाही का ? आणि नावाचीही !... भोगा आता... हेच झाले सत्रा, अठरा. हे पक्के वायदे. कंत्राटावर सही दिली आहे. त्याशिवाय इतर... तो आबा पणशीकर डोकं उठवतोच आहे... त्याच्या ' पुष्टी ' चा खास अंक आहे ! आणि अरे, बाप, रे... ती ' ललने 'ची संपादिका !... "

येथे मोरूच्या दाढीचे केस ताठ उभे राहिले. ( आणि श्मश्रुक्रिया सुकर झाली )

" ... त्या भवानीने पत्रांनी आणि फोननं पिडलंच आहे. उद्या दारात ठाकायची... नको... त्या अगोदर तिला काही घातलं पाहिजे– कुछबी... स्त्रियांविषयी हवे, म्हणे...' स्त्रिया

आणि काव्य ', ' स्त्रिया आणि ॲटम ' — नाहीतर ' स्त्रिया आणि संयुक्त महाराष्ट्र '... बये, तुझा विचार मनात आणून लिहायचं, म्हणजे ' स्त्रियांशिवाय संयुक्त महाराष्ट्र ' हाच विषय शोभेल... असो. शेवटी सगळे एकच... मथळ्यात स्त्री टाकली, की आत वाटेल ते खपेल!— झालं... विसाच्या घरात गेले लेख... मोरोपंत, आता घाला मांडी आणि हाणा. काहीतरी अर्धा लाख शब्द पिळून काढायचेत, आणि ते पाच-सहा आठवड्यांत. आता ऑफिसला दांड्या मारल्याशिवाय गत्यंतर नाही. पण कितीही भुसा भरला, तरी आधाराला काही हवं ना! कल्पनाविल्पना आणि स्वतंत्र विचार वगैरे. तसे ते फूटपाथवर मिळतील, म्हणा, दोन-दोन आण्यांत. आणि शेवटी आपला खटाव कॉलेजचा लायब्ररिअन आहेच. तो बिचारा कच्चा माल हुडकून ठेवतोच, अगदी ताजाताजा. पण तो पकवायला तरी हवा ना... आता का तोंड वाकडं करतोस, मोऱ्या? तेव्हा बरं वाटलं होतं. विचारील, त्याला हसून होय म्हणताना आणि पैशाचं ठरवताना! झेपत नाही, तर घ्या कशाला अंगावर?... हो, त्या चिंतू कामशेतकराचं ठीक आहे... त्यानं या दिवाळीला एकवीस आमंत्रणं घेतली आहेत, म्हणे!.... खरंच, मीसुद्धा ' एरंडोल समाचार 'शी मोबदल्या-बाबत ताणून धरलं नसतं, तर माझेही एकवीस भरले असते यंदा!... विसाचे एकवीस, म्हणजे मोठं ओझं नाही. पण ते चिंतू करू जाणे. तो पहिल्या पावसाला दिवाळीचा घाणा घालतो, आणि वेळीच बेगमी करून ठेवतो. शिवाय माल तयार, म्हणून बेस्याला भावही चढवता येतो. आम्ही हे असे अजागळ; गिऱ्हाईक जमलं, की पंप मारणार!... आणि हाताशीही कोणी नाही, निवडापाखडायला. आमच्या जयवंताचं कसं नशीब आहे! बायको मास्तरीण असली, तरी इकडचं तिकडचं वाचते, आणि नवऱ्याचे लेख निम्मेशिम्मे तयार करून ठेवते. तो जरा वरून हात फिरवतो... थोडी शैलीबिली टाकतो, की माल पोष्टात पडला... नाहीतर आमची साध्वी! अहाहा! तिचं वाचन म्हणजे भविष्य आणि सिनेमाच्या जाहिराती आणि मला आलेली पत्रं! तिचं लेखन म्हणजे महिन्यातून एकदा बापाला लिहायचं कार्ड! ते लेखनकर्म उरकायला तिला तब्बल दीड घंटा लागतो. लिहिताना जीभ एक इंच बाहेर काढते— आणि जोडाक्षर आलं, की दोन इंच! शेवटी पत्ता लिहायला मी हक्काचा नवरा! ... ती काय मला मदत करणार? स्त्रियांच्या मासिकांसाठी सुद्धा तिला कधी लिहिता येईलसं दिसत नाही... फक्त माझे अंक मैत्रिणींना वाचायला देऊन गमावते! संपादकांकडून मनी-ऑर्डरी आल्या, की लपेटदार सही करून त्या घेते. आणि त्यावर आपलं कमिशन कापते रुपयाला आठ आणे. इतकाच या पतिव्रतेचा माझ्या लेखनाशी संबंध! म्हणजे मदतही नाही आणि निवांतपणाही नाही! तिच्याबद्दल लिहिता येईल, म्हणा. पण खरं लिहिणं अवघड! आणि खोटं लिहिलं, तर तीच ते खरं म्हणून चालायची, हा त्याहून मोठा धोका! ललाटलेख आहे तो! तो डोक्यावर वागवून राबायचं आता. मोरोबा... आता फक्त कर्मण्येवाधिकारस्ते... लिहीत सुटायचं! सहा आठवड्यांत वीस लेख! दिवाळीचा जुल्म! पण आपणच ओढवून घेतला आहे तो...."

असा भाद्रपदाच्या पहिल्या दिवसांत मोरू पुनःपुन्हा पश्चात्ताप करीत होता. त्याला जेवणखाण रुचेना, झोप नीट लागेना.

तेव्हा काट्याने काटा काढण्याचा होमिओपाथिक इलाज, म्हणून त्याने कडक धूम्रपान अंगीकारले. धुराने कल्पनाशक्ती सुटते, म्हणतात; आणि त्याच्या वलयांत आपला भूतकाळ चित्रपटासारखा दिसतो, असा आपल्या ललित वाङ्मयाचा एक संकेत आहेच. मोरूलाही आपला साहित्यिक भूतकाळ दिसला. पाचपाच वर्षांच्या टप्प्यावरील तीन दिवाळींची चित्रे त्याने पाहिली.

१९४० : तेव्हा तो 'कुमार' होता— लेखक म्हणून आणि सरसकट माणूस म्हणूनही. फडके–खांडेकर भक्तिभावाने वाचत असे.

साहित्यिक सभा–संमेलनांत न चुकता हजेरी लावी. चाळीतील हस्तलिखितांसाठी व एक–दोन फक्त कुमारांसाठी चालविलेल्या मासिकांत लिहीत असे. त्यातील कथानायक सहसा खांडेकरांच्या नायकांसारखे ध्येयवादी असत आणि नायिका फडक्यांच्या नायिकांसारखे प्रेम करीत. शेवटी नायिकाही ध्येयवाद करीत.

दिवाळीत मोरू मिळतील तेवढे खास अंक वाचण्यासाठी आणायचा. एखादा–दुसरा विकत घेऊन, दोन–चार भाड्याने, आणि बाकीचे उसने मागून. नवा अंक आणला, की तो छातीशी घेऊन ( मुखपृष्ठ वर ) मोरू चाळीत येरझारा घालायचा. पोरीबाळींचे साहित्याकडे, आणि पर्यायाने स्वतःकडे, लक्ष वेधण्याचा एक उपाय, म्हणून. या उद्योगात जीवन आणि कला यांचा उदात्त संगम असल्याचे तो स्वतःला पटवून देई. पण तो ते सगळे खास अंक श्रद्धेने वाची; त्यांसंबंधी एकसारखा बोलत राही; त्यांतला एखादा लेखक डोळ्यांनी पाहिला, तर गहिवरामुळे त्याला बोलवत नसे. आपण कधी त्या पदवीला पोहोचू , अशी आशा करणे-देखील तेव्हा धाडसाचे वाटे.

१९४५ : यावेळी कुमार–साहित्य–संमेलनांची आणि युवक–साहित्य–संमेलनांची साथ होती.

मोरू वयाच्या अधिकाराने युवक–संमेलनांत, आणि नेता म्हणून कुमार साहित्य–संमेलनांत मिरवू लागला. साहित्यिकांशी त्याची घसट वाढली होती; त्यांच्याशी पत्रव्यवहारानेही तो लगट करीत असे. त्यांची पत्रे टेबलावर उघडी ठेवी, आणि लोकांच्या हातात पडणाऱ्या पुस्तकात विसरून राहिल्यासारखी ठेवी. हळूहळू साहित्यिकांविषयीच्या खाजगी बातम्या, आणि त्यांच्या कुरबुरी व कुलंगडी तो आपण सांगत आहो, त्यापेक्षा कितीतरी अधिक आपल्याला माहीत आहे, अशा आविर्भावाने इतरांना सांगू लागला. काही नियतकालिकांच्या कार्यालयात त्याची ये–जा असे. त्यांच्या दिवाळी अंकांत काय काय येणार आहे, नाही कोणी म्हटले व का, इत्यादी सुरस बातम्याही तो चाळकऱ्यांस कळवीत असे. चाळीत त्याचा

भाव वाढला होता. प्रेमही करीत होता; पण ते चाळीतून उडून दोन–तीन लेखिकांवर एक-समयावच्छेदेकरून बसले होते.

त्याचे लेखन वाढले होते; त्याच्या तऱ्हाही वाढल्या होत्या. पण अजूनही ते बहुश: ' उच्च नि उदात्त ' असे. मात्र खांडेकर त्याच्या मनातून उतरले होते, आणि फडक्यांविरुद्ध तर त्याने दोन–तीन कडक पत्रेही प्रसिद्ध केली होती. पण त्याच्या शैलीत फडक्यांचा गोंडसपणा आणि सानेगुरुजींचा हळवेपणा यांचे समभाग मिश्रण असे. क्रांती, मानवता, हृदय-परिवर्तन, इत्यादी विषय त्याचे आवडते. ते सर्व व आणखीही तसले काही भरदार शब्द समानार्थक मानून त्यांविषयी तो सारख्याच नाजूकपणे लिही.

पण त्याचे लेखन अजून दिवाळी अंकांपर्यंत पोचले नव्हते– तसलाच एखादा–दुसरा लहानसहान अंक सोडून. मात्र आता आपण रांगेत आहोत, वर सरकणारच, ठळक टाइपात अवतरणार, याचा अर्धाअधिक विश्वास त्याला आला होता.

१९५० : आता तो ' रजिस्टर्ड ' साहित्यिक बनला होता. अगदी ' ख्यातनाम ' ( किंवा ' प्रथितयश ' ) नसला, तरी त्या अवस्थेप्रत येत होता.

' उदयोन्मुख ' सारखी कोवळी विशेषणे त्याला काही संपादक लावीत असले, तरी साहित्यातील बहुतेक विशेषणांप्रमाणे त्याचाही अर्थ काटेकोरपणे घ्यायचा नाही. संदेशासह स्वाक्षरी देण्याचा प्रसंग त्याच्यावर वारंवार येई. त्याच्यावर एक–दोन सचित्र लेखही आले.

त्याच्या लेखनाच्या प्रकृतीत कालमानाने फरक पडला होता. जरी अनेक साहित्यप्रकार तो लीलेने हाताळी, तरी लघुकथा हे त्याने आपले खास कुरण आखून घेतले होते. त्याची मशागत आता अर्थातच तो नव्या ढंगाने करी. एके काळी त्याच्या कथांचा शेवट आनंदी असे; पुढे तो दुःखी होऊ लागला. आता कथेला शेवटच असू नये, याची तो खबरदारी घेई. त्याऐवजी तिला तो ' तिसरे ( की चौथे ? ) परिमाण ', ' आंतरिक वास्तवता,' ' संवेद-नात्मक सापेक्षता, ' ' प्रच्छन्न आकृतिबंध ', इत्यादी लकबी देऊ लागला; आणि आपण त्या का व कशा देतो, याविषयीही लिहूबोलू लागला. तसा भाषेतही नवा थाट आणला. कुमारावस्थेतील गोंडस शैलीचे पाप फेडण्यासाठी तो आता निबर आणि राठ शब्दांचा काळजीपूर्वक उपयोग करी.

आता त्याचा दिवाळीचा साहित्यिक व्यवहार फार वाढला होता. मागणीइतका पुरवठा करणे कठीण जाऊ लागले, तरी मागणी पडू नये, याची काळजी घ्यावी, असेही वाटू लागले. मग थोडी प्रेमळ चढाओढही आली. कोणाला किती आमंत्रणे आली, याची आकडेमोड मनातल्या मनात होई. मोबदल्याबाबतही ' तौलनिक हिशेब ' न झाले, तरच नवल ! दिवाळी अंकांची परीक्षणे कोठे आली, त्यांत आपल्याविषयी काय म्हटले आहे, इतरांविषयी काय म्हटले आहे, यासंबंधी कटाक्ष बाळगणेही आलेच !

पुष्कळसे मोघम प्रेम केल्यानंतर या सुमारास त्याने नुसते लग्न केले. साहित्यनिर्मितीला

प्रेमाची स्फूर्ती लागते, असल्या समजुतींची (त्याच्याच शब्दांत) त्याने 'कात टाकून दिली होती.'

–आणि आता १९५५! हा साहित्याचा व्यवहार बेसुमार वाढला आहे; पण व्यवहार म्हणून पार पाडावा लागतो. चिपाडे पिळावी लागतात, आणि दुसरे घोडे पुढे दामटले जाऊ नये, याबाबत जपावे लागते. दहा–पंधरा वर्षांपूर्वीची साहित्याविषयीची पूजावृत्ती आठवते; आणि आता किती अंतर पडले आहे, याचा विचार क्लेश देतो.

मोरूच्या डोळ्यांपुढून साहित्यिक आत्मचरित्राची ही पंचवार्षिक प्रकरणे गेली आणि पश्चात्ताप वाढला...

नवरात्र संपले. दसरा उजाडला. मोरूची बायको मोरूला म्हणाली,

"किती लेख लिहिलेत दिवाळीचे? मला माहेरी डांबून ठेवलेत महिनाभर त्यासाठी!"

मोरूने उत्तर दिले,

"चक्क बावीस लेख लिहिले. चिंतू कामशेतकराहून एक अधिक!"

विस्मय, अभिमान आणि प्रेम यांनी युक्त होत्साता स्वर काढून ती सती म्हणाली,

"अय्या! खरंच? म्हणजे कित्ती कित्ती पैसे मिळणार!...किती बरं?"

तिच्या प्राथमिक अंकगणिताला न झेपणारे काही गुणाकार मोरूने घातले. त्यांच्याशी ती मुकाबला करीत असता त्याने स्वगत सुरू केले,

"वा:, रे, बहाद्दर! सत्रा–अठराचा धसका घेतला होतास, ते बावीस हाणलेस! एक-दोन संग्रहांचा मसाला तयार झाला. अगदीच हातपाय गाळले असतेस, मोरया, तर काय झालं असतं?... पैसा हुकला असता; आता आणखी नाव होईल, ते झालं नसतं. आणि वर संपादक लोक नाराज झाले असते. भीड घातली त्यांनी, तर मानली पाहिजे. भिडे भिडे लेखन वाढे. मी नाही लिहिलं, तर दुसरा कोणी लिहील. आपलं स्थान टिकवलं पाहिजे. पाच–दहा लेख गचाळ आहेत, असं म्हणतील कोणी– तो 'विश्वशांति'वाला म्हणेल, आणि आमचे ते विद्वान टीकाकार त्रिं. पां. ज्येष्ठे! तो नाकानं कांदे सोलतो बेटा. आणि कोणी कुजकी पत्रं लिहितील टोपण–नावांखाली...चिंतू कामशेतकरदेखील लिहील किंवा लिहवील. त्याला खरे झोंबतील माझे बावीस लेख...म्हणजे पुढच्या दिवाळीला तो पंचवीस तरी पकवणार...आणि त्यासाठी शिमग्यापासूनच बसेल. बस, गड्या, हवा तर संक्रांतीपासून बस. हा मोऱ्या समर्थ आहे. ज्यानं सव्वा महिन्यात बावीस पैदा केले, तो पंचविसाला डरत नाही. हौद्यात उतरल्यावर कच नाही खाणार हा पठ्ठा...असाच लिहीत सुटेन...लिहिल्याने होत आहे, रे!"

# दामू मास्तरची बायको

त्या जिल्ह्यातील पाच–सात गावांतील मराठी शाळांत तरी भिंतीवर तुम्हांला दामू मास्तरची चित्रे आढळतील. एक दुसऱ्याहून निराळे, आणि त्यांतील अर्धीअधिक बरीचशी पुसून गेलेली. बहुतेकांच्या खाली ‘ दामू मास्तर ’ असे कमी–अधिक चुका करून लिहिलेले दिसेल. असे म्हणतात, की घरोघर अडगळीत पडलेली फाटकी क्रमिक पुस्तके तपासली, तर त्यांतही शेकडो पुस्तकांतील कोऱ्या जागेत तशीच चित्रं आढळतील.

विद्यार्थ्यांच्या चित्रकलेला असे चेतविण्याइतका दामू मास्तरचा लौकिक होता. लौकिकाचे सोडा, त्याचे रूप आणि चालणे–बोलणेही तसे होते. मी त्याला एकदाच काय ते पाहिले–तेही मोटर–स्टँडजवळच्या गर्दीत, पण या क्षणी ती मूर्ती डोळ्यांपुढे आहे.

माणसे लठ्ठ असतात— पण दामू मास्तरचा लठ्ठपणा निराळा. म्हणजे अवाढव्य नव्हे, तर मध्येच कोठेतरी सुटलेला, आणि उगाच. मांड्या, तंगड्या त्या मानाने सुकलेल्या, तर पावले परत फताडी. गळ्या–हनुवटीला तीन वळ्या, तर मस्तक पिकुटलेले. आणि कान, डोळे, नाक, ओठ, दात हा चेहऱ्याचा तपशीलही असाच एकमेकांशी नीट न जमणारा. असा हा व्यस्त बांधणीचा पुरुष. चालणे-बोलणे मात्र त्या रूपाशी जमणारे होते. कुबड्याच्या किंवा लंगड्याच्या, फार काय, खेकड्याच्याही चालीत एक आपलीच लय असते, जरा बिकट असेल, पण असते खास. दामू मास्तर इथून तिथे जायचा, तो पायांनी, म्हणून त्याला चालणे म्हणायचे, इतकेच. पायांनी खुरडणे असे त्या क्रियेचे थोडेफार सार्थ वर्णन

करता येईल. तेच बोलण्याचे. किंबहुना ते अधिक खडतर. तसा माणूस तोतरा नाही, लुडबा नाही, पण वाणी अशी काही वेंधळी, की म्हणावयाचे आणि म्हटलेले यांच्या दिशा नेहमी वेगळ्याच राहावयाच्या. काय बोलत आहे, ते धड समजायचे नाही. अर्थात कधी समजलेच, तर ते अर्धवट वाटण्याचाच संभव अधिक. असो. एकूण, माणूस डोक्यानेच जरा लंगडा होता.

त्यात पोटाचा धंदाच मुळी बोलण्याचा, शिकविण्याचा. म्हणून अगदीच उघडा पडायचा बापडा. कोण जाणे, शहरगावच्या एखाद्या मातबर शाळेत ही उणी थोडीशी खपली असती. शाळेच्या नावाचा दबदबा आणि शिस्तीची घडी यांच्या आधारावर धकले असते. पण दामू मास्तरची फरपट होत राहिली, ती या खेडेगावातून त्या खेडेगावात. तिथली माणसं मोठी वाईट, असं नव्हे, शहरगाववाल्यांहून उजवीच– माणसं म्हणून. पण रासवट, बोलणं–वागणं अर्काट. गंमत म्हणून हाडं मोडतील. पोरांपासून तीच रीत. मग दामू मास्तरसारखं खेळणं मिळाल्यावर काय! दामू मास्तरला कोणी अहो जाहो केले नसेल.—अर्थात बायको सोडल्यास. पण गावगाड्यात एकवचनाची काय क्षिती! त्यात जवळीकही असते. पण कोणीही ‘ त्ये दामू मास्तर आलं ’ ( किंवा छापीलपणे, ‘ ते दामू मास्तर आले ’ ) असे म्हणावे, हे कसे गोड वाटणार? वचनच नव्हे, लिंग देखील ‘ अनादरार्थे ’ उतरविलेले!

इतकेच असते, तर दामू मास्तरच्या विटंबनेला पारावार नसता, पण परमेश्वराची दया म्हणा, न्यायबुद्धीची भरपाई म्हणा, दामू मास्तरला अगदी विजोड बायको मिळाली होती. लाखांचे कोणी पाहिले आहे, पण हजार–पाचशेत उठून दिसावी, अशी बाई होती. नुसत्या रूपड्याने नव्हे, तर टापटिपीने आणि चटपटीतपणाने. पापभीरू पुरुषानेही मान वळवून क्षणभर टक लावावी, अशी. तिचे दिसणे आणि चालणे आणि बोलणे होतेच असे, की उनाड जिभेलाही काही वेळ अवघडल्यासारखे व्हावे. म्हणजे कुर्‍याचे नव्हे, की लाजरेबुजरे नव्हे. बाई वागण्यात मनमोकळी होती. असल्या निकामी नवऱ्यासह ओढघस्तीचा संसार हाकायचा, म्हणजे घरात कोंडून घेऊन किंवा मुखदुर्बळपणाने भागले नसते. सगळे पाहावे लागे तिला. बाई म्हणून घरातले पाहायचे, आणि पुरुषासारखे बाहेरचे. पुन्हा अशा परिस्थितीत उपजतो, तसला पुरुषी खाक्याही नव्हता तिच्यात. स्त्रियांवेगळी राठ वर्तणूक नव्हती, सहजपणा होता, गोडवाही होता.

तिच्यामुळे दामू मास्तरचा निभाव लागतो आहे, असे जो तो म्हणे, आणि ते म्हणायलाही नको होते. तिने नुसता घेण्यादेण्याचा व्यवहार पाहिला, बाजारहाट केला, मीठमिरची-शिवणटिपण केले, इतकेच नाही, तिने नवऱ्याच्या शाळेचे सांभाळून घेतले. घर सहसा शाळेपासून हाकेच्या अंतरातच असायचे. एक कान तिकडे लावून बाई घरकाम बघायची. तिकडून फारच कालवा ऐकू आला, तर लगबगीने जाई, ती थेट वर्गात.

“ का, रे, बाळांनो, काय चालवलंयत्? असं वागायचं होय?... ”

गलका थोडा ओसरे, दामूमास्तरभोवती जमून माकडचेष्टा करणारी पोरे जाग्यावर जाऊन

बसत. स्वतः मास्तर धोतराने तोंड पुशीत खुर्चीत विसावत. व्रात्य पोरांच्या तडाख्यातून सोडवणूक झालेल्या अश्राप जनावरासारखे त्यांचे डोळे लकाकत.

" आता सांगा ना मला, काय चाललं होतं, ते ? "

पण चुपचाप. मध्येच एखादे पोरटे फिसकन् हसायचे, की आली सगळ्या वर्गाला उकळी. दामूमास्तरदेखील एक डोळा बारीक करून हसायचे.

" सांगा, म्हणते ना ! " बाईचा स्वर एकदम उसळायचा. " तू सांग, रे. " कोणाचं तरी नाव घेऊन त्या विचारीत. बहुतेक मुलांची नावे त्यांना ठाऊक असत.

पुन्हा थोडी फिसफिस, मग स्वरात आणखी जरब. मग कोणी धिटाईने फळ्याकडे बोट दाखवत असे. पुन्हा खूपशी फिसफिस. दामू मास्तरांनाही राहवत नसे.

तिकडे पाहताच बाईच्या ध्यानी येई. मास्तरांनी लिहिलेले वेडेवागडे आकडे आणि गणितही तसे वेडेवागडे. साधे गुणाकार चुकलेले—पोरांच्याही लक्षात येतील, असे. मग बाईनी फळा स्वच्छ पुसून काढावा आणि आपल्याइतक्याच देखण्या आकड्यांत त्यावर गणित सोडवावे. पोरे टकाटका बघत राहत. फळ्याकडे आणि एकमेकांकडे. दामू मास्तर-सुद्धा तशाच नजरेने फळ्याकडे पाही. तोंड अर्धेअधिक उघडे टाकून.

तशीच आणखी एक-दोन गणिते सोडवून बाई जायला निघत.

" समजलं ना, बाळांनो ? मग उगाच का करायचा कालवा ? आणि त्यांच्या जिवाला जरा बरं नाही आज, म्हणून राहिलं असेल काही. आता त्रास द्यायचा नाही त्यांना. "

पाठमोऱ्या बाई नजरेआड होईपर्यंत वर्ग तिकडे बघत राही. ' त्यांना 'चा प्रेमळ ठसका थोडा वेळ कानांत घुमत राही— पण पुन्हा थोड्या वेळाने ये रे माझ्या मागल्या...

गणिताचेच नाही, सगळ्या विषयांचे तेच. मुलांनीही मास्तरांच्या चुका काढाव्यात आणि त्या आनंदात शाळा डोक्यावर घ्यावी. कोण जाणे, मास्तरांची बायको यावी— येते, याचाही थोडा आनंद त्यात असेल ! ती यायचीही तत्परतेने, आणि त्यांना रागावल्यासारखे करून आणि खुलवून परत जायची. हे शिकवण्याचे. पण मास्तरांना शाळेचे इतर कामही असे— हजेरीपटाचे आणि फी घेण्याचे. ते तर बायकोनेच करायला हवे. कधी बायकोच्या गैरहजे-रीत, किंवा कोणी खिजविले, म्हणून किंवा अकारण उत्साह, म्हणून, मास्तरांनी फीचा हिशेब लिहिला, तर खोट ठेवलेलीच. मग बायकोने सरळ तपासून पाहावे. किती निस्तरावे तिने !

पण हौसेने आणि हसतमुखाने ती करी सगळे. कधी राग केला नाही नवऱ्याचा. चिडचीड नाही. चार—चौघांत तर नाहीच, पण घरातही नाही. अजाण, अपंग मुलाचे करावे, तशा प्रेमाने केले, त्याने करून घेतले.

तिला कधी पोरबाळ झाले नाही; पण म्हणून ती कधी झुरली नाही, की देव आणि बुवा पुजले नाहीत, की अघोरी वैदू शोधले नाहीत. बायाबापड्या कळकळीने सांगत, तिकडे काणाडोळा करी. आहे त्यात समाधानाने रंगली होती. कोण जाणे, मुलाबाळांचे

करावे लागले असते, तर नवऱ्याची आवाळ झाली असती.

अमक्याची आई एवढीच पुष्कळ स्त्रियांची गावाला जशी ओळख असते, तशी दामू-मास्तरची बायको म्हणूनच हिला ओळखत. तिचे नाव धड कुणाला माहीत नव्हते. इतकी वर्षे मी तिच्या कथा ऐकल्या, मला माहीत नाही. असे म्हणतात, की कित्येकांनी दामू मास्तरकडून तिचे नाव घेण्याचा प्रयत्न केला, पण तो नववधूसारखा लाजे, आणि एखाद्याने इरसालपणे पाठ धरलीच, तर नाव म्हणून जे पुटपुटे, ते नीट कधी समजायचे नाही. कठीण असावे ते नाव!

एकटादुकटा रस्त्यावर दिसला, तर भंडावून सोडत त्याला. कोणीही अंगाशी खोड्या कराव्या, काहीही चावरगट विचारावे.

"मास्तरा, तुला घरधनीण धोतार नेशीवते, न्हवं!"– इथून सुरू झालेल्या चौकशा कोठल्या कोठे पोचत.

दामू मास्तर हसून काही तरी उत्तर द्यायचा; पण त्याने राग मानला नाही. त्यात राग मानण्यासारखे काही आहे, हेही उमगत नसावे बिचाऱ्याला.

कधी जवळपास असली आणि तसले काही कानांवर पडले, तर तिला सगळे उमगत असे, पण कधी राग दाखविला नाही तिनेही. न बोलता त्याच्यापाशी येऊन उभी राही. चावरगट तोंडे आपोआप थांबत आणि ती दोघे चालू लागत. गावच्या रीतीप्रमाणे नवरा पुढे, बायको मागे. न बोलता त्याला इष्टस्थळी नेई.

पण गाव म्हटले, की अड्ड्याअड्ड्यावरून अचकट बोलणे चालायचेच. नसते, तरच नवल. अहो, असला वेडपट नवरा आणि असली रूपाळू बायको. जिभा वळवळणारच. गावाचेच कशाला, तुमच्या मोठमोठ्या शहरांतल्या संभावित क्लब्समधून तरी काय निराळे चालते? पण येथे सहसा जिभांतच जिरायचे ते. कोणीतरी कड घेई तिची, तिला नावाजे, तिच्या-विषयी घाणेरडे बोलू देत नसे. बाई निर्मळ असल्याची मनोमन खात्री असे सगळ्यांना. पण एखाद्या टग्याला आवरता येत नसेही. कधी भर बाजारात तिला ऐकू जाईल, असे काही अर्वाच्य बोलावे त्याने, पण ती न ऐकल्यासारखी आपल्या उद्योगात मग्न असायची. आणखी पुढे जाऊन कोणी आडदांडपणे तिची वाट आडवी, धक्का देखील देई. पण एखादे मोकाट जनावर आडवे आल्याच्या आविर्भावाने ती वळसा घालून जाई. बोलायची नाही, की कपाळाला आठी नाही. अगदीच अडवणूक झाली, तर, "जरा वाट सोडता का?" असे सहजपणे विचारील. असे घडे, पण क्वचित. आणि घडलेच, तर त्या अपराध्याची कोणी गय करीत नसे. नव्यानेच एखाद्या गावी स्थायिक झाल्यावर असे होण्याचा संभव अधिक असे.

अशी अनेक गावे झाली. जिल्हा स्कूल बोर्डाचा मास्तर; बदलीचा खराटा सारखा मागे असे. कधी त्यांच्या कामाविरुद्ध गावातल्या कोणी धेंडाने तक्रार गुदरली, म्हणून, कधी ते

गाव कोणा वशिलेदाराला हवे, म्हणून, तर कधी अधिकाराची लहर, म्हणून. पुन्हा दामू मास्तराच्या बुद्धीचा लौकिक थेट जिल्ह्याच्या शहरापर्यंत गाजत होताच. त्याला त्राता नव्हता. कोणाही पोरसवदा शाळातपासनिसाने चारचौघांसमक्ष, विद्यार्थ्यांसमक्ष, त्याचा पाणउतारा करावा. बोर्डाच्या एखाद्या क्षुद्र कारकुनानेही भर कचेरीत त्याला वाईटसाईट बोलावे. मग साहेबांचे काय ?

—पण दामू मास्तरची बायको ताठ होती. पुढे पुढे बदलीचे शिजू लागले, की तीच शहरच्या कचेरीत जाई. सराईतपणे थेट वरपर्यंत भेटीगाठी घेई, वेळप्रसंगी वाद घाली आणि नको असलेली बदली टाळी किंवा हवी असलेली मिळवी. काही किटाळ आले असेल, तर त्यावर सारवासारव करून घेई. नाहीतर, दामू मास्तरची आणि त्याच्याबरोबर तिची काय होलपट झाली असती, याची कल्पना करवत नाही. नवरा घरी बसतो आणि ही देखणी, तरणीताठी बायको त्याचा कारभार पाहायला गावोगाव हिंडते, हवे ते पदरात पाडून घेते, याचा विपरीत अर्थ बरळला जाऊ लागला नसता, तरच चमत्कार मानावा, असे तेव्हा त्या जिल्ह्याचे आणि व्यवसायाचे वळण होते. ओवाळून टाकलेली म्हणतात, तशा कीर्तीची माणसे दादा होऊन बसली होती; शिक्षकांचे नशीब ती घडवीत. बदलीचा चाबूक हाती असे. मास्तरणींच्या बदल्या हा तर शिळोपा रंगविण्याचा हमखास विषय झालेला.

मग दामू मास्तरच्या बायकोचे काय ? बोर्डाच्या कचेरीत गेली, की शिपायापासून हेड-क्लार्कपर्यंत डोळे मिचकू लागत. साहेबाच्या खोलीत गेली, की बाहेर खोकल्याची साथ येई. अध्यक्षाच्या किंवा तशाच कोणा अधिकार गाजविणाऱ्या गब्रूच्या घरी गेल्याचे समजले, की खिदळण्याला ऊत येई. ते गावोगाव व्हायला किती उशीर ? इतर मास्तर आणि त्यांची कुटुंबे त्याला अनेकदा उत्साहाने तोंडभार लावीत.

दामू मास्तरच्या गावापर्यंत हा लोकापवाद झिरपे. त्याला एकटा गाठून "खरं का ह्ये, मास्तर ?" म्हणून कोणी विचारीही. कोणी देवळाच्या किंवा त्याच्या घराच्या भिंतीवर तसली सार्वजनिक चौकशी चितारून ठेवी. दामू मास्तरला त्याचे काही नसे. त्याचा धड अर्थही कळत नसेल. त्याच्या बायकोला सगळे कळत असे. घराच्या भिंतीवरच काही वेडेवाकडे असले, तर ती ते पुसे, खरडे. कोठे बसायला गेली आणि कोणी घालून पाडून बोलले, तरी ती ढळली नाही.

"मोठी बेरकी आहे, हो. करून सवरून पुन्हा नामानिराळी. चवचाल मेली !" बाहेर पाय पडतो, न पडतो तो असलेही ऐकू येई. पण ते एखाद्या पांढरपेशा घरात. गावात इतरांना तिचा विश्वास होता...

कोण जाणे ! कोण जाणे ! ही स्त्री नितळ चलणुकीची वाटे. एरव्ही असेलही, पण प्रत्येक वेळी त्या लांडग्यांच्या हातांतून निसटत असेल का ? नवऱ्याचे भले व्हावे, म्हणून का असेना, पण अशी पुन्हा पुन्हा त्या आडरानात शिरतेच का ? त्या रानदांडग्या पाप्यांना का अशी चाळवते ? का स्वतःच चळली ही ?

" त्यात जगावेगळं काय ? दादला हा असा लवथवता, आणि बाई अशी भरात! — म्हणजे ही गावात साध्वी आणि परगावी वेसवा!"

काय काय लोक बोलत, कोण जाणे!

असले आणि याहून वाईट बोलणे झाले, तरी गावाची तिच्यावर निष्ठा असे.

" तशातली नाही ती!" असा जो तो निर्वाळा देई.

तीन-चार वर्षे झाली, की दुसऱ्या गावी बदली. निरोप देताना गावकऱ्यांच्या डोळ्यांत बाईच्या कर्तृत्वाबद्दल आदर दाटून येई. कुत्सितही मूक राहत.

मग दुसरा गाव. तेथे दामू मास्तरची दुष्कीर्ती आधी पसरे; आणि मागून त्याच्या बायकोची कीर्ती. चांगल्या अर्थाने कीर्ती—तिच्या कर्तृत्वाची आणि व्रताची आणि वृत्तीची. तिच्या आधारावर तो उभा होता, अजून माणसांत होता, हे सगळ्यांना ठाऊक होई.

—आणि एके दिवशी अचानक तो आधार गेला. घरकाम करताना झालेल्या कसल्याशा शुजबी जखमेचे निमित्त होऊन दामू मास्तरची बायको वारली. धड औषधपाणीही मिळाले नाही. उभा गाव लोटला तिला पोचवायला. ज्याने त्याने म्हटले, की अजून बाईची कांती ओसरली नाही. सगळे लोकांनीच केले.दामू मास्तर कोपऱ्यात बसून होता. चेहऱ्यावर काही विकार नव्हता, की डोळ्यांत पाणी नव्हते. कोणी सांत्वन केले, तर हात जोडी, तेव्हा हसल्यासारखा वाटे, म्हणतात. त्याच्या हातून शेवटचे विधी कसे तरी करवले. आणि त्याला घरी आणून बसवला. आता याचे कसे होणार ?

दुसऱ्या दिवशी दामू मास्तर शाळेत हजर. नेहमीसारखेच कपडे, तीच मुद्रा, तेच प्रकार. रस्त्यावरून जाणारी माणसे शाळेत डोकावून जात; कोणी मुद्दाम त्या रस्त्याने जात. एरव्हीही जात असत, वर्गातला गोंधळ पाहायला.

पण आज वर्गात गोंधळ नव्हता. उनाडांतील उनाड मुले शांतपणे मास्तरांकडे लक्ष देऊन ऐकत होती आणि मास्तर शिकवीत होता. कोणी म्हटले, की नेहमीसारख्या चुका केल्या नाहीत त्याने...खुळ्यासारखा वागलाही काही. सगळी कामे नीट उरकली आणि घंटा झाली, तसा नीट घरी गेला.

त्या दिवशीच नव्हे, पुढेही तसेच राहिले. दामू मास्तर घरातले बघे, शाळेचेही पूर्वीपेक्षा सुरळीत करी, त्याची कळाच जरा सुधारली — असे म्हणतात. तो भास असणार. तो वाटले होते, तसा मुळापासून कोसळला नाही, म्हणून बघणाऱ्याला हा भ्रम होत असणार. कोण जाणे!

# आधी पत्रकार – मग नाटककार !

श्री. मो. ग. रांगणेकर रंगभूमीवर उतरले १९४२ साली, पण त्यापूर्वी पंधरा वर्षे तरी त्यांची भूमिका गाजत होती, ती संपादकाची. तसे गाजणारे संपादक अनेक होते, त्या व्यवसायाभोवतीच वलय होते. किंबहुना तो व्यवसाय नव्हता, ते व्रत होते, अशी त्याची प्रतिष्ठा. पण हे संपादक वृत्तपत्रांचे. ती सगळीच दैनिके नसली, तरी त्यांची प्रकृती दैनिकाची असे. राजकारण हा त्यांचा धर्म. त्यापलिकडचे विषय सहसा ओवळ्यातील. वाचकाला शिकविणे हे त्यांचे आद्य कर्तव्य. त्याला शोभेल, असा त्यांचा करडा सूर असे, आणि एकंदर तीर्थरूप थाट.

पण रांगणेकरी पत्रांचा पिंडच वेगळा. राजकारण, अर्थकारण असल्या कोणत्याच जड-गंभीर कारणांशी त्यांना कर्तव्य नव्हते. शहरी मध्यमवर्गातील सामान्य वाचकाला ज्या विषयांची रुची असे, त्यांची हलकीफुलकी हजेरी घेणे, हा त्यांचा खास उद्योग. त्यात चिमटे– बोचकारे असायचे, कोणाची टोपी ( अथवा पगडी ) उडवली जायची, कसले बिंग फोडायचे. पण हे सगळे वात्रटपणे, चिडीने नव्हे. आकसाने नव्हेच नव्हे. त्या इतर भार-दस्त मानल्या जाणाऱ्या पत्रांना विनोदाचे वावडे असे. रांगणेकरी पत्रांचा विनोद हा मुख्य ऐवज असे. म्हणून विद्यार्थिदशेत आम्हांला त्यांची 'तुतारी' आणि 'वसुंधरा' ही साप्ताहिके प्रिय असत. कधी ती सात्त्विक वृत्तीच्या गुरुजनांना चुकवून वाचावी लागत. कारण त्यांना तसले थिल्लर वाचन पसंत पडणे कठीण.

पुढे श्री. अनंत काणेकरांच्या सहकार्याने रांगणेकरांनी ‘ चित्रा ’ साप्ताहिक काढले. त्यात ती वर उल्लेखिलेली उच्च कारणे होती, पण रांगणेकरांना आम्ही त्याबद्दल कधी जबाबदार धरले नाही ! या साप्ताहिक उद्योगात पडण्यापूर्वी रांगणेकर ‘ अरुण ’ नावाचे एक चिमुकले मासिक काढत असत, ते ‘ साहित्याला वाहिलेले ’ असे, पण वाचण्यासारखे असे. गेल्या कित्येक वर्षांत ज्याची वाट पाहावी, असे साप्ताहिक ( एखाद-दुसरा अपवाद सोडता ) राहिले नाही, तो नियतकालिक प्रकारच इतिहासजमा होईल, अशी भीती वाटते. अशा वेळी रांगणेकरांच्या या चुरचुरीत पत्रांची चव पुन्हापुन्हा आठवावी, यांत नवल नाही. नवनवीन सदरांनी वाचकांचे लक्ष वेधून घेणे आणि पत्राचा ताजेपणा हरवू न देणे, ही पत्रकार म्हणून रांगणेकरांची खास कमाई.

म्हणून ‘ रांगणेकर म्हणजे पत्रकार ’ असे घट्ट समीकरण डोक्यात बसले. दर आठवड्याला नवे वाचायचे, पुढल्या आठवड्याला ते विस्मरणाच्या मार्गावर सोडायचे, हे त्या काळच्या बहुतेक वृत्तपत्री लेखनाचे विधिलिखित रांगणेकरांच्या लेखनाला टळले नाही. असल्या लेखनाचे संग्रह प्रसिद्ध करणारे हौशी, वा धाडसी प्रकाशक तेव्हा नव्हते; आणि रांगणेकरांच्या लेखनाची जातही पुस्तकी नव्हती. कित्येक वृत्तपत्रकारांची तेव्हा असे; आज तर फारच जणांची असते. बातम्यांचे भाषांतर करणारा अग्रलेखाचा आव आणतो; आणि पुस्तकांचे सारांश देणारा स्तंभभरू पुस्तकपरीक्षणलेखकही साहित्यशास्त्रात क्रांती घडवीत असल्याचा शब्दबंबाळ पुकारा करीत असतो— तो किती परीक्षणे पिसून काढली, की संग्रह भरेल, या हिशेबाने ! या बाबतीत रांगणेकर बेहिशेबी, म्हणून त्यांचे दहा-बारा संग्रह निघाले असते, याऐवजी जेमतेम एखादाच निघाला. निपजलेल्या ग्रंथांच्या वजनावर साहित्यिक प्रतिष्ठा ठरण्याच्या काळात रांगणेकरांना ती अर्थातच मिळाली नाही. त्यांनी त्या काळात एक कादंबरीही प्रसिद्ध केली होती— एकुलती एक. तिचे वजन ते किती भरणार !

असले हे रांगणेकर नाट्यक्षेत्रात आले, आणि तेही स्वतःची संस्था काढून— तेव्हा कित्येकांच्या मनात शंका चुकचुकल्या असणार. वस्तुतः पूर्वाश्रमात त्यांनी आपल्या वृत्तपत्रांतून चटपटीत संवाद लिहिले होते. मधल्या काळात चित्रपटक्षेत्राशी संबंध घडला, तेव्हाही तसले लेखन त्यांच्या हातून झाले होते; तेथे, आणि ध्वनिमुद्रिकांसाठी त्यांनी गीतलेखनही केले होते. पण ही स्फुट आणि पांगलेली पुण्याई नाट्यलेखनाच्या बहुविध पण एकजीव बांधणीत कितीशी उपयोगी पडणार ? पण ती तशी उपयोगी पडली, हे ‘आशीर्वाद’ या त्यांच्या पहिल्याच नाटकाच्या यशाने जाहीर केले. नंतरच्या ‘ कुलवधू ’ने ते सर्वमान्य झाले.

या नाटकांच्या—म्हणजेच रांगणेकरांच्या आणि ‘नाट्यनिकेतन’च्या यशाने त्या सुमारास मरगळू लागलेल्या रंगभूमीत तकवा आला. त्यापूर्वीचा इतिहास सर्वश्रुतच आहे. पंचवीस-

तीस सालापर्यंत मराठी रंगभूमीच्या सुवर्णयुगाची द्वाही फिरत होती. त्यानंतर एकाएकी ती कोसळली, तिचे पितळ उघडे पडले. तेहतीस सालानंतर आचार्य अत्र्यांच्या 'हाऊस-फुल्ल' नाटकांनी तिला सावरून धरले; पण अत्र्यांनी आपले बळ पुढे चित्रपटक्षेत्रात अधिक कामी लावल्यामुळे ती पुनश्च लटपटू लागली. मग तिला रांगणेकरांच्या 'नाट्य-निकेतन'ने आधार पुरवला.

मी 'नाट्यनिकेतन'ची सर्वच नाटके पाहिली नाहीत; रांगणेकरांचीही काही नाटके चुकली. म्हणजे प्रयोग चुकले– वाचलीत जवळ जवळ सर्वच. कित्येक नाटककारांबाबत प्रयोग पाहणे आणि पुस्तक वाचणे यांची फलनिष्पत्ती बहुधा एकच असते. रांगणेकर त्यांपैकी नव्हेत. त्यांची नाटकेही तशी पुस्तकी नाहीत. सोय म्हणून ती छापली गेली, तरी त्यांचे खरे ढंग दिसतात प्रयोगात. रांगणेकरांचे खास कर्तृत्व रंगमंचावरचे. त्यांचे संवाद तेथे फुलून येतात. ते संवाद असतात; एका वाक्यातून दुसऱ्या वाक्याला, एका पात्राकडून दुसऱ्या पात्राला चालना मिळते. ती पात्रे भाषण करीत नाहीत. बोलतात. साध्या, जिवंत भाषेत बोलतात, छापील भाषेत नव्हे, आणि त्या पात्रांची बसण्या–उठण्याची, चालण्या–बोलण्याची ढबसुद्धा त्या वाक्यांना निराळा पीळ आणि उठाव देते. रांगणेकर उत्तम तालीम-मास्तर आहेत, म्हणे; असलेच पाहिजेत. त्याशिवाय का आपल्या नाटकातील अधिकांत अधिक नाट्य ते रंगभूमीवर उभे करतात ? ही गौरवाची बाब आहे.

देवल-खाडिलकरांच्या जातीत ते जाऊन बसतात.

पुन्हा रांगणेकरांना गाण्याचे अंग आहे, आणि ते काबूत आहे. त्या (कै. हाय !) सुवर्ण-युगात नाटकाचे जलसे होऊ लागले, या जुन्या आरोपाचे येथे पुन्हा चर्वण नको, पण रंग-भूमीची नवी घडी बसू लागली, तिच्यात संगीताला जागा आखून दिली होती. ती नेमस्त होती. गाणी थोडी आणि गायकीही मैफलीतल्या सारखी ऐसपैस नव्हे. तानबाजीला लगाम होता. नाटकाचा बेरंग करणारे ते संगीत नव्हे ! नाटकाच्या अंगी लागणारे, त्याला 'खाऊन टाकणारे' नव्हे ! (हा शब्दप्रयोगही गायकी वळणाचा !) हा संयम रांगणेकरांनी पाळला. त्यांना नव्या रसिकतेची बूज होती. आणि त्याहून महत्त्वाचे, म्हणजे नाटकांचा बांधा बिघडू नये, ते बेडौल होऊ नये, यावर त्यांचे निश्चल ध्यान असे. (कलात्मक एकसंधता, आकृती, इत्यादी तात्त्विक लिगाड रांगणेकरांना माहीत नसावे. तेच बरे !)

असला सुबकपणा हा एकंदरीने रांगणेकरांच्या नाटकाचा प्रमुख गुण म्हणून मनात ठसतो, कोणाला तो सर्वार्थाने गुण वाटायचाही नाही. नाटकाचा मूळ ऐवजच जर उद्दाम किंवा लोकविलक्षण असेल, तर ही टापटीप काय कामाची ? पण रांगणेकरांच्या नाटकाची प्रकृतीच सौम्य असते, त्यामुळे हा नेटकेपणा तिच्याशी सुसंगत दिसतो. निर्मळ मनोरंजना-साठी लिहिलेले नाटक ज्या समाजासाठी ते असते, त्याने मानलेल्या रीतींशी आणि रुचीशी

फारसे फटकून वागत नाही. असलेच, तर ते पाऊलभर पुढे असते, मागचे पाऊल अर्थातच समाजाबरोबर असते.

रांगणेकर रंगभूमीवर आले, त्या काळी तेथे ' समस्या ' हा परवलीचा शब्द झाला होता. त्यापूर्वीच्या जमान्यातील पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकांविषयी अप्रीती उत्पन्न झाली होती. पाश्चात्त्य रंगभूमीवरील नव्या (खरं म्हणजे जरा जुन्या झालेल्या) उद्दिष्टांची आणि तंत्राची हौशी रंगभूमीवरील तळमळीचे कार्यकर्ते आणि नुसतेच विद्वान हिरीरीने तरफदारी करीत होते. इब्सेन हा त्यांचा नवा भरतमुनी. वास्तववाद, एकप्रवेशी अंक, सामाजिकता, इत्यादी 'मूल्ये' त्याच्या घराण्याकडून आपण उचलली, तीही काहीशा ढोबळ आणि मोघम रूपात. सामाजिकतेसाठी नाटकात समस्या हवी. ज्यांची कला उसनी, त्यांनी समस्याही उसनवार आणल्या. रांगणेकरांचे बोट शहरी प्रेक्षकांच्या नाडीवर बिनचूक होते. त्यांनी ' समस्या ' वापरली, पण तिचा फार बाऊ न करता—आणि तीही त्या समाजातीलच. घराबाहेर पडणारी इब्सेनची नोरा सहीसही उचलली नाही, तिला भानुमती करताना नुसता मराठी पेहराव चढवला नाही, तर मराठी मध्यमवर्गी मन दिले. तिची बंडखोरी फार ताणली नाही, म्हणून असेल कदाचित, ती विनासायास पचनी पडली.

व्यक्तिचित्रणातही रांगणेकरांनी असामान्यतेचा हव्यास धरला नाही. नेहमीचीच माणसे, त्यांचे एखादे वैशिष्टय घट्टपणे धरून त्यांनी उभी केली. विनोदी पात्रांत ही पद्धत विशेष फलदायी ठरते, ती क्वचित व्यंगचित्राच्या वळणावर गेली, तरी ती माणसे आहेत, याचा रांगणेकरांच्या कलमाने विसर पडू दिला नाही.

ही पात्रे रंगभूमीवर फार यशस्वी ठरली, कारण ती सर्व प्रेक्षकांच्या आवाक्यात होती. त्यात मुलखावेगळे काही नव्हते, मनोविश्लेषणाची कसरत नव्हती. एका मर्यादित अर्थाने ती वास्तव होती.

मोठमोठ्या शब्दांच्या भुलावणीने रांगणेकर उगाच खोल पाण्यात शिरले नाहीत; म्हणून त्यांनी गटंगळ्या खाल्ल्या नाहीत. त्यांचे पाय स्थिर राहिले, आणि त्या भक्कमपणाने त्यांनी आपल्या खास पद्धतीची नाटके लिहिली आणि ती रंगभूमीवर यशस्वी करून दाखवली. त्यांनी आपल्या मर्यादा ओळखून घेतल्या, आणि त्यांतच ते सहजपणे वावरले. हेच त्यांचे सामर्थ्य आणि त्यांच्या यशाचे मर्म.

# माझे मित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०८१
रा. क्र. ३६५७०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

फार, म्हणजे फार वर्षांपूर्वीची गोष्ट. मला नुकतीच साहित्यिक मिसरूड फुटू लागली होती. तेव्हा मी ' माझी मैत्रीण मला म्हणाली ' या मथळ्याचा एक लघुनिबंध लिहिला. तो लघुनिबंधाच्या सद्दीचा काळ होता. खरे म्हणजे त्याची सद्दी तेव्हा ओसरू लागली होती; आणि ती काहीशी आपल्याच कर्माने, म्हणजे आपल्याच क्लृप्त्यांनी. त्यांपैकी बहुतेक ना. सी. फडक्यांनी त्यापूर्वीच्या पंधरा–एक वर्षांत घालून दिल्या होत्या; आणि त्या गिरवून गिरवून बोथट होऊन गेल्या होत्या. त्या कमी–अधिक सफाईने गिरवण्यातूनच काही जणांनी कमी–अधिक मोठेपणही मिळवले होते. कधीतरी त्या प्रकाराला शोभेसे ' ललित-निबंध ' हे साजूक नावही मिळाले.

अशा क्लृप्त्यांपैकी एक म्हणजे ललित निबंधात लज्जत आणण्यासाठी आपली मैत्रीण त्यात टाकायची. तिच्यामुळे वाचकाला हुळहुळल्यासारखे होई, आणि त्याहूनही लेखकाला; इतकी त्या काळात मैत्रीण ही विरळ, नवलाईची वस्तू असे—म्हणजे अर्थात पुरुषाला. अशा लेखकाचे आणि लेखनाचे, विडंबन करायची सुरसुरी आली—आणि त्यातून ' माझी मैत्रीण म्हणाली...'

पुढे ती मैत्रिणीची टूम गेली; खुद्द लघु ( किंवा ललित ) निबंधाचीही गेली. दुसऱ्या टूमी आल्या, त्याही यथाकाळ आटपल्या; आणि त्यांच्यासह त्यांच्या खास क्लृप्त्या. पण त्या ललित लेखनातच असतात, असे कुणी सांगितले ? किंवा असाव्यात, असे ? इतरत्र, म्हणजे

गंभीर समजल्या जाणाऱ्या लेखनात, त्या चटकन् डोळ्यांत भरत नाहीत, इतकेच. आपल्या डोळ्यांवर गांभीर्याची जाड झापडे असतात, म्हणून असेल कदाचित !

नाहीतर त्या मरहूम मैत्रिणीचा अलिकडचा पुल्लिंगी आणि भारदस्त अवतार सहज आणि पदोपदी ओळखता आला असता. पण त्या मूळ आणि या नव्या अवतारात दोन महत्त्वाचे फरक आहेत. ती मैत्रीण कल्पनेतील असे, हा मित्र सहसा खराखुरा असतो. त्याचे मुळी नावच द्यायचे असते; म्हणजे त्यालाही बरे वाटते, आणि मैत्रीलाही बरे ! आणि मैत्रिणीचा उल्लेख एकवचनी हवा, मित्राचा बहुवचनी ! आणि त्याच्या मागे ' ख्यातनाम ', निदान ' विद्वान ' यासारखे आदरार्थी विशेषणे; दोन विशेषण लावल्यास आणखी बरे !

जसे : ' त्या दिवशी संध्याकाळी माझे मित्र प्रा. डॉ. घाटपांडे यांनी मला सांगितले, की ' पाकिस्तानी फौजा काश्मिरात घुसल्या आहेत. ( किंवा चिनी फौजा भारतात किंवा भारतीय फौजा हैद्राबाद संस्थानात. ) '

म्हणजे प्रा. डॉ. घाटपांडे यांनी काही गुपित फोडले, किंवा त्याचे रहस्य विशद केले, असे नव्हे; तेवढा त्यांचा त्या घटनेमागील धोरणाशी संबंध नसावा ! पण राजकारणावरील अथवा तसल्या एखाद्या महान ' कारणा 'वरील लेखाला एका फटक्यात वास्तवतेचा आणि वैयक्तिकतेचा स्पर्श लाभला. म्हणजेच, राजकीय लेखनात थोडे लालित्य आले. पण मग थोडेच आणि असे चुटपुटते का ? जरा वाढवून पाहू याच.

प्रथम, ' मित्र ' हे ओकेबोके नाम नको. आधाराला साजेसे विशेषण हवे. कमसेकम ' विद्वान '. हे प्रा. डॉ. ' म्हणजे ते गृहीत धरायला हरकत नाही, असे कोणी म्हणेल, पण तो ' कोणी ' बराच भाबडा असला पाहिजे ! खरे म्हणजे, वजनासाठी आणखी दोन–तीन विशेषणे टाकता येतील. आणि संध्याकाळी ? ' सायंकाळी ' म्हणून तिला जरा वेगळेपण देता येईल. पण ते अगदीच पुसटते. इतकी तिला लंकेची पार्वती का करून टाकायची ? तिलाही छान सजवायला हवी; चित्रासारखी दिसायला हवी ती. आणि घुसणाऱ्या फौजांचा राजकीय नाट्याला उठाव देण्यासाठी पार्श्वभूमीदाखल असे शाब्दिक नाट्य पुरवावे, की वाचणाऱ्याच्या मनात संभ्रम उठावा, की अधिक थरारक कोणते ?

आता हे कसे छानछान दिसते, पाहा :

' ती शीतल सायंकाळ होती, आर्द्र पश्चिमेच्या आरक्त केशरी शोभेने माझ्या मनःकोषात सिसिलीतील तशाच एकाच एक मदिर संधिकालाच्या ललिततरल स्मृती सजग केल्या. तशा पुलकित-उत्फुल्ल मनःस्थितीत मी त्या कलात्मक नेपथ्याने नटलेल्या सुगंधित सभागृहात प्रवेश केला. कोणा सौजन्यशील कार्यकर्त्याने मला प्रेमादरपूर्वक पहिल्या रांगेत नेऊन बसवले. कुमार गंधर्वांच्या रसलिप्त आलापांनी आसमंत निनादून गेले होते. शेजारच्या आसनावर कमनीयपणे बसलेली गौरतन्वी पुरंध्री किणकिणली :

" हा, किनई, निंदियारी राग आहे. यातील कोमल मध्यम किती जीवघेणा आहे ! "

कुमारांच्या सर्जनशील प्रतिभेने निर्मिलेल्या निंदियारी रागाच्या आकृतिसौंदर्याचा केंद्रबिंदू

कोणता, याची माझ्या अंगभूत सवयीप्रमाणे तुलनात्मक चिकित्सा करण्यात माझी तंद्री लागली असता मागून कोणी पाठीला हळुवार हस्तस्पर्श केला. वळून पाहतो, तो माझे ज्येष्ठ विचारवंत, विद्वान मित्र, आणि विद्यापीठाचे निवृत्त कुलगुरू, प्रा. डॉ. पंडितराव घाटपांडे. ते माझ्या उजव्या कानात चिंताव्यथित स्वरात कुजबुजले,

"तुम्हांला कळले का, चिनी सैन्याने भारताच्या ईशान्य प्रदेशावर अकस्मात आक्रमण केले आहे ?"

माझी सांगीतिक एकाग्रता शतधा भंग पावली, आणि मी क्षोभरुद्ध कंठाने बोलून गेलो,

"गेली कित्येक वर्षे माझी मर्मबोधनशील लेखणी हेच सातत्याने सांगत आली..."' इत्यादी.

म्हणजे ऐवज तोच, पण त्याला केवढा उठाव मिळाला, पाहा! आणि केवढा विस्तार! त्याचे श्रेय अनेकांत विभागून द्यायला हवे : निसर्गसौंदर्य तर आहेच. इथलेच नव्हे, तर कोणाला फारसे ठाऊक नसलेल्या (म्हणून अधिक सुंदर) सिसिली बेटातीलही. पुन्हा ते जुनाट कादंबरीकार करतात, तसले कोरडे निसर्गवर्णन नाही. त्यात 'मी' ओतल्यामुळे— किंवा 'मी' मध्ये ते ओतल्यामुळे असेल—त्याला आगळी म्हणतात, तशी कांती चढली. तेच संगीताच्या धुंदीबाबत, त्याच्या उल्लेखानेच धुंदी चढते—ज्याला त्यातील काही समजत नाही, त्याला तर विशेष—आणि कुमार गंधर्वांच्या नुसत्या नावाने तिला वजन दिले. पुन्हा जाताजाता सुगंधाचा शिडकाव, आणि कलात्मक नेपथ्य, आणि कोण्या गौरतन्वीची किणकिण. बारीकबारीक उपसौंदर्यांनी एकंदर परिणाम आणखी वाढवला आहे. आणि ही इतकी सौंदर्ये व लगोलग देशावरील आक्रमणाचे विदारक सत्य, यामुळे काय उपरोध साधला आहे! निसर्ग आणि मानव, कला आणि जीवन, असली सनातन द्वंद्वे कशी एका झटक्यात हजर झाली आहेत!

ही समस्त सौंदर्ये 'मी' भोवती फेर धरतात. ललितलेखनात ते व्हायला हवे, असा मुळी कायदाच आहे. पण गंभीर विषयावरील लेखनातही ते कित्येकदा होत असते; मग विषय राजकारणाचा असो, साहित्याचा असो किंवा कसल्या शास्त्राचा असो. म्हणजे आपली साहित्याच्या वर्गात जागा मिळते. वरची भरजरी ललित झूल बाजूला करून सहसा कोणी तुमच्या बौद्धिक बरगड्या मोजून घेत नाही. यांना आपण ललितगंभीर साहित्य म्हणू.

कोणी म्हणेल, वरच्या त्या परिच्छेदात केवळ लालित्याचा सोस नाही; विद्वत्तेचा देखावाही आहे; नव्या शब्दांच्या बनावटीचा हव्यास आहे. आहे खरा; त्याला काय म्हणणार ? 'ललिद्विद्वत्' यासारखे भयानक विशेषण त्यासाठी बनवावे लागेल. आणि तेच त्याला योग्य आहे!

या सगळ्यांतील खरा सोस 'मी' चा. इतर आनुषंगिक : त्या 'मी च्या प्रकृतीतून उद्भवलेले. ते नेहमीच आढळतात, असे नाही. अशा एका संपादकाची आठवण येते. एरव्ही साधा, कामसू माणूस; आपल्या प्रौढी न सांगणारा. पण हाती संपादकीय लेखणी

आली, की प्रथमपुरुषी एकवचनाशिवाय ती हालत नसे. संपादकाने स्वतःचा उल्लेख बहुवचनात करावा, या संकेताचा त्यांनी केव्हाच त्याग केला होता. ढुढ्ढाचार्यासारखा 'आम्ही'च्या तोऱ्यात वाचकाला ज्ञान किंवा उपदेश न पाजता त्याच्याशी जवळिकीने, अनौपचारिकपणे गप्पा मारल्यासारखे करणे, हे नवेपण त्यात होते. असो. महात्मा गांधींच्या वधानंतर महिन्याने त्यांच्या मासिकाचा अंक निघाला; त्याच्या संपादकीयाची सुरुवातच मुळी अशी होती :

'माझ्या प्रिय वाचकांना महात्मा गांधींच्या निधनाची बातमी देताना मला अतीव दुःख होत आहे.'

पुढे सर्व या आरंभाशी सुसंगत होते. मी महात्माजींना प्रथम कधी, कोठे, कसे पाहिले; शेवटचे कधी, कोठे पाहिले, माझ्यावर त्यांचा प्रभाव कसा पडला, मी त्यांचे कोणते लेखन वाचले, मी कॉलेजातील वक्तृत्व-स्पर्धेत त्यांच्याविषयी बोलून उत्तेजनार्थ पारितोषिक कसे मिळविले, त्यांची कोणकोणती मते मला पसंत नव्हती, तरीसुद्धा त्यांच्याविषयी मी केवढा आदर बाळगीत आलो...अशी ती पन्नास-एक ओळींची महात्माजींना त्या संपादकांची श्रद्धांजली होती.

त्यांचा महात्माजींविषयीचा आदर प्रामाणिक आणि गाढ होता. पण त्यांच्या लेखणीला लागलेले हे 'मी'काराचे व्यसन कधी सुटले नाही. कोणाही साहित्यिकाचा उल्लेख करायचा झाला, तर ते न चुकता 'माझे मित्र, ख्यातनाम किंवा प्रथितयश वगैरे टीकाकार ( किंवा कथाकार किंवा कवी ) वगैरे' असा आवर्जून करीत. नुसत्या नावावर सोडीत नसत. त्यांना साहित्यक्षेत्रात अर्थातच खूपखूप मित्र होते. त्यांनी सर्वांचे असे उदारपणे केले. प्रसंग कितीही मामुली असो, मग सन्मान, एकसष्टी, दुखवटा असल्या गौरवासाठी राखून ठेवलेल्या प्रसंगाचे काय! पुस्तक-परीक्षण किंवा अगदी चार ओळींचा अभिप्राय लिहिला, तरी लेखकाच्या नावामागे 'माझे मित्र' हा शिक्का न चुकता उठवीत. यात कदाचित सौजन्याइतका सवयीचा भाग असावा. कित्येकदा तो लेखक मित्र तर नव्हेच, पण परिचितही नसे : अर्थात नंतर मित्र होई!

पण सवय म्हटली, की ती कधीतरी अडचणीत टाकणारच. ते संपादक तसे कोणाबद्दलही चांगलेच लिहीत. पण एकदा असे घडले, की कोणा एका गृहस्थावर त्यांनी फार रागावून लिहिले. अर्थात ते सकारणच असणार. आणि रागावण्याचा सराव नसल्यामुळे राग कह्यात राहिला नाही. पण प्रत्येक ठिकाणी त्याचा उल्लेख 'माझे ( सन्मान्य वगैरे ) 'मित्र' असाच केला. आणि त्यात उपरोधाचा अंशही नव्हता.

कोणाकडून तरी एकदा ऐकले होते, की कसल्यातरी अहवालवजा औपचारिक लिखाणात स्वतःचा तृतीयपुरुषी उल्लेख करताना त्यांनी अनवधानाने आपल्या नावामागे 'माझे मित्र' लिहून टाकले. पण ही चावट अतिशयोक्ती असावी, अशी शंका येते. तशीच एक चावट पृच्छा कोणीतरी केली होती : एखाद्या लेखिकेविषयी लिहिताना ते 'माझी मैत्रीण'

म्हणतात का ? शक्य नाही. तसे ते शब्दांबाबत देखील फार सोज्ज्वळ आहेत. आणि त्यांना तसला ललित सोस नव्हता ! त्यापुरता त्यांच्या लेखणीचाही व्यवहार जुना होता.

जुना परिपाठ असा, की साधे लिहायचे झाले—पत्र म्हणा, किंवा लग्नाची यादी म्हणा—तरी वर श्रीकार घालायचा. नवा ललित–गंभीर परिपाठ असा, की छापण्यासाठी काही लिहायचे झाले, तर ‘ मी ’ कार घालायचा—वर नव्हे, तर लेखनभर ! छान दिसतो.

# प्राध्यापक : एक जमात

आता ज्या वस्तूला आपण प्राध्यापक म्हणतो, तिला पंचवीस–एक वर्षांपूर्वी प्रोफेसर असे म्हटले जात असे.

हे नामांतर, अथवा उपपदांतर, आचार्य अत्र्यांनी एकदा विनोदाच्या झटक्यात करून टाकले. त्यातील विनोद हरवला, आणि आणखी एका इंग्रजी शब्दाचे मराठीकरण– खरे म्हणजे संस्कृतीकरण– म्हणून तो शब्द गंभीरपणे स्वीकारला गेला. 'ॲडव्होकेट,' किंवा वकील, या कमी–अधिक यावनी शब्दाऐवजी 'विधिविशारद' हा शब्द संस्कृतिसंरक्षकांनी गंभीरपणे सुचवला, तेव्हा तो विनोदी वाटून लोक हसले. डॉक्टरला 'भिषग्रत्न' असे काहीतरी म्हणून रोग्याला भेडसावण्याचा आणि इतरांना हसविण्याचा कोणी फारसा प्रयत्न केला नाही. खरे म्हणजे, 'डॉक्टर' एक बिन–वैद्यकी उपाधीही आहे. संशोधन वगैरे करून वजनदार प्रबंध बनविल्यास ती अंगाला चिकटते. आपली विद्वान माणसे एकंदरीने उपाधिचुंबक! नावाला त्या पुढेमागे लगडल्या, की त्यांना कृतकृत्य वाटते. नावामागे 'प्रा.' आणि 'डॉ.' आणि नावापुढे सगळ्या लहान-मोठ्या पदव्या अगदी एकसमयावच्छेदेकरून म्हणतात, तशा खुळखुळावताना विद्वत्ता कशी तृप्त होते! तेथे प्राध्यापकीचा डॉक्टरीशी होणारा अनावश्यक संकर संस्कृतिवाल्यांनाही खुपत नसावा. नसो! डॉक्टरांप्रमाणेच इंजिनिअर. शासनापुरते त्यांना आता 'अभियंता' हे नाव लावतात; एरव्ही नाही. म्हणजे वकील, डॉक्टर, इंजिनिअर या प्रामाणिक व्यवसायांचा उल्लेख करायला जडगंभीर

शब्द घडविण्याचा खटाटोप व्यवहारात आवश्यक वाटत नाही.कोणी केल्यास ती विनोदी वाटतो. पण विनोदातून निपजलेला 'प्राध्यापक' हा शब्द त्या जातीने स्वतःविषयीच्या आदरामुळे उत्साहाने कवटाळला. हा आदर त्या जातीचे, त्या व्यवसायाचे, एक विनोदी लक्षण आहे. तो व्यवसाय बौद्धिक आहे, असे मानले जाते. असेलही! कारकुनाला आपण बुद्धिजीवी म्हणतो. लेखनासाठी किंवा परिसंवादासाठी इंग्रजीतला ऐवज मराठीत उतरविणाऱ्याला नाही का intellectual म्हणण्याची टूम अलीकडे निघाली आहे? मग बापड्या प्राध्यापकानेच काय घोडे मारले आहे? तो साहेबांच्या इंग्रजीतील ऐवज आपल्या इंग्रजीत उतरवीत नसतो का? तेव्हा त्यांचे बुद्धीचे देणे आपण मान्य करू या; विनोदबुद्धीचे देणे मान्य करणे मात्र कठीण! विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी अथवा खुशामतीसाठी अथवा त्यांच्यावर छाप पाडण्यासाठी तो विनोदाची यातायात करतो; तयार विनोदाचा बटवा जवळ बाळगतो, पण ती गोळी सहसा लागू पडत नाही, कारण ती अपेक्षित असते. गुरुजींचे विनोदाचे वेळापत्रक चलाख शिष्यांना ठाऊक असते. प्रतिवर्षी त्याच सुमारास तोच विनोद वक्तशीरपणे केला जातो. हसे होते, आणि गुरुजी स्वतःवर खूश होऊन पुढील वर्षी त्याच वेळी तोच विनोद पुन्हा वापरण्यासाठी बटव्यात ठेवून देतात. साहित्य हा गुरुजींचा विषय असला, तर विनोदी लेखनाचे मर्म समजावून सांगताना ते जो विनोद अभावितपणे करतात, तो ऐकून जाणकार विद्यार्थी खदखदतात. पु. ल. देशपांड्यांचा 'सहानुभाव पंथ' हे मौलिक संशोधन आणि 'सुरंगा सासवडकर' हे संगीताचे सखोल रसग्रहण असे काही प्राध्यापकांनी त्या प्रसिद्ध लेखांचे वर्णन आणि विवरण केले होते, म्हणे!

हे मातृभाषेतील विनोदाचे, मग इंग्रजीसारख्या परभाषेतील विनोदाच्या बारकाव्यांची ओढाताण काय वर्णावी? आपण इंग्रजीतून सफाईदारपणे विषय समजावून देऊ शकतो, तसा मातृभाषेतून देऊ शकत नाही– किंबहुना मातृभाषेतून 'उच्च शिक्षण' देताच येणे शक्य नाही, असा स्वतःच्या इंग्रजीवरील विश्वास आणि मातृभाषेवरील अविश्वास कित्येक प्राध्यापक वेळी अवेळी बोलून दाखवीत असतात. त्यांचे इंग्रजी मात्र सहसा अत्यंत शंकास्पद असते, आणि जाणत्या विद्यार्थ्यांना त्यांची व्याख्याने त्यांच्या विषयाच्या ज्ञानापेक्षा इंग्रजीच्या अज्ञानासाठी श्रवणीय वाटतात, हा विनोद लक्षणीय आहे! म्हणून प्राध्यापकांचा विनोद हाच विनोद होऊन बसला आहे. मात्र शेक्सपिअरने आपल्या एका पात्राबद्दल म्हटले आहे, ते याही पात्राबद्दल म्हणता येईल : त्याच्यात विनोदबुद्धी नसेल, पण दुसऱ्यांच्या विनोदबुद्धीला तो खाद्य पुरवतो!

कोण जाणे, जेव्हा प्रोफेसर हा शब्द रूढ होता, तेव्हा कुचेष्टेसाठी त्याचे प्रोफेश्वर असे रूप केले जाई......आता ते 'प्राध्यापक' असे झाले आहे का?

पण प्राध्यापकांविषयीचा आदर फक्त त्यांना स्वतःलाच वाटतो, हे खरे नाही. अनेकांना तो वाटतो—विशेषतः जे कधी कॉलेजच्या वाटेला गेले नाहीत, त्यांना, किंवा तेथे जाऊ-

नही भाबडे राहिले आहेत, त्यांना. म्हणजेच बहुसंख्य लोकांना. आता इतक्यांना तुमच्याविषयी आदर वाटत असला, तर तुम्ही स्वतःविषयी आदर न बाळगणे म्हणजे त्या सर्वांचे मन मोडल्यासारखे होते. ते बरे नव्हे!

मी शाळेत होतो, तेव्हा मला आणि माझ्या सोबत्यांना प्रोफेसर–म्हणजेच आजचा 'प्राध्यापक'—या शब्दाचा केवढा दरारा वाटे. तसला एक महापुरुष आमच्या शाळेत व्याख्यानासाठी आला होता. डोळे भरून पाहावे, असा त्याचा आकार होता, आणि कान भरून ऐकावा, असा त्याचा आवाज होता—आणि त्याच्या शब्दाचा वेग! कित्येक दिवस डोक्यात ते सगळे घणघणत होते. आणखी दोन–तीन प्राध्यापकांची भाषणे कोठे कोठे ऐकली. ऐकायला गेलो होतो, तोच महान आदराची कानटोपी चढवून; म्हणून भाषणे डोक्यावरून गेली, तरी (किंवा त्यामुळेच) आदर उणा झाला नाही; उलट दुणावला! कॉलेजमध्ये प्रवेश करेपर्यंत तो वाढतच राहिला; पुढे मात्र त्याला हळूहळू ओहोटी लागली.

त्या काळी दुसरी एक जमात हे 'प्रोफेसर'चे बिरूद लटकावीत असे, ती म्हणजे सर्कसवाल्यांची. कोणी प्रो. राममूर्ति, तर कोणी प्रो. एकनाथमूर्ति, तर कोणी प्रो. नारायणराव वालावलकर. कधी सर्कसवाल्या प्रो. छत्र्यांची लोकमान्यांचे गणिताचे गुरू म्हणून गाजलेल्या प्रो. केरूनाना छत्र्यांशी गल्लत होई. यात आम्हांला काही विसंगती वाटत नसे. कारण सर्कसवाल्यांबद्दलही आम्हांला आदर होता. विशेष म्हणजे अजूनही वाटतो. प्राध्यापकांच्या तऱ्हेतऱ्हेच्या कसरती आणि खेळ वर्षानुवर्ष पाहिल्यावर सांगूनसवरून सर्कस दाखविणारा, वाघसिंह आणि विदूषक आणि तारेवरची तंग युवती यांना कह्यात ठेवणारा खरा थोर वाटतो. शाळकरी भोळेपणाची कात झडून गेल्यावर कळू लागले, की फार फार तर शे-दीडशे पोशाखी मुलामुलींना आपल्यापेक्षा मोठ्या आवाजात एकमेकांशी बोलू न देता वर्गात डांबून ठेवण्यात पुरुषार्थ मानणारा प्राध्यापक हा त्याहून कमी थोर...फार कमी!

—आणि त्या काळी प्राध्यापक दिसतही थोडे–कारण ते असतच थोडे. टंचाईमुळे त्यांचा भाव वधारलेला असे. तेव्हा समस्त मुंबई इलाख्यात नव्हती–त्यात सिंध आणि संस्थानी मुलूख सामील करूनही–इतकी कॉलेजे आज या मुंबई शहरात आहेत. जेथे हायस्कूल निघण्याची शक्यता नसे, अशा आडगावी कॉलेजे मिरवीत आहेत. मग प्राध्यापकांची वीण वाढणारच! हजारांनी मोजून घ्यावेत. त्यांतले नग कुठे भेटतील, त्याचा नेम नसतो. गेली कित्येक वर्षे या क्षेत्रात आनंदीआनंद आहे—मुळीच बेकारी नाही. प्राध्यापकाच्या नोकरीसाठी वणवण हिंडणारा उमेदवार हे वीस-पंचवीस वर्षांपूर्वीचे दृश्य; आता उमेदवाराच्या शोधार्थ कॉलेजांचे चालक आणि प्राचार्य हिंडत असतात; ते वशिले लावतात! त्यांना वधूपित्याची कळा येते, आणि उमेदवारांना 'उपवधू' तरुणांची! आता इतक्यांना पुरेल, एवढा आदर कोठून आणायचा?

पण जेव्हा प्राध्यापकांविषयी खूप आदर असे, असे म्हणतात, तेव्हाही त्यांचा विनोदासाठी काहीसा उपयोग होत असेच. आदराला विनोदाचे अस्तर होते, म्हणा ना! एकेका व्यवसायाचे राखीव विनोद असतात, तसे याचेही आहेत. त्यांतील बहुतेक मूळचे इंग्रजी असावेत. तिकडच्या चुटक्यांच्या भाषांतरांनी आपली नियतकालिके पाने सजवतात, आणि आपण ते उसने विनोद आपलेसे करून टाकतो. मग ते आचरणात आणण्याची जबाबदारी त्या त्या व्यावसायिकांवर पडत असावी. जसे डॉक्टर–नर्स आणि ऑफिसर–स्टेनो या जोड्यांविषयीचे विनोद. विसरभोळेपणा हे प्राध्यापकांचे अगदी ' रजिस्टर्ड ' विनोदी वैशिष्ट्य. माणूस निकोप असला, तर थोडाफार विसराळू असतोच; पण प्राध्यापकाच्या विसराळूपणाचे कौतुक असते. तो सदैव विचारमग्न असतो, विद्वत्तेचा एवढा भार वाहतो, तेव्हा सामान्य गोष्टी त्याच्या ध्यानात कशा राहणार, असा त्या कौतुकातील अभिप्राय असतो. तेव्हा मग्न होण्याइतके त्याचे विचार खोल नसले, अथवा कुणालाच भार होऊ नये, इतकी त्याची विद्वत्ता सुमार असली, तरी जातीचे कौतुक सांभाळण्यासाठी प्रत्येक प्राध्यापकाला थोडाबहुत विसराळूपणा कर्तव्यबुद्धीने करावा लागतोच. प्राध्यापक विसरभोळे हे तर चुटक्यांतील लोकप्रिय पात्र आहे. गडकऱ्यांनी गोकुळला प्राध्यापक केले नाही; याचे कारण असे असावे, की त्याचा विसराळूपणा सहजस्फूर्त होता, मुद्दाम जमवलेला नव्हता! आपला अमुक वर्गावर तास आहे, हे सोईस्करपणे विसरणारा प्राध्यापक आपली हक्काची रजा अजून किती शिल्लक आहे अथवा कोठून किती पैसे यायचे आहेत, असले फायद्याचे तपशील सहसा विसरत नाही. अर्थात तास चुकवणारा प्राध्यापक एकंदरीने शिष्यजनांत लोकप्रिय असल्यामुळे तेवढ्याच सोईस्करपणे तेही त्याच्या विस्मरणशक्तीचे कौतुक करतात. चुटक्यांतला प्राध्यापक आपल्या लग्नाचा वाढदिवस हटकून विसरतो. ते काही केवळ विसरभोळेपणाने नव्हे, हा त्याच्या पत्नीला येणारा संशय अकारण नसतो. तो बोलून दाखवला जात नाही, इतकेच! इतर नवऱ्यांना ती सवलत मिळत नाही. लग्न हा विनोदाचा आवडता विषय; प्राध्यापकाचे लग्न हा त्याचा पोटविषय तर विशेष लाडका. तासाला उशीर करून जाणारा प्राध्यापक समजू शकतो; पण आपल्याच लग्नाला उशीर करून जाणारा प्राध्यापक? तो आशावादी असावा. तासाला वेळेवर न गेल्यास विद्यार्थी पांगतात, तशीच येथेही सुटका होईल, अशी खुळी आशा त्याला वाटत असावी. आमच्या एका प्राध्यापक स्नेह्याला तर आपले लग्न झालेले आहे, याचाच मधूनमधून विसर पडत असतो. मग त्याच्या पत्नीला त्याला करकचून आठवण करून द्यावी लागते!

त्या मानाने कपड्यालत्त्याबाबतचा विसराळूपणा अगदीच निरुपद्रवी. आमचे एक प्राध्यापक दोन पायांत दोन निराळ्या रंगांचे बूट घालून वर्गावर आले, त्यांच्या एकंदर ध्यानात त्यामुळे काही विक्षेप आला नाही. जरा खसखस पिकली, एवढेच. त्याकाळी गबाळेपणा हा त्या जातीचा धर्म मानला जात असे. आजचा प्राध्यापक, मला वाटते, अधिक आजतागायत असतो, म्हणजे कपड्यालत्त्यांत! त्याने असे काही केले, तर ती नवी फॅशन

समजून काही विद्यार्थी तरी ती तत्परतेने उचलतील.

बोलणे हा प्राध्यापकांचा मुख्य धंदा, खरे म्हणजे तेच त्याचे मुख्य भांडवल. ते सुसंबद्ध असावे लागते, असे नाही. कोणी सदैव स्वतःविषयी बोलत असतो, कोणी सदैव दुसऱ्या-विषयी, कोणी आणखी कशाविषयी. व्याख्यानाच्या विषयासंबंधी बोलले पाहिजे, हा निर्बंध पाळणारे थोडे, त्याचा अभ्यास करून, तयारी करून, बोलले पाहिजे, असे मानणारे अगदीच थोडे. इतरांच्या, धंद्यात मुरलेल्या, हिशेबाने ती कच्ची मडकी कधीकाळी. आपल्या परीक्षेसाठी इकडून तिकडून काय गोळा केलेले असेल, त्यावर गुजराण करायची, फार तर अध्यापनाच्या आरंभीच्या दिवसांत काय टिपणे काढली, त्यांवरच अख्खी हयात हाकायची. पुन्हा तीच टिपणे. इतर पुस्तकांतून अवतरणचिन्हांशिवाय उचललेल्या अवतरणांची भरताड करून आपले पुस्तक म्हणून छापता येते व निदान आपल्या विद्यार्थ्यांच्या माथी मारता येते, म्हणजे ग्रंथकर्तृत्व आणि द्रव्यलाभ असे दुहेरी साफल्य लाभते.

स्वतः टिपणे काढायचे कष्ट फार, असे वाटले, तर विद्यार्थी ज्या तयार टिप्पणिका आणि मार्गदर्शिका वापरतो, त्याच आपण वापरायच्या. इतकेच, की विद्यार्थी त्या परीक्षेपूर्वीच्या धांदलीत वापरतो, प्राध्यापकाने पूर्वी त्याच वापरल्याचे त्याच्या ध्यानात येत नाही! विशेषतः वरच्या वर्गांतून प्रस्तुत विषयावरील महत्त्वाच्या पुस्तकांची यादी देण्यात येते, विद्यार्थी ती उत्साहाने उतरून घेतात. स्वतः प्राध्यापक ज्या एखाद्या पुस्तकातून आपली व्याख्याने सजवितो, तेच तेवढे यादीत नसते. एखादा चलाख विद्यार्थी ते हुडकून काढतो; आणि व्याख्यानाच्या वेळी ते पुढ्यात घेऊन बसतो. पुस्तकांच्या यादीत स्वतः कधी न पाहिलेली पुस्तकेही घालणारा प्राध्यापक असतोच, त्याला एखादा फाजील चौकस, किंवा नुसताच फाजील, विद्यार्थी अडवतो. मुरलेला प्राध्यापक अशा प्रसंगी डगमगत नाही; त्याचे बिंग बहुधा बाहेर फुटत नाही. या जातीचेच बिंग बाहेर फुटत नाही, सदैव सुरक्षित असते. तिची विद्वत्ता, तिची ज्ञानलालसा गृहीत धरली जाते.

प्राध्यापकांचे व्याख्यान कसेही असो—कितीही रटाळ, भोंगळ, पोकळ—मान मोडून त्याची टिपणे घेणारे विद्यार्थी असतातच, आणि ही निष्ठा विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनींत अधिक. अध्यापकाला अशा निष्ठावंतांचा केवढा आधार असतो! आणि कदाचित त्याला अल्पही विनोदबुद्धी असली, तरी याने हसू येत असेल, ज्याला तीही नसेल, त्याचा अहंगंड आणखी बळावत असेल, आणि तो प्रेषिताचा चढा सूर लावीत असेल.

फार वर्षांपूर्वी आमच्या कॉलेजात इंग्रजीच्या एका नामांकित प्राध्यापकांनी पैज मारली, की मी तासभर वर्गात काहीतरी असंबद्ध, विसंगत आणि आचरट बोलतो, तरीही कित्येक विद्यार्थिनी ते सगळे कसोशीने उतरून घेतील. प्राध्यापकमहाशयांनी ते केले आणि विद्यार्थिनींनी त्यांची अब्रू राखली. त्यांनी पैज जिंकली! पण हे तर जाणूनबुजून, सांगून-सवरून केलेले. विद्वत्तेचा आव आणून दिलेल्या व्याख्यानांची टिपणे अनेकदा त्या विद्वत्तेचे

पितळ उघडे करतात. मराठी ऑनर्सच्या एका विद्यार्थिनीच्या वहीत ' तांबे ज्ञानेश्वरांसारखे लिहितात ' असे गुरुमाऊलीचे वचन भक्तीने नोंदून ठेवलेले आढळले, दुसऱ्या एका वहीत ' नारिंगी निशाण ' हे नाटक श्री. कृ. कोल्हटकरांनी लिहिल्याचा स्वच्छ उल्लेख होता. कोल्हटकर, देशपांडे, कुळकर्णी असल्या नावांची लेखक मंडळी फार झाली, तेव्हा प्राध्यापकांचा गोंधळ उडणारच! पण असल्या वह्यांतून पुष्कळ अभावित विनोद हाती लागतो. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांतून लागतो, त्याहून अधिक! आणि विद्यार्थ्यांच्या तसल्या कित्येक विनोदांचे पितृत्व त्यांच्या प्राध्यापकांचे असण्याचा संभव आहे...पण विद्यार्थ्यांच्या चुकांतून विनोद पिकविणे हा अनेक प्राध्यापकांचा हातखंडा खेळ असतो!

गडकऱ्यांच्या प्रो. कोटिबुद्धयांची भाषणे विनोदी आहेत, कारण त्यांत एका अर्भकाशी बोलताना त्यांच्या जडजंबाल विद्वत्तेचा अनाठायी उद्रेक होतो; पण ती विद्वत्ता सोंगाडी नाही; ती फक्त अप्रस्तुत होती. कोणत्याही सोंगाढोंगातून विनोद निर्माण होऊ शकतो, हे ध्यानात घेता प्राध्यापकाच्या व्यवसायात त्याला अमर्याद वाव आहे, असे म्हटले पाहिजे.

हा व्यवसाय उदात्त आणि स्वार्थत्यागी असल्याचा बहाणा आणि गवगवा जुना आहे. टिळक-आगरकरांसारख्या चार महान नावांच्या आवरणाखाली आजवर तेथील अनेक प्रकारचे क्षुद्र स्वार्थ खपले. काही तांत्रिक स्वार्थत्याग केल्याच्या पुण्याईमुळे स्वार्थाच्या अनेक वाटा चोखाळता येऊ लागल्या–काही उजळ माथ्याने, काही लपूनछपून. विद्वान हा व्यवहारशून्य असतो, असा समज पसरविल्यामुळे विद्वत्तेचे सोंग काढून त्याच्याआड विविध व्यवहारांच्या उलाढाली चालविण्याची सोय झाली. पोटभरू प्रकाशने, शिकवणीचे वर्ग, परीक्षकगिरीसाठी सौदेबाजी, भक्तखाऊपणा, पाठ्यपुस्तकांची दलाली असला हपापा माजला. इतके करून वर उदात्त स्वार्थत्यागाचा सव्वाहात तुरा! यात विनोद नाही, असे कोण म्हणेल ? फक्त तसले प्राध्यापक म्हणतील, इतका त्यांना स्वतःविषयी महान आदर असतो.

# पाघळणारे पत्रलेखक

पत्रलेखक म्हणून मी आजवर मोठा दुर्लौकिक मिळवला. तो सार्थ ठरावा, अशी तऱ्हेतऱ्हेची पापे केली; काही नकळत हातून घडली. पत्र लिहायला, विशेषतः उत्तर पाठवायला विलंब लावणे हे तर इतके अंगवळणी पडले आहे, की ते पाप म्हणून उठूनच दिसत नाही. आता अगदी मनातले बोलायचे, म्हणजे ते तर पाप नव्हेच; उलट उठसूठ, लंबी-चवडी, मायनेवाज पत्रे लिहिणे, कोणाचे आले, तर त्याला उगाच घायकुते उत्तर पाठविणे—मग विषय कितीही क्षुल्लक असो—हेच खरे पाप. निष्कारण पैशाची, कागदाची, शाईची आणि वेळाची खराबी. वेळ आपल्याप्रमाणे, ज्याला लिहिले, त्याचा, आणि पोस्टमनचाही! पण त्याचे सोडा. उत्तराला विलंब लावणे हे निकोप प्रकृतीची बहुतेक माणसे करतात, म्हणून तिकडे काणाडोळा केला, तरी तो विलंब झाकण्यासाठी पत्रावर चार-आठ दिवसांपूर्वीची तारीख घालणे हे तरी पापच ना? आपण ते वारंवार केले. आणि आता कबुलीजबाब द्यायलाच बसलो आहे, तेव्हा हेही सांगून टाकावे, की मुळातच पत्र न लिहिता, 'केव्हाच टाकलं मी पोस्टात; अजून पोचलं नाही तुम्हांला, म्हणजे आश्चर्य आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या पोस्टखात्याचं काय झालंय्, पाहा!' असा कांगावाही मी कित्येकदा केलेला आहे. तो सहसा पचतो, कारण स्वातंत्र्यानंतर सरकारी खात्यांचे असे काही झाल्याचे हुशार माणसे नेहमीच म्हणत असतात! कित्येकदा असे मी म्हटले, त्यात थोडीशी अतिशयोक्ती आहे—दोन—चारदाच केले असेल—पण आपल्या पापकर्माची

कबुली देण्याच्या होशात माणूस तसे करतोच; त्याला जरा हलके वाटते, आणि ऐकणाऱ्यालाही खूप बरे वाटते! असो.

याशिवाय, पत्रातील मजकुराबाबत खोटारडेपणा किंवा सोंगाडेपणा मी किती वेळा केला असेल, त्याची गणतीच नाही. अर्थात हे सगळे बहुधा उपचार म्हणून केले. अभिनंदन, शुभेच्छा, दुखवटा, इत्यादी कलमे त्यात येतात. आपण सगळेच ते करतो. पण अनेकदा उपचाराची सबब नसताही मी ते केले—म्हणजे न वाटलेल्या भावना ऐसपैस शब्दांत मांडल्या —कधी त्या शब्दांखातर, तर कधी आपला सज्जनपणा दाखविण्यासाठी, उलट कधी आपला वेडरपणा वगैरे दाखविण्यासाठी अकारण कडकपणे लिहिले; उपरोधाची कसरत करून दाखवली. आपले हे लेखनकौशल्य अनेकांच्या नजरेस पडेल, त्यांची वाहवा मिळेल, या आशेचे बळ अशा वेळी लेखणीला मिळे! कोणाची खासगी पत्रे मिळाली, की त्याच्याबाबतचे संपूर्ण सत्य हाती लागले, असे मानणारे चरित्रकार आणि संशोधक भाबडे तरी असावेत—किंवा संधिसाधू!

ते असो. पत्रांबाबत मी असत्याचे प्रयोग पुष्कळ केले, हे खरे; पण एक पाप कधी केले नाही. ते म्हणजे लडिवाळ पत्रे लिहिण्याचे!

ते केले नाही, याचे कारण फार वर्षांपूर्वी मी त्याचा धसका घेतला, हे होय. तो बाबुरावांमुळे. त्यांना पत्रे लिहिण्याचे घोर व्यसन होते; त्याचे विशेष नाही; असते कित्येकांना. पण बाबुरावांची पत्रे वाचून—मला आलेली आणि इतरांना आलेली—मला कसेसेच वाटू लागे; इतकी ती गुळचट, ओशट, लडिवाळपणाने माखलेली असत. चांगला पावणेसहा फूट उंचीचा, पावणेदोनशे पौंड वजनाचा, पस्तिशीपास्चा भारदस्त पुरुष, पण पत्र लिहायला बसला, की त्याच्या लेखणीतून असे काही ठिबकू लागे.

—नाही, तुमच्यापैकी कित्येकांना संशय आला असेल, तशा 'रोमँटिक' म्हणतात, त्या अर्थाने बाबुरावांची पत्रे लडिवाळ नसत, हे कटाक्षाने सांगायला हवे.

ती पत्रे निराळी. ती एकाच व्यक्तीला—निदान एका वेळी एकाच व्यक्तीला—लिहावी, असा संकेत आहे. तो मोडून घाऊक लेखी लडिवाळपणा करणारे आमच्या गोपूसारखे अपवाद असतातच! ती व्यक्ती अर्थातच विरुद्धलिंगी असावी लागते. आज ना उद्या तसली पत्रे लिहिणे थांबते— सामान्यतः कारण त्यांचे प्रयोजन सफळ झालेले असते. कोण जाणे, ते फळ म्हणजेच त्यांचे प्रायश्चित्त असते. अनेकदा ती पत्रे उलटसुलट, म्हणजे परस्परांना, जातात. उभयतांची त्यापुढील पत्रे कमीकमी लडिवाळ होत, शेवटी कधीकधी ती वकिलांकरवी लिहिली जातात.

बाबुरावांची पत्रे असली नव्हेत. त्यांनी विवाहपूर्व पत्रव्यवहार केला नसावा, असे मानण्याला जागा आहे. विवाहोत्तर व्यवहाराचा प्रसंगच आला नाही; कारण त्यांच्या सावित्रीने त्यांना कधी दृष्टीआड जाऊ दिले नाही. ते घरजावई असल्यामुळे अपत्यजन्मोत्सवामुळे लाभणारा विरहानंदही त्यांच्या वाटेला कधी आला नाही.

–कोण मानसशास्त्रज्ञ म्हणेल, लेखणीची ती तहान त्यांनी आपल्या असल्या पत्रांनी भागवली असणार. त्या बिचाऱ्याला आपल्या शास्त्राशी इमान राखणे अवश्य आहे. पण तसे नसावे–इतका बाबुरावांच्या पत्रांचा लडिवाळपणा वेगळ्या जातीचा होता, आणि त्यांचा पत्रव्यवहार हा बहुधा पुरुषांशीच असे !

त्यांची लेखणी कशानेही पाघळू लागे–आणि कोणालाही लिहिताना ! पाघळणे हा तिचा स्वभावधर्म होता. प्रिय मित्राचे लग्न ठरले, तेव्हा त्याचे अभिनंदन करताना लिबलिबीत लिहिले, तर ते निदान समजू शकते. 'वेंगुर्ले समाचार'च्या कथा–लेखनस्पर्धेत मला तिसरे बक्षीस ( विभागून ) मिळाले, तेव्हा त्यांनी माझे कौतुकवजा अभिनंदन करावे, यात मला तरी काही वावगे वाटले नाही. जरा अवघडल्यासारखे झाले, ते माझ्यात चेकॉव्ह, मॉम, टागोर आणि खांडेकर एकसमयावच्छेदेकरून वसत असल्याचे त्यांचे वाक्य लोकांना वाचून दाखवताना. निदान मी वयाने तरी त्यांच्याहून लहान होतो. पण माझे मामा त्यांच्याहून वीस वर्षांनी तरी मोठे. ते रेल्वेतील बुकिंग क्लार्कच्या पदावरून निवृत्त झाले, तेव्हा बाबुरावांनी त्यांना पत्र लिहिले; ते मोठे मासलेवाईक होते. नुसते गोडव्याने थबथबलेले; पाठीवर हात फिरवल्यासारखे आणि बोबडेबोबडे. वाचून कोणाला वाटावे, की आमच्या मामांमुळेच गाड्या चालत. ते तिकिटे विकीत, ते, म्हणे, प्रवाशांच्या अनुभवाची क्षितिजे फाकावीत, म्हणून ! ( तेव्हा 'अनुभवविश्व' हा शब्द सवंग झाला नव्हता. ) अशी क्षितिजे फाकली, की माणसातील सुप्त कवी जागा होतो–तस्मात् मामांच्या कर्तृत्वामुळे 'काव्यप्रांत बहरला', असे बाबुरावांचे म्हणणे. तेही किती गुळगुळीत भाषेत–अगदी ललित म्हणतात, तसल्या लचकणाऱ्या शैलीत ! मला त्या पत्राची सुरुवात आठवते: 'मत्प्रिय चिंतोपंत ( हे मामांचे नाव. त्यांना 'प्राणप्रिय' म्हटले नाही, हे त्यांचे नशीब !). काल संध्याकाळी बागेत पुष्पलतिकेचे मधुर दर्शन झाले. ( म्हणजे पुष्पी, मामांची नात, वय वर्षे साडे आठ ) कित्ती गोड दिसायला लागली आहे ती अलीकडे, चिंतोपंत. (नशीब ! चिंतोपंत या नावाचे काही ललितरूप नाही केले ! ) बागडता बागडता ती सहज म्हणाली, 'बाबुकाका, आमच्या आजोबांनी, किनई, कालपासून पेन्शन घेतली.' ते ऐकले आणि वाटले दिशा अंधारून आल्या; उदासवाणा झालो; रात्री डोळ्याला डोळा लागला नाही...' इत्यादी. अशी चार पृष्ठे गहिवराने भरली होती.

पण बाबुरावांचा गहिवर वाहायलानिवृत्तीचा अगर दुखण्याचा अगर दुखवट्याचा प्रसंगच लागतो, असे नाही. शुभप्रसंगीही तो मुक्तपणे वाहतो. किंबहुना, त्याला काही विशेष प्रसंग लागतो, असेही नव्हे. जुजबी पत्राचेही निमित्त त्याला पुरते. मुलगा शाळेतून आजारामुळे गैरहजर राहिला, म्हणून शिक्षकाला पत्र; अंक टपालात गहाळ झाला, याविषयी संपादकाला पत्र; हिंगाष्टकचूर्ण मागविण्यासाठी दुकानदाराला पत्र; अशा पत्रांतही बाबुराव लाडीगोडी लावीत. मग निमित्त मिळाल्यावर ते लेखणी सरसावणारच. निमित्त कसलेही पुरे, त्यात तारतम्य नसे. सर्दीपडशाने कोणी आजारी असल्याचे ऐकले, की बाबुराव त्याला

पत्रातून धीर देत, तो कॅन्सरला अनुरूप अशा सुरात; पण गोडवा बिघडू न देता. रोगावरून आठवले, माझा एक डॉक्टर पुतण्या आहे. तो म्हणतो—बाबुरावांच्या लेखणीलाच मधुमेह झाला आहे !

मधुमेह आनुवंशिक असतो, म्हणतात. बाबुरावांच्या लेखणीचे असे व्हायला त्यांचा प्रचंड पिंड ज्या ललित साहित्यावर पोसला गेला, ते जबाबदार असावे. खरे म्हणजे फार लेखण्यांचे तसे झाले आहे; त्यांतील कित्येकांचे कोडकौतुकही झाले आहे. बाबुराव एरव्ही लेखन करीत नाहीत. साहित्यिकांत ऊठबस नाही,—म्हणून आम्ही त्यांना हसतो, इतकेच ! बाबुराव कधी इंग्रजीत पत्रे लिहितात, त्यांत असला लडिवाळपणा बिलकूल नसतो. मराठीत तो शोभून दिसत असावा. आणि मला वाटते, बाबुरावांना इंग्रजीचा तसा धाक आहे. बिचाऱ्या मराठीला मात्र असे लिहिणाऱ्यांचाच धाक असतो !

बाबुरावांची पत्रे पाहण्यासारखीही असतात. आखीव कागद, रेखीव लिहिणे, नखरेल अक्षर. सगळे कसे देखणे आणि सुबक आणि सुंदर आणि सु...सु...वेलांटी लावणीतल्या बाईसारखी मुरडत असते. आपल्या बाळबोध लिपीत एवढे बाक आणि एवढी वळणे आहेत, याची आपल्याला कल्पना नसते. ती वळणे आणि कानामात्रा एकमेकांत गुंतवून बाबुराव वाचणाऱ्याचे डोळे खिळवतात. शाईही नवलाची वापरतात. कधी एकाच पत्रात दोन रंगांची शाई—वेगळ्या भावना रंगविण्यासाठी, म्हणे !

पत्र पाहून वाटावे, कोणा पंधरा-सोळाच्या हिरव्या पोरीने लिहिले आहे. बाबुरावांना याचा अभिमान आहे, म्हणतात. खालची सही वाचताच निराशा होऊ नये, म्हणून ते ती इतकी गुंत्याची आणि मोहक वगैरे करतात, की ती वाचताच येऊ नये. त्यामुळे त्यांच्याकडून वर्गणीबाबत आलेल्या एका पत्राने कुणा संपादकाची गफलत झाली, आणि त्याने नाव अजमासाने वाचून, मागे कु. लावून सप्रेम भेटीची प्रत पाठवायला सुरुवात केली; असे ऐकिवात आहे.

असो. बाबुरावांचे बरे चालले आहे. तशीच पत्रे ते अजून लिहीत असतात. वाचायला लडिवाळ, दिसायला सुंदर. पण आपले वय, बेटे, वाढत गेले— आपल्या हातून ते पाप होणे नाही !

# सक्तीचे साहित्य

काही तरी लिहून काढायचेच, या घोर निर्धाराने मी आज भल्या सकाळी मांडी मोडून बसलो आहे. याला कारण संपादक. वडीलधाऱ्या माणसांच्या मुर्वतीखातर पूजेअर्चेला बसलेला अर्धवट सुधारक, बायकोच्या धाकाने बाजारहाट करावयास निघालेला हक्काचा नवरा, आणि फार कथा-कादंबऱ्या वाचून ( व त्या खऱ्या मानून ) प्रेमात पडावयास उद्युक्त झालेला विशीतील पोरगा, या सर्वांची बावळट कळा या क्षणी माझ्या मुद्रेवर विराजत असावी, असा माझा प्रामणिक अंदाज आहे. यातून सुटका तर नाही, पण आपण हे अंतरीच्या उमाळ्याने आणि स्वतंत्र बुद्धीने करीत आहो, असा आव आणण्याची खटपट करावी लागते. संपादकाच्या जातीचा चिकाटी हा पहिला सद्गुण. परस्थ संपादकाची पत्रे न मिळाल्याचे सोंग टपालखात्याच्या कीर्तीवर विसंबून वठविणे शक्य असते, पण स्थानिक संपादक दूधवाल्याप्रमाणे, अथवा विम्याचे हप्ते व उसन्या घेतलेल्या पैशांची फेड यांची मागणी करणारी चेंगट पत्रे आणि बिले ही न चुकता आणणाऱ्या पोस्टमनप्रमाणे, जर दररोज दार ठोठावू लागला, तर ' घरी नाहीत 'ची भाबडी क्लृप्तीही फारशी उपयोगी पडत नाही, हे मी अनुभवाने सांगू शकतो. दर दिवशी नवी सबब सांगावयाची म्हटले, तरी दोन-तीन आठवड्यांपलीकडे ताणण्याइतकी आपली कल्पनाशक्तीही ऐसपैस नाही. ठामपणे 'नाही' असे सांगण्याइतके धैर्यही अंगात नसते. ( विशेषतः, बावळटपणाच्या आरंभी दिलेल्या तीन नमुन्यातील नं. २ प्रमाणे ! ) चार शूर लोकांची शाळकरी चरित्रे आठवून ते धैर्यही

चेहऱ्यावर गोळा करण्याचा प्रयत्न केला, आणि आरशांसमोर उभे राहून त्याची तालीम घेतली, तरी प्रथमदर्शनीच संपादक सहसा इतक्या प्रेमळपणे हसतो, की आपलाच गळा भरून येतो–आणि या संतसज्जनाला व्यर्थ पायपिटी करावयास लावणारा ' काय म्यां दुष्ट ' असा स्वतःविषयी तिरस्कार वाटतो. मग उरतो एकच मार्ग. कागद पुढे ओढावयाचा आणि केव्हाच रिते झालेले व सुरकुत्या पडलेले आपल्या विचारांचे पोळे त्यांवर जबरीने पिळून काढावयाचे. सुदैवाने आपले संपादक इतके उदारहृदयी आणि आपले वाचक इतके समजूतदार असतात, की या जबरीकडे ते डोळेझाक करतात आणि काही पडेल ते गोड मानून घेतात.

मात्र ते कर्म पार पाडल्यावर खंत वाटते. आजवर हेच झाले आणि पुढेही तसेच होणार ! हे सगळे अनैसर्गिक. साहित्याविषयी गंभीरपणे बोलताना आणि लिहिताना असे म्हणावयाचे, की भावनांचा कल्लोळ उठतो आणि त्यातून आपोआप कलानिर्मिती होते ( इत्यादी ). वर्ड्स्वर्थच्या spontaneous overflow of powerful feelings या प्राथमिक अनुपानाची आजवर असंख्य वेळा उजळणी केली, पण ती पोपटपंचीच. कारण आपण मात्र निगरगट्टपणे भावनाविवनांना उकळी येण्याची वाट न पाहता शिकाऊ गृहिणीप्रमाणे बेचव साहित्य संपादकाच्या पुढे आदळीत आलो. आपला एक डोळा होता कॅलेंडरवर आणि दुसरा घड्याळावर. खरे म्हणजे भावनेला उकळी येऊ लागते–पण ती सगळे होऊन गेल्यानंतर, आणि ती भावना पश्चात्तापाची. आणि बेचैन वाटते.

पण बेचैनी झाली, तरी तीही कंटाळून ओसरणारच. मग त्या निवलेपणी असा विचार येतो, की सर्व मोठमोठ्या लेखकांचे खरोखरच काही वेगळे होत असेल का ? स्फूर्ती उचंबळून आली, की लिहू लागायचे, तिची झरणी आटली, की थांबायचे–आणि गरजू संपादक अथवा प्रकाशक आला, की बासनात काही असेल, ते त्याला काढून द्यावयाचे, अथवा काही नसल्यास त्याला विन्मुख पाठवायचे, अशी त्यांची करडी शिस्त असेल, हे मनाला पटत नाही. बिलकुल अतिमानुष ! जुन्या काळचे सोडून द्या —तेव्हाचे सगळेच अजब ! कवि–माणूस लाखलाख कविता उगाच लिहावयाचा. अगदीच ' स्फूर्तीचे अरबी समुद्र.' पण अर्वाचीन युगाच्या पहिल्या बहरातील टिळक, आगरकर, चिपळूणकर हे श्रेष्ठ घ्या. ( आपण सध्या फक्त गद्याविषयी बोलू. ) निबंधमाला, सुधारक, केसरी यांसाठी लिहिताना त्यांची लेखणीही नियतकालिक म्हणजे अगदी वक्तशीर बनली असणारच. ती मोठी माणसे, तेव्हा त्यांचे विचार ( आणि भावना ) सदैव तापलेले असणार, हे कितीही खरे असले, तरी कोणाच्याही स्फूर्तीची तोटी चोवीस तास वाहती राहील, ही कल्पनाच कशीशी वाटते ! त्यांनीही जुळाऱ्याच्या जाचाने बरेचसे लिहिले असेल. तेच पुढे केळकर–खाडिलकरांसारख्या इतर संपादकांचे. मग आजच्या संपादकांचे काय पुसावे ? पण आपण थोर लेखकांविषयी बोलत आहोत. हरिभाऊ आपट्यांसारखा प्रतिभाशाली कादंबरीकारसुद्धा ' करमणूक 'ची तारीख आणि पृष्ठे सांभाळून हिशेबीपणे लिहावयाचा. त्यातही, म्हणे,

एकाच वेळी एकाहून अधिक कथा चालू असावयाच्या, ते आणखी बिकट. वरील पाक-भाषा वापरायची, म्हणजे एखाद्या काटकसरी आणि सराईत गृहिणीप्रमाणे तीच कढी तेवढी वेळ भागविण्यापुरती पुन्हा पुन्हा गरम करून घ्यायची. भलतेच. कसलीही कढी (आणि कसलीही गृहिणी) झाली, तरी अशा प्रयोगाखाली किती काळ टिकणार आणि फाटल्याशिवाय राहणार ? तेव्हा स्फूर्तीची आणि भावनांच्या ऊर्मीची ही सगळी तापदायक कल्पना सोडून देणेच बरे.

नियतकालिके वाढली, मुद्रकांची आणि प्रकाशकांची गर्दी झाली, तसा हा जाचही वाढला असणार. मात्र वरेरकरांसारख्या आजच्या महान लेखकाला उपजीविकेसाठी दिवसाकाठी इतकी पाने अशी लेखनमजुरी करावी लागते, ती पोटाच्या आचेने, काळजाच्या नव्हे. फडकेही कलेसाठी (आणि आता 'अंजली'साठीही) काळ–काम–वेगाची कोष्टके साधून नियमितपणे लिहीत आले. खांडेकरांनीही ध्येयवाद आणि आगामी प्रकाशनांचे वेळापत्रक ही दोन्हीही सांभाळून मुबलक लिहिलेच, की नाही ? या दिवाळीच्या सणासाठी यांच्या-प्रमाणे इतर यशस्वी लेखकांचीही ओढाताण होत असेल. भीड, लोभ, वशिला कशामुळे तरी लिहीत सुटावे लागत असेल. क्वचित देऊ केलेल्या मोबदल्यामुळेही असेल, पण त्यात काहीच वावगे नाही. दिलेला शब्द मोडण्याचा मुर्दाडपणा करण्यापेक्षा कोंड्याचा मांडा करणे केव्हाही चांगले. मुद्दा असा, की मोठा लेखक सिद्धहस्त असला, तरी बापड्याला मुहूर्त साधण्यासाठी स्फूर्तीची वाट न पाहता सक्तीने कलाविकास साजरा करावा लागतो. तंत्राचे साचे चालविणाऱ्या फडक्यांइतकीच अंतर्मन ढवळणाऱ्या नवकथाकारांनाही आपापले वैशिष्ट्य राखून घेतलेली आमंत्रणे पार पाडावी लागतात. तीच कथा टीकाकारांची, विनोद-कर्त्यांची–आणि कवींचीही ! पण मंडळी आपापल्या परीने सफाईने कामगिरी पार पाडतात. अशी, की वाचकाला त्या सगळ्या सक्तीचा एवढासा वळही दिसू नये.

आमंत्रणावरून मला एका भटजींची आठवण झाली. तुळशीचे लग्न लावण्याची ते पंधरा-वीस आमंत्रणे घेत आणि शिताफीने तडीस नेत. शेवटच्या लग्नाला मध्यरात्र उलटे आणि गळून गेलेले भटजी, धापा टाकीत, बसलेल्या घशातून सगळे मंत्र ओढून काढीत. त्यामुळे एकंदर प्रसंगाचा नूर फारसा शुभ नसे. पण भटजी सगळ्या यजमानांचे आवडते–आणि यज-मानांचे मन राखण्यासाठी तेही नाही म्हणत नसत.

आपल्या आवडत्या लेखकावरचा या मोसमातला ताण पाहिला, की त्या धापा टाकणाऱ्या, घसा बसलेल्या, पण आस्थेवाईक भटजींची आठवण होते. तीही आदराने, कारण तुळशीच्या (वार्षिक) सौभाग्यापुढे आपल्या तन्दुरुस्तीचे काय होय, अशी त्यांची कर्तव्यबुद्धी जागृत होती.

पण कवींचे काय ? त्यांनाही दिवाळी घालावी लागतेच. वर्ड्स्वर्थची व्याख्या मूळ काव्याची. आपल्या रेव्हरंड टिळकांनी तर ते दैवी निःश्वसित (की असेच काहीसे) असल्याचे सांगि-तले आहे. ही निःश्वसिते काय हुकमी भाता दाबल्यासारखी थोडीच काढता येणार ? वेळी

अवेळी ' दिक्कालातुनी आरपार ' पाहण्यासाठी एखादे ' रेडीमेड ' भिंगही नाही. जुन्या चालीत गोडगोड शब्द ठोकून पानभर भावगीत कदाचित मागणीप्रमाणे एखादा सराईत कवी तयार करूनही देईल, पण नवा आशय आणि नव्याच प्रतिमा हट्टाने बनविणाऱ्या बंडखोर नवकवीलाही दिवाळीची रीतभात म्हणून चार ठिकाणी पाठवावे लागतेच. प्रतिभा कामापुरती पेटविण्यासाठी त्यालाही पंप आणि पिन्‌चा सायास करावा लागत असेल.

आता जीव भांड्यात पडला. जेथे मातबर लेखक आणि कवीही प्रेमळ सक्ती मानतात, तेथे माझ्यासारख्या माफक मागणी असणाऱ्या लेखकाने फारशी खळखळ करू नये, हेच बरे. सक्तीखातर तरी लिहून होते व त्यात मन गुंतले की तेवढ्यापुरते इतर अधिक उपद्रवकारक विचार किंवा उद्योग चुकतात. ' हेही नसे थोडके. ' नाही तरी संसारातील निम्मेशिम्मे व्यवहार सक्तीनेच म्हणजे कर्तव्य या ढोंगी नावाखाली करतो. ' जगायची पण सक्ती आहे, मरायची पण सक्ती आहे ' असा मर्ढेकरांच्या मरहूम उंदरांचाही दावा नाही का ?

इतके लिहून झालेले वाचल्यावर माझा मित्र ××× म्हणाला, ( त्याचे नाव न देण्याची खबरदारी का बाळगली, हे चाणाक्ष वाचकांच्या लौकरच ध्यानात येईल. )

" बाबा रे, हे तुमचं साहित्य म्हणजेच इथून तिथून सगळी सक्ती. तुम्ही लिहिता सक्तीनं. मग कितीही मोठ्या गमजा सांगा. शाळा-कॉलेजांत आम्ही सक्तीनं पढलो. आताही आम्ही वाचतो, किंवा वाचल्यासारखं दाखवतो, ते सक्तीनं; कारण शेजाऱ्यापाजाऱ्यांत आपल्या सुशिक्षितपणाची अब्रू राखायची असते ना ! आणि, खरं सांगू, आमची बिचारी बायकोही हल्ली वाचते, तेही सक्तीनंच–झोप लागायला हे तुमचं साहित्य फार गुणकारी वाटतं तिला ! म्हणून जेवणानंतर दोन–अडीच पानं ती नियमानं घेते. तेव्हा उगाच बकवा कशाला ?"

तेही खोटे नाही. आपण मन घट्ट करून लिहावे. पण या माझ्या यातनांच्या कुरबुरीनेच शेसव्वाशे ओळींचा ऐवज भरला. नकळत लेखाची लांबी भरून काढली. संपादकाचा त्रस्त समंध या नैवेद्याने शांत व्हावा ! सुटलो.

# रंगभूमीची रहस्यकथा

गेल्या दहा–पंधरा वर्षांतील लेखक, व्याख्याते आणि संपादक यांचा खास ठेवणीतील एक विषय, असा: ‘ मराठी रंगभूमी कोणी मारली ? ’ विषय मोठा लोकप्रिय, आणि त्याचे लोकप्रिय उत्तर असे: चित्रपटाने ! गारुड्याने, प्रथमच सुचला, अशा भाबड्या आविर्भावाने सवाल विचारावा, आणि मदाऱ्याने तो ऐकताच जबाब किंचाळावा, अशा अवसानात प्रत्येक वेळी हा खेळ होत असे. बघ्येही माना डोलावीत आणि टाळ्या पिटीत. त्यातल्या बहुतेकांची खाजगी खुशी हीच, की ज्या चित्रपटांवर आपले इतके मन बसले आहे, त्याचा केवढा पराक्रम ! उपजताच किंवा अगदी तान्ह्या वयात कोणाचे तरी नरडे फोडणाऱ्या एखाद्या अचाट देवासारखे हे कर्तृत्व झाले—दैत्यासारखेही असेल कदाचित; पण पुराणातल्या त्या तामसी गलबल्यात कंकणाच्या अनुनयातील शाब्दिक गोंधळाप्रमाणे इकडची माणसे तिकडे जाण्याचा दाट संभव असतो. मात्र किंकिणीने शेवटी चतुर नूपुराऐवजी त्या केसाळ रासवटालाच कौल दिला, त्याप्रमाणे फाजील सोज्ज्वळ देवाऐवजी माफक प्रमाणात दैत्यगिरी करणाऱ्या देवालाच लोक अधिक पावतात. आख्यानाच्या आरंभी झोपेने डोलणाऱ्या माना, बुवा तापून दुष्टांचे ‘ निर्दालन ’ रंगवू लागले, की हर्षाने डोलू लागतात. हनुमंताचे ब्रह्मचर्य अथवा रामभक्ती या माकडचेष्टा म्हणून त्याकडे काणाडोळा होतो, पण त्याने लंकेत केलेला उडाणटप्पूपणा गाजतो. कार्तिकस्वामी आणि गणपती या मवाळ भावांच्याही लौकिकातील तफावत पाहिल्यावर पांडवांबाबतचा पंक्तिप्रपंच सहज समजतो. मग बलरामाला

घोर अन्याय व्हावा, यात कसले नवल ?

असो. एकूण चित्रपटाने रंगभूमीचा खून केला, या विद्वान वार्तेने लोकांच्या चित्रपट-प्रेमाला भरतीच आली असणार. नाही तरी रंगभूमी या गंभीर शब्दाइतकीच ती खुद्द चीज परकी वाटत होती; म्हणजे जी नाटके होत, त्यांतील पद्याचा अर्थ नटालाही कळत नसे. आणि गद्य, त्याला क्वचित कळले, तरी बहुतेक श्रोत्यांना कळत नसे. पौराणिक नाटकांत राजकीय अन्योक्ती आली, ऐतिहासिक नाटकांत देशभक्ती आली आणि सामाजिक नाटकांत समस्या आली. नाटकासारखे नाटक होईना. असा पाच–सात रांगांपर्यंत जेथे रंगभूमीचा संकोच झाला, तिथे तिचे सोयरसुतक कसले ? बुद्धी खायला काळ झाली होती; तिची इतिश्री करणारा मर्द जवळचा वाटावा, हे साहजिकच. म्हणून चित्रपटावर पाचामुखी आळ आला, तेव्हा कन्हैय्याप्रमाणे त्याचे अधिकच कौतुक झाले, आणि त्याच्या कीर्तीने बाळसे धरले. चित्रपटाचा पवित्र गुन्हा पचला, अंगी लागला आणि अधिकाधिक लोक त्याच्या अंधारात शिरले ! !

पण आळ फार येऊ लागला, म्हणजे त्याचाच संशय येतो; तसे येथेही झाले. जाणत्यांना उमगले, की चित्रपटाच्या अंगी आपण नसता वकूब चिकटवीत आहोत. मग अशा काही चाणाक्ष मंडळींनी पुन्हा गुन्हेगाराचा तपास सुरू केला. गुप्त पोलिसी ढंगात ज्याने त्याने निरनिराळ्या आरोळ्या मारल्या. रहस्यकथांतील शेवटच्या प्रकरणाचा सूर धरून कोणी म्हटले, ‘ रंगभूमी मारली, ती नटांनी; ’ कोणी म्हटले, प्रेक्षकांनी; कोणी संगीताची मुंडी धरली; कोणी नाटककारांची. नाटकगृहांच्या मालकांनीच तिला गारद केले, असाही कोणी तरी आवाज काढला. आणखी कोणांवर आरोप झाले असतील, ते सांगता येत नाही; पण ‘ डोअर–कीपर ’चा एका साहित्यिकाला वहीम आला. ही जरा अतिशयोक्तीच असावी ! ( की त्या सखोल साहित्यिकाच्या अन्तर्मनात बिचाऱ्या गडकऱ्यांचे पूर्वायुष्य होते ? )

अशा रीतीने रंगभूमीचा मारेकरी कोण, याविषयी मतभेद माजले, तरी रंगभूमी मेली, याविषयी पूर्ण एकमत होते. तिचे कलेवर आपण पाहिल्याचे जो तो शपथेवर सांगत होता. तर कोणी आपण तिला खांदा दिल्याची फुशारकी मारीत होता. तिच्या मृत्युलेखांचा गहिवर अजून वाळला नव्हता; स्मारकाच्या वर्गण्या काही उत्साही खिशात खुळखुळत होत्या. म्हणजे या रहस्यशोधनातील पहिला दुवा बळकट होता. तो असा, की रंगभूमी कैलासवासी झाली. तेथून उरलेले दुवे जुळवीत शेवटी तिची कैलासाप्रत रवानगी करणाराला अडकवायचे, हेच उद्दिष्ट. वर सांगितल्याप्रमाणे अनेकांनी अक्कलहुशारीने अशा तर्कांच्या साखळ्या बांधल्या.

या जुळणीची बौद्धिक कसरत मोठी आकर्षक असते; म्हणून रहस्यकथांची एवढी लोकप्रियता ! जितका जुळारी अधिक चलाख, तितका अधिक अनपेक्षित शेवट. सर्वांत सोज्वळ माणूस गुन्हेगार ठरायचा; आणि ज्याच्या हाती पहिल्या प्रकरणापासून सुरा असतो, त्या तांबरलेल्या डोळ्यांच्या धटिंगणाला फक्त सुऱ्याने नखे कातरण्याचा निरुपद्रवी शौक असतो,

असे सिद्ध व्हायचे. एकूण कोणाची खात्री देता येत नाही. सावाला पहिल्याने हटकावे, असे या रहस्यशास्त्र्यांचे कोडे उकलण्याचे तंत्र. तेही कधी मर्यादेबाहेर जाते. काही वर्षांपूर्वी एका अमेरिकन डिटेक्टिव्ह–चित्रपटाचा ‘ ट्रेलर ’ पाहिल्याचे आठवते. कोणाचा तरी खून झालेला असतो. एकामागून एक पाच–सहा वहिमी दाखवले; प्रत्येकाने ठाम इन्कार केला. शेवटी एक माणूस दिसला; तो गालिचावर पडलेला होता. क्षणभर डोके वर उचलून त्याने म्हटले,

“ कोणी मी ? मूर्ख आहात झाले. अहो, मीच तर मुडदा ! ”

अशाच एखाद्या रहस्यकथेत शेवटच्या प्रकरणात खुनी हाती लागण्याऐवजी ‘ मुडदा’च दत्त म्हणून पुढे उभा राहतो. अगदी अक्षरशः; कारण तो मुडदा नसतो व सर्व खटाटोप व्यर्थ ठरतो ! जणू आपल्या हुशारीला वाव मिळावा, म्हणून खून गृहीत धरण्याची त्या उपद्व्याप्यांना घाई झालेली असते. बर्नार्ड शॉच्या एका नाटकातील शस्त्रवैद्य ॲपेंडिक्स कापण्यात मोठा कसबी होता. ( हा विलायती दृष्टांत केवळ सवयीने आला असावा. असले कसबी आपल्याकडे नाहीत का ? ) त्याच्या हाती कसलाही रोगी सापडला, तरी तो त्याची हिरीरीने चिरफाड करावयाचा. त्यापैकीच हा प्रकार. गुंतागुंत सोडवायचे व्यसन जडले, म्हणजे नसेल तेथे गुंता करावयाची खोड येते.

माझा दावा असा आहे, की रंगभूमी मेलेली नाही; ती परागंदा झाली आहे, किंवा तोंड चुकवून असते; किंवा चालू भाषेत सांगायचे, म्हणजे ‘ भूमिगत ’ आहे. रंगभूमी मरणे कठीण; इतकी ती चिवट असते. इंग्रजी वाक्प्रचारातील मांजरीप्रमाणे तिला नऊ आयुष्यांचे वरदान आहे. जिवावर बेतले, तर ती मेल्याचे नाटक करील, इतकेच. देशोदेशीच्या रंगभूमीचा इतिहास असाच चेंगट आहे. अडाणी सत्ताधाऱ्यांनी आणि ढोंगी नीतीबाजांनी तिचा निःपात करण्याचे नेहमी प्रयत्न केले. पण ती पुरून उरली. कोणी तिला बटीक केले; तेही सोंग तिने काळ उलटेपर्यंत हिकमतीने पार पाडले. असे तिचे बळकट चरित्र. हे बळ तिला लाभले लोकवृत्तीतून; कारण नाटक करणे, आणि ते पाहणे, आणि पाहत असताना ते मनात करणे ही लालसा लोकरक्तात असते. ती दाबून दबत नाही. जेथे समाज म्हणून माणसामाणसांत संबंध जडले, तेथे त्या संबंधांची जिवंत चिकित्सा रंगभूमीइतकी अन्य कोठे होऊ शकत नाही. माणूस अगदीच माणूसघाणा झाला, तर ही लालसा आवरेल; पण संन्याशाला देखील संसार सुटलेला नाही !

मराठी रंगभूमीने एके काळी मोठे वैभव भोगले. त्याच्या अतृप्त आठवणी आपण अजून घोळवीत असतो. पण पुढेपुढे तिने आवाक्याबाहेर पसारा वाढवला आणि ऋण काढून सण केले. तिचा मखमली थाटमाट आणि रोशणाई आणि मैफली यांनी दिपून गेलेल्यांना नाट्याचा तिचा ऐन ऐवज संपत आल्याचे दिसले नाही. तिचा बडा सावकार म्हणजे संगीत. त्याची बेसुमार उसनवारी तिच्या गळ्याशी आली आणि ती देशोधडीला लागली. तिला हे दैन्य आले खरे; पण तिचे उसने, नकली आणि भडक वैभव गळून पडले, याबद्दल

उसासे टाकावयास नकोत. ते कधीच तिला मानवले नसते. ती परत उजळ माथ्याने येईल, तेव्हा आपला साज घेऊन येईल, आणि जुन्या अनुभवाच्या शहाणपणाने आपले नाट्याचे सत्त्व शाबूत राखील. ती आपल्या करणीने कोसळली. चित्रपटाचे नवे वारे तेव्हाच सुटले, म्हणून त्याच्यावर उगाच नाव आले. पण ती काही काळ पांगळी झाल्यासारखी वाटली, तरी तिचा अवतार आटपला नाही. ती नव्या चैतन्याची वाट पाहत होती— व आहे.

किंबहुना आपल्या चित्रपटांची हालचाल बारीक नजरेने न्याहाळली, तर असे म्हणावेसे वाटते, की ( मारण्याची भाषा वापरावयाचीच, तर ) रंगभूमीने चित्रपटाला मारले; निदान, सिंदबादच्या एका सफरीतील थेरड्याप्रमाणे ती त्याच्या मानगुटीला बसली ! हा असा उफराटा प्रकार झाला. जणू गनिमी काव्याचा. रंगभूमीने आपण मेल्याची अफवा उठवून दिली आणि आपला संहारक म्हणून खोट्या बढाईने मिरवणाऱ्या व वरवरच्या यशाची सूज आलेल्या चित्रपटावरच डाव उलटविला. थोडे अपवाद सोडून दिले, तर आपले चित्रपट अजून नाटकीच आहेत; म्हणजे चांगल्या अर्थाने नव्हेत, तर परिस्थितीमुळे नाटकात ज्या कृत्रिम वा खोट्या गोष्टी येत, त्या निर्बुद्धपणे उचलल्यामुळे. आपली कला स्वतंत्र आहे, तिचे वळण वेगळे आहे, याची जाणीव चित्रपटांनी क्वचितच दाखविली. तेवढा स्वाभिमानच नाही. नाटकाची सलग छायाचित्रे काढली, की चित्रपट झाला, इतकीच बहुतेकांची कल्पना. वाईट नाटकाचे सगळे गुण कसोशीने उचलले : कथा त्याच घाटाची; पात्रे तशीच भडक रंगांतील— अगदी वेषभूषेसह; संवाद काव्यमय, म्हणजे खोटे; तसेच ते बोलण्याची पद्धत रेडिओतील मराठी नाटकाप्रमाणे. पुढ्यात नाजूक मायक्रोफोन नसून, दूरवर पिटामध्ये बहिरे श्रोते आहेत, अशा आविर्भावात आवाजाचे खेळ होतात. कै. रंगभूमीचा वारसा आपल्याकडे आला आहे, असा आव. यातच सगळा उपरोध आहे. पण त्याहूनही जालीम उपरोध संगीताबाबत. ज्या संगीताने, म्हणजे अकारण आणि अनिर्बंध संगीताने, आपली दुर्दशा केली, त्याची ब्याद चित्रपटामागे लावण्यात रंगभूमीची केवढी चलाखी ! ती स्वतः संगीताच्या जाचातून मोकळी होते आहे; पण आज चित्रपट त्यातील गीतांनी ओळखला जातो. त्याच्या मुद्रिकांचा खप ही यशाची निशाणी होते, आणि 'प्ले-बॅक आर्टिस्ट' कोण, याची जाहिरात सर्वांत ठळकपणे करावी लागते ! संगीताचा सावकारी पाश आणखी एका कलेच्या गळ्याभोवती पडला व तिच्या पहिल्या अमदानीतील काही शिकाऊ कृतीतही ज्या अंधूक आशा वाटत होत्या, त्या मावळल्या. असे रंगभूमीने चित्रपटाला पछाडले आणि त्यावर सूड उगवला— तो आपला निःपात केल्याचा बकवा करण्याबद्दल !

हा बकवा व्यर्थ आहे. तो रंगभूमीला वसरगुंडीला लावणाऱ्यांनी आपली जबाबदारी झटकण्यासाठी केला. तिची ऐसपैस सदावर्ते बंद झाली, म्हणून जळफळणाऱ्या खुशालचेंडूंचे ते बोटे मोडणे आहे. नाटक–सिनेमाच्या प्रकृतींत एवढी भिन्नता आहे, की त्यांची झुंज जमणेच शक्य नाही. नाटकात आपण संसार पाहायला जातो. सिनेमात तो सहसा

विसरायला जातो. कोणी तेथे गर्दीसाठी जातो, कोणी अंधूक एकांतासाठी. कोणी हालत्या-बोलत्या चित्रांचा कैफ सुन्न मनावर सहज चढतो, म्हणून; कोणी केवळ बालभावाने. असल्या प्रकृतीच्या आपल्या चित्रपटांची आणि रंगभूमीची झुंज कशी लागणार ? करमणुकीचे प्रकार म्हणून लागावी म्हटले, तर सर्कसने रंगभूमी मारली, असे का म्हणू नये ?... उद्या कोणी विदूषक तसेही म्हणेल ! !

# दुय्यम कवी

दोष त्याच्या जन्मवेळेचा. साल हुकले. चार वर्षे अगोदर जन्माला आला असता (... पण दुसऱ्यांनी जन्माला घालावे लागते!... ), तर सगळे यथासांग झाले असते. त्याच्या कवितेचे पुरे चीज होऊन साहित्यिक कीर्तीचे वरिष्ठ मानपान पदरात पडले असते. जी पाच-सात शुभ नामे, संध्येतील पहिल्या थोड्या नावांप्रमाणे, साहित्याचे थातुरमातुर सांस्कृतिक आन्हिक म्हणून उरकणाऱ्यांच्या तोंडी मठ्ठ सवयीने येतात, त्यांत तो बसायला हरकत नव्हती. ते केशव–नारायण–गोविंद–माधव गुणदोषांच्या वेरीजवजा वाकीत त्याच्याहून चढ भरले असतेच, असे नाही; कोण जाणे, बारीक ताजव्यात दोन गुंजा उणेच ठरले असते— निदान त्यांतील एखादादुसरा तरी. पण तसा बारीकपणा कलेच्या सार्वजनिक आणि नियतकालिक धकाधकीत खपत नाही. एकंदरीत गैरसोयीचा, आणि थोडासा धोक्याचाही.

— नाही, हा त्या केशव–नारायण–गोविंद–माधवांचाही डाव नाही. (ही नावे बरी सापडली उपमेच्या ओघात!) त्यांचे ते केवळ भाग्य. त्यामुळे ज्यांची पोटदुखी उपटली, ते मग उठल्यासुटल्या कण्होत, की ही कंपूशाही आहे, गटबाजी आहे वगैरे वगैरे— पण ते खरे नव्हे. ते निव्वळ भाग्य; आणि भाग्य काही बैठक मारून, 'कृती' बरहुकूम घडविता येत नाही. ते घडावे लागते. या केशव–नारायणादींचे असेच झाले. कधी काव्याचा दुष्काळ पडतो— अथवा भासतो. जुनी तीर्थे ओसरतात, शेवाळतात; त्यांना वास मारू लागतो.

मग एखादा पायाळू म्हणून बोलबाला झालेला टीकाकार– बुवा लेखणी सरसावतो; ओल्या वासावर खणतो. नशिबाने झरा लागला, तर पहिल्या पोहऱ्याचे केवढे माहात्म्य! मागच्या पोहऱ्यांची तेवढी तमा नाही— आणि ते अधिक नितळ असेनात! नवे चैतन्य हुडकल्याच्या— आणि ते आपल्या मठाच्या बुवाने हुडकले, या होशात कित्येकदा गढूळपणाला चव चढते, आणि मातकटपणात सगळ्या रंगाचा अर्क दिसतो! मठ बलिष्ठ हवा, की बुडकुल्या भरभरून ते गंगाजळ गावोगाव जाते; आणि ते डोळ्यांना लावून—अथवा लावल्यासारखे करून— स्थानिक पंडये क्रियेला बसतात... तो वेळपर्यंत झऱ्यांचा सुकाळ होऊन सगळीकडे हिरवेचार झाले असले, तरी त्या गंगाजलाचे पावित्र्य शिळवटत नाही. आपले केशव–नारायण वगैरे अशाच एका पहिल्या पोहऱ्यात आले. आणि त्यांचे सोने झाले. कोणी मुद्दाम बाजारासाठी गिलावा चढवला, असे नव्हे. यदृच्छेने एकत्र आले. म्हणून नावांची सांगड. दुवे स्मरणात घट्ट बसले. कवींचा ' सट ' जमला. सुट्या नगांची वेगवेगळी पारख करण्याचा खटाटोप वाचला. ज्यांना रसग्रहण टीका वगैरे तयार घेणे सोयीचे पडते, त्यांना छान झाले. कसे सुटसुटीत, आटोपशीर आणि टापटिपीचे!

रूपकांची थोडी गल्लत झाली खरी; पण मिश्र-रूपक या भारदस्त नावाने ती सावरेल. आणि रूपकाची फार विचक्षणाही करू नये! आपला ' तो ' कवी— ' प्रस्तुत चरित्रनायक ' — अपेशी का ठरला, याची ही कहाणी आहे. अपेशी हा शब्दही तुलनेनेच घ्यायचा. तसे त्याला यश मिळालेही, पण ते तोकडे— आणि मुख्य म्हणजे, जेथे मिळावे, तेथे मिळाले नाही. इतकेच काय, पण जेथे मिळाले, तेथेही कदाचित नको त्या कारणासाठी— गुणांपेक्षा दोषांसाठी, निदान मोठ्या गुणांऐवजी मामुली गुणांसाठी–मिळाले असेल. याचे दुःख त्याला फार, कारण तो सच्चा कवी आहे. गेल्या दिवाळीची हकीकत आहे. फक्त जाहिरातींचा ' खास अंक ' प्रसिद्ध करता येत नाही, म्हणून आधारासाठी साहित्य घेणाऱ्या एका पत्राने त्याची कविता निळ्या शाईत आणि लाल मखरात छापली. सोबतच्या संपादकीय शिफारशीत ' अथांग नादमाधुर्य, असाधारण रचनासौष्ठव आणि अपार भावनाशीलता 'याबद्दल कवीला बटबटीत शाबासकी होती. त्या पत्राला आणि त्याच्या संपादकखात्याला काव्याचे सोयरसुतक नव्हते; समजही नव्हती; फक्त त्यावर मते होती— ती मात्र ठणठणीत आणि चढेल आणि हेकट. त्याची झळ लागे, ती अर्थात काही यश मिळालेल्या कवींना. ते सोडून अन्य कोणाही कवीवर ते पत्र कसल्याही जाहिरातवजा विशेषणांची खैरात सढळपणे करी. त्या पत्रावर ज्यांची रुची पोसली होती, त्या बापड्या वाचकांना ती विशेषणे वाचून हा कवी फार श्रेष्ठ असावा, हे पटले. तशी ती कविता त्यांनी नीट वाचलीच नाही! त्या पत्राचा खप ( पत्रगुणांशिवाय अन्य कारणांमुळे ) मोठा; म्हणून त्याच्याकडे बोटे दाखविणारे फार निघाले. पण त्याला तोंड चुकवावेसे वाटे!

याचा अर्थ असा नव्हे, की काव्याची जाणकार म्हणून ज्या मासिकांचा गवगवा झाला होता, त्यांत त्याला कधी स्थान मिळाले नाही. वारंवार मिळे; कधी कधी ठळकही. पण...

ते खरे नव्हे ! खाशाच्या पंक्तीला खालचा पाट मिळाल्याची किंवा खासे नाहीत, म्हणून वर सरकल्याची कळा असे या प्रकाराला. अगदी सूक्ष्म कळा. भाबड्या नजरेतून सहज सुटावी, अशी. संपादकाच्या आर्जवात आणि आदरातिथ्यात तीळ उणा नाही... पण ते नव्हेच ! त्याला ते अचूक उमगे— आणि लागे ! तो हळवाबिळवा नाही; पण त्याची संवेदना नाजूक आहे... छे, छे ! पुन्हा ते ढोबळ शब्द आले... अनेक बोथट टीकाकारांनी अनेक कवींना ते शब्द आजवर लावले— आमच्या या कवीच्याही वाट्याला ते कित्येकदा आले !... पण खरोखरच पुसट, जाणिवेत सहसा न ठरणारा, उडत्या वासासारखा अनुभव टिपून घेण्याची शक्ती त्याच्यात आहे.

—हेच त्याचे दुर्दैव. त्याच्या चाहत्यांच्या पातळीवर, किंवा तिच्या जवळपास, तो असता, तर तो कृतकृत्य झाला असता. तशी तुष्टी भोगणारे किती तरी कवी आणि लेखक आहेतच ! पण तो ज्या पातळीवर आहे, तेथे तो अजून परका आहे. त्याला घर नाही ! तसाच तेथील विपरीतपणा आहे. तशी ती पातळी वरची. फार वरची, पण ती अलग नाही. तिला इतरांचे तिरकस छेद गेले आहेत; इतर व्यवहाराची बाधा झाली आहे. कवीने लेखनासाठी, अगदी आत्मसुखासाठी, लेखन केले, तरी प्रसिद्धी, वाचन, इत्यादी आवश्यक संस्कारांमुळे नात्यागोत्यांचा लबेदा निर्माण होतो, देणीघेणी वाढतात. प्रसिद्धी म्हणजे सांगूनसवरून धंद्याचे कूळ... पण वाचनाच्या काय कमी परी आहेत ? आणि त्यांतल्या सगळ्याच कोठे साफ आहेत ? खरे वाचन आहे, वरवरचे आहे, मानीव आहे. असल्याच वाचनातून टीकेचे फाटे फुटतात. असा हा गुंता आहे लेखनाभोवती. हा शेवटी पातळ्यांचा गुंता आहे.

तो सोडविणे महाकठीण. त्याचे कायदे आपल्या नखाग्रांत आहेत, अशी कोणी विद्वानाने बढाई मारली—तरी ती बढाईच ! हे केशव–नारायणादी अर्धा डझन कवी आणि आपला कवी यांबाबतच पाहा. त्यांचे भाग्य आणि याचे दुर्भाग्य यांची संगती कशी लावणार ? गुणाला गुण असा रोकडा हिशेब केला, तर त्यांच्यापैकी निदान नारायण याच्याहून कमी भरेल. विशेष म्हणजे हे नारायणही मानतो ! खरे म्हणजे ते सगळे याला मानतात. त्यांतील जे स्वतःशी प्रामाणिक आहेत, किंवा जेव्हा ते प्रामाणिक असतात, तेव्हा त्याच्यासारखी कविता आपल्या हातून लिहिली जावी, अशी चोरटी आकांक्षा बाळगतात. तशाच एखाद्या अतिप्रामाणिक क्षणी एकमेकांपाशी तिची कबुलीही देतात. पण ती कुजबूज बाहेर फुटत नाही. वाटतो, तसा त्यांचा दोष नाही यात. आपल्या बरोबरीने तो आला, तर त्यांना हवा आहे. पण हा बरोबरीचा निर्णय घेणे त्यांच्या हाती नाही. तो ज्यांच्या हाती, त्या क्रमवारीच्या चालकांना केशव–नारायणांच्या वर्गात भरती नको, तो बंदिस्त हवा.

तो खरा त्यांच्या वर्गातला—कवी म्हणून. कोणाला वाटेल, त्या इतरांनी क्रांतीबिंती केली असणार, आणि तो जुनाट म्हणून मागे पडला असावा. तसे नाही. त्याच्या काव्याचा बाज नवाच आहे—अगदी ताजा. की तो त्यांच्यामागून आला आणि त्यांच्यासारखीच कविता

लिहू लागला, म्हणून नकलेचा आळ आला ? तसेही नाही. ज्याला काव्य समजते, त्याला आपल्या या कवीची ओळन् ओळ स्वतंत्र आहे, इतर कुणाहूनही वेगळी आहे, हे पटेल. ज्याला काव्य समजत नाही, त्याला अर्थात काहीही पटेल--अथवा पटणार नाही ! ज्या खळबळीतून त्यांची कविता वर आली, तिच्यातूनच याचीही आली, त्याच्या प्रकृतीने तिला आपला थाट आणि ढंग दिला. असा निराळेपणा त्या केशव–नारायणादिकांच्याही कवितेत होता. प्रत्येकाच्या उमाळ्याचे रसायन आणि तापमान वेगळे होते. तसेच त्याच्याही. पण भरती आल्यावर ही लाट पहिली आणि दुसरी, ही मोठी आणि ती छोटी, असली कोरडी क्रमवारी आणि प्रतवारी लावण्याचा बैठा खेळ सुरू होतो. असल्या कारकुनी कसोशीमुळेच काहीजण टीकाकार बनून जातात. मग त्यांतला एखादा अव्वल कारकून उठतो, आणि गंभीरपणे रेघ मारून समस्तांस जाहीर करतो, की अलिकडचे सच्चे, पलिकडचे कच्चे. छापण्यात ती रेघ पक्की होते, आणि लोकही सुस्कारा सोडतात. भरतीची मौज थोडक्यात साजरी. फार झाली, की ताण पडतो—आणि वेळाचीही खराबी होते. काव्य–साहित्य–कला वगैरे गोष्टी हव्यातच (सुसंस्कृत) माणसाला, पण त्या जेथल्या तेथे असाव्यात.

म्हणून जेव्हा काव्यात नवे जीवन वगैरे आल्याचे वाचकांनी ऐकले, तेव्हा त्यांच्या अंगावर काटा उभा राहिला—आणि खूप खूप बरे वाटले. गंमत झाली. ‘ हे कोण संप्रति नवे पुरुषावतार ?’ अशी कुतूहलाने आणि कौतुकाने पृच्छा झाली. तस्मात कोणी तरी वाणीला अधिकाराचे वजन देत नामावळी आरंभली. केशव, नारायण, गोविंद, माधव... “ अलम् ! इतकीच पुरेत... स्मरणात बसली पाहिजेत–” असे आवाज उठले. काव्याप्रमाणे काव्याचे रसग्रहणही स्मरणाची सोय पाहून व्हावे. आणि अवतार फार झाले, की बखेडे फार माजतात, गोंधळ होतो. काव्याचा उगम कशातही असो, त्याची परिणती शांतीत व्हावी, पुष्टीतुष्टीत व्हावी !

असे ते केशवनारायणादी पाच-सातजण भाग्यरेषेच्या अलीकडे सापडल्यामुळे, जांभई येण्यापूर्वी कानांवर पडल्यामुळे, मानकरी ठरले. यात त्या बिचाऱ्यांची काही कारवाई नव्हती. केवळ पंचांगाचा अपघात. मग सगळे सोहाळे सुरू झाले. टीकाकार उद्योगाला लागले. त्या मानकऱ्यांच्या मोठेपणाचे गणित मांडले. शिक्के बसले. थोर विशेषणांच्या चिठ्ठ्या डकवल्या. तुलनेची सखोल कोष्टके तयार झाली. हा घोळ त्या भाग्यवंतांपुरता होता. त्या बाहेरचे एखादे नाव आले, तरी ते अडखळत, अवघडत. काव्याचा जेथे सार्वजनिक व्यवहार, तेथे तेच. मासिकांतून, पुस्तकांतून, संमेलनांतून हे मानकरी ठळक अक्षरांतून मिरवायचे, उरलेले अंगचोरपणे–‘आणखी इतर’चा ओशाळा वर्ग. काव्यगायनाच्या मैफलीत श्रोत्यांचा भाविकपणा त्या थोड्यांच्या वाट्याला. ते व्यासपीठावर आले, म्हणजे मोठी माणसे शाळेतल्या मुलींसारखे चेहरे करून बसतात. ‘ इतरां’च्या वेळी मात्र मुलींच्याही चेहऱ्यावर मिस्किलपणा दिसतो, आणि मोठे सोशीक मुद्रा दाखवितात. फारच सज्जन असले, तर कर्तव्यबुद्धीने उत्तेजन देण्यासाठी माफक मान डोलावतात.

यात उपेक्षा, अनुल्लेखाने मारणे, साहित्यिक राजकारण, असले काहीही नाही. ते आहे, म्हणून काही असंतुष्ट जीव म्हणोत, कोणी तशा वादाची काडी लावून बघोत. एकादोघांनी तर जात-पोटजातींची कलागती चिकित्साही करून पाहिली. आपल्या या कवीला असल्या दाव्यांचा संपर्क लागलेला नाही; निदान अजून नाही. त्याच्यासारख्या इतर काहींना लागल्याचे मला माहीत आहे. त्यांपैकी काहींनी आपल्या काव्याची हट्टाने दिशा बदलली आणि नव्या दिशेने मिळण्यासारखे होते, ते पदरात पाडून घेतले. काहींनी काव्य सोडले आणि साहित्याचे राजकारण वरले. आपल्या कवीने उद्या तसे काही केले, तर ते समजू शकेल...पण तो करणारही नाही, असा विश्वास वाटतो. आपण सर्वस्व काव्यात घालतो, श्रेष्ठ गुणांची कविता लिहितो, तरी साहित्यसृष्टीच्या लहरी जातवारीत आपण दुय्यम दर्जातच कुचंबणार, हे त्याला कळते. ते बोचते. विफलता वाटते, असे म्हणावयाला बरे दिसले असते, पण ती भावना तेवढी तीव्र नाही. कडवटपणा नाहीच नाही. विफलतेची भीती मात्र वाटते––ती अशा अर्थाने, की या असमाधानाची पुटे अशीच चढत राहिली, तर आपल्यातील काव्यच त्याखाली कासावीस होईल, हरवून जाईल. कवित्व असून कविता थांबण्याची, झरा आतल्या आत थिजण्याची, मुकेपणाची, व्यर्थपणाची ही भीती अति वाईट. कलावंताचे मरण ते. तिची सावली पडू नये, म्हणून हा कवी जपत असतो. दुय्यमपणाची क्षिती नाही, कविता जगली पाहिजे.

...अशी त्याची कहाणी आहे. तिच्यात कोणाविरुद्ध तक्रार गुदरायची नाही, की निषेध करायचा नाही. हे असे होते खरे––पातळ्या मिसळतात, म्हणून !

# प्रथमदर्शनी

आपल्याकडे शब्दांचे काही लोकप्रिय टसे आहेत. त्यांत जन्माची गाठ बांधल्यासारखे काही शब्द एकत्र असतात. विद्वत्ता ' सखोल ' असते, अमुकाव्या वर्षात ' पदार्पण ' करतात, स्वप्न ' साकार ' होते, ' दुःखद ' म्हटले, म्हणजे ' रिकाम्या जागी ' भरायचा योग्य शब्द ' निधन.' त्याचप्रमाणे ' प्रथमदर्शनी ' नंतर प्रेमच बसायचे. त्याला इलाज नाही. इंग्रजी वाक्यप्रचारच मुळी तसा आहे. आणि इंग्रजीच्या मराठीवरील प्रभावामुळे जे नेहमी दुःखी असतात, अशांच्याही लेखणीच्या आणि जिभेच्या टोकावर ' प्रथमदर्शनी ' ला प्रेमच चिकटलेले आढळेल.

परिणामी, कित्येक अकाल-सद्गुणी मुले जशी कर्तव्यबुद्धीने भिंतीवरची आणि पाठ्य-पुस्तकांतील आणि व्याख्यानांमधील बोधवचने आचरणात उतरवण्याचा मनोभावे प्रयत्न करतात, त्याचप्रमाणे आणि त्याहून कितीतरी अधिकजण पुढच्या वयात प्रथमदर्शनी प्रेमात पडण्यासाठी इमानेइतबारे जीव टाकतात. आणि इतक्या हट्टाग्रहाने ते केल्यामुळे पडतातही ! अगदी खरे सांगायचे, म्हणजे असे प्रथमदर्शनी बसलेले प्रेम दुसऱ्या, किंवा फारतर तिसऱ्या दर्शनाने उठावे, कित्येकदा उठतेही. पण बहुधा त्या पहिल्या धक्क्यानेच डोळे तिरळे होतात, आणि मग असते, तसे दिसत नाही, आणि नसते, तसे दिसते ! मग कसचे उठते ते ? फतकल मारूनच बसणार. पुढे कधी बुब्बुळे सरळ झाली, की जशाचे तसे दिसू लागते. पण तेव्हा वेळ टळून गेलेली असते !

त्यावरून आठवले. खांडेकरांचा पस्तीस-एक वर्षांपूर्वीचा एक कथासंग्रह आहे. त्याचे नाव 'दुसरे प्रेम.' त्यांतील एकूण एक कथेचे तात्पर्य हे, की पहिले प्रेम हे तकलुपी असते, दुसरे मात्र खरे. तिसऱ्यापर्यंत त्यांतील एकही कथा पोचत नसल्यामुळे त्याविषयी काही सिद्ध केलेले नाही. असो.

हे सगळे माणसांबद्दल, म्हणजे माणसाच्या माणसावरील प्रेमाबद्दल—म्हणजे अर्थात विरुद्धलिंगी माणसावरील! पण त्याच्या गावावरील प्रेमाचे काय? त्याबाबत असा एखादा आडाखा नसावा. पण मला आपले वाटते, की गावाबाबतही, स्थळाबाबतही, पहिले दर्शन काही खरे नव्हे. वाटते, ते अनुभवावरून, कोणाच्या अवतरणावरून नव्हे. वेरूळची लेणी प्रथम पाहिली, किंवा पॅरिससारखे शहर, की नावीन्याच्या चकाकीने आणि काहीशी त्याच्या ऐकल्यावाचलेल्या लौकिकाने नजर भिरभिरते, स्थिर होत नाही. ते ओसरले, की लहान-सहान गोष्टी उमगतात आणि एकत्रित रूप डोळ्यांत भरते. नेहमीचे छायाचित्र पाहत नसून अस्सल ऐवज पाहत आहो, हे पटते. खरे म्हणजे, आपण पाहतो. नुसतेच दिसत नाही!

आतापर्यंतचे हे प्रास्ताविक—किंवा विषयांतर म्हणा: विषयात शिरण्यापूर्वीचे विषयांतर! नंतर करण्यापेक्षा अगोदरच करून टाकलेले बरे! विषय कलकत्ता—म्हणजे माझे कलकत्ता-दर्शन. अलीकडेच घडले ते. म्हटले, तर पहिले; म्हटले, तर दुसरे. अगदी शपथ घेऊन बोलायचे झाले, तरच दुसरे. त्याचे असे झाले, वीस वर्षांपूर्वी एक दिवस कलकत्त्यात काढला, सकाळपासून संध्याकाळपर्यंत, दुपारपर्यंतच. भर हिवाळ्यातला आखडलेला, धूसर, कुंद दिवस. प्रवासात असताना, काहीसा अकस्मात तेथे गेलेला—एकटाच. रात्री ताप येऊन गेलेला— तोही जणू परत येण्याच्या बोलीवर, असा डोक्यात, अंगात मंद ठणका ठेवून. चार-आठ आण्यांचा एक छापील वाटाड्या हावडा स्टेशनात विकत घेतला, आणि त्यातील गिचमीड नकाशाला पुसत पुसत पायीपायीच थोडा फिरलो. ट्रॅमबसला लटकणारी माणसे पाहून धडकी भरली, माणसाच्या बरगड्यांनी ओढल्या जाणाऱ्या रिक्षात बसण्याइतके नैतिक धैर्य नव्हते, आणि परगावच्या टॅक्सीवाल्याला मी अजूनही शक्य तो टाळतोच, घाबरतो म्हटलेत, तरी फारशी अतिशयोक्ती होणार नाही! तेव्हा इकडेतिकडे केले, कोठेतरी जेवलो—तोंडाची चव गेली असल्यामुळे ते जेवण आणखीनच वाईट लागले! आणि लौकरच स्टेशनवर परतलो! काही न पाहताच. अपवाद एकच आणि तो म्हणजे काहीसा अक्राळविक्राळ, आणि काहीसा खुळा वाटणारा 'हावडा ब्रिज.'

तेव्हा चार महिन्यांपूर्वी कलकत्ता पाहिले, ते प्रथमच पाहिल्यासारखे. पहिले दर्शन झाले, ते विमानातून. मला वाटते, एखाद्या शहराला आपण आगगाडीतून पोचतो, की बस अथवा मोटारीतून रस्त्याने, की वरून विमानाने, यावर त्याच्याविषयीचे आपले ग्रह बनत असावेत. हो, आणि मुंबई अथवा पणजीसारख्या शहराजवळ बोटीने संथपणे सरकत जाणे हे निराळेच. असले समुद्रातून घडलेले दूरदर्शन सुखदायक असते. दूरचे, म्हणून साजरे

असेल कदाचित, कदाचित नुसती रूपरेषा, वळणे आणि चढउतार, थोड्याशा अंतरावरून विशेष, आहेत, त्याहूनही सुभग वाटत असावेत. विमानाचे निराळेच. त्याला जणू शहरच नाट्यमय वाटावे, असे एकाएकी सामोरे येते. वर येते. आपले टळक अलंकार नाचवीत. भेलकांडे खाणाऱ्या घायकुत्या विमानातून बाकी काही फारसे डोळ्यांत भरत नाही. अनोळखी शहराचे सोडा, या मुंबईत सगळी हयात गेली, तिचे असे चढताउतरताना किती वेळा दर्शन घडले, याचा हिशेब नाही; पण अजूनही हा भाग कोणता आणि तो कोणता, याबाबत डोक्यात गोंधळ उडतो. पण एकंदरीने सगळे छान वाटते. झोपडपट्ट्या देखील नीटस दिसतात, गोजिरवाण्यादेखील. घारीची नजर का म्हणतात, कोणास ठाऊक ? पण तिचे आपल्या गावाशहरांबद्दलचे मत चांगले असावे. आणि एका काळी देव वगैरे अवतरत, चित्रपटात अजूनही अवतरतात, त्यांचेही मत चांगले असावे. मग ते दुष्टांच्या निर्दालनाच्या निमित्ताने उतरोत, की आणखी काही उद्योगासाठी.

हे सगळे दिवसाच्या डोळेभेटीसंबंधी. रात्रीचे निराळेच. तेव्हा फारच आणि उगाच साजरे दिसत असते सगळे; आणि फसवे. तो मुख्यतः दिव्यांचा पराक्रम आणि काहीसा अंधाराचा !

मी त्या दिवशी कलकत्त्यात उतरलो, ते भर दिवसा. उतरू लागताना, उतरत असताना, पहिली सलामी केली, ती गंगामाईने. तिला तेथे हुगळी म्हणतात, ते सोडा. गंगा इथे आडव्या अंगाची वाटली आणि फार वर्षांपूर्वी हृषीकेशला पाहिलेली तिची कोमल, नितळ, अल्लड, काया क्षणभर स्मरणात लवलवली. पण या विशाल, मातकट, पात्रानेही पाहताच मनात घर केले, आणि कलकत्त्याप्रमाणे त्याचे माझ्या मनातील रूपही वेढून टाकले !

मे महिन्यातील ती खरखरीत दुपार म्हणजे तापमानाच्या हिशेबाने खरखरीत. पुढच्या दोन-तीन दिवसांच्या वास्तव्यात कधी नव्हे असा शिजून निघालो. पण शहराच्या जवळपासची, परिसरातील, ती अगणित लहानमोठी तळी, त्या माडांच्या राया आणि सगळे हिरवेचार पाहून त्या वातानुकूलित विमानाचा गारवा वाढल्यासारखे वाटले.

क्षणभर कोकणाचा, गोव्याचा, भास झाला. पण इतकी तळी तेथे नाहीत. ही तर बंकिम बाबूंची सुजला भूमी. इतरत्र कोण जाणे, निदान हा तुकडा तरी. कोकणात नुसताच पाऊस ओततो आणि समुद्रार्पण होतो. येथे तो भूमीच्या अधिक अंगी लागत असावा. बंगाली कथा-कादंबऱ्या एके काळी आवडीने वाचल्या-अर्थात भाषांतरांतून, त्यांतून ज्ञान मिळाले, की बिनशहरी बंगालमध्ये सुखवस्तू घराचे आपापले मासेमारीसाठी तळे असते. त्याला पुकूर हे छान नाव आहे. आणि बंगालबद्दलचा आदर दुणावला. अर्थात कोकणी रुचीला गोड्या पाण्यातील मासे हे आपद्‌धर्मात मोडतात, खाऱ्या पाण्यातले ते मत्स्यब्रह्म. गोव्याच्या भाषेत बोलायचे, म्हणजे खाऱ्या पाण्यातले ते माशांतले ' बामण ' आणि गोड्या पाण्यातले ' भट ' ! जात काढली, की चेकाळून पोटजात काढायचीच, हा तर मराठी बाणा ! तेव्हा पुढे जाऊन, आणि गोवा-सावंतवाडीचा थोडासा रत्नागिरीशी संकर करून, असेही

म्हणता येईल, की खाऱ्या पाण्यातले ' बामण ', तर त्यांतले जे सुकवून खारवले जातात, ते तर अगदी चित्पावन. राहवतच नाही, तेव्हा लिहून टाकावे. ते स्वतःच्याच चितेत पावन होतात, आणि भक्षिणाऱ्यासही पावन करतात. जाणकारास याची फोड करून सांगण्याची आवश्यकता नाही; आणि जे अजाण, त्यांना ते सांगूनही समजणार नाही. असो. माशांच्या केवळ नामस्मरणाने कल्पनाशक्तीही शिवशिवते ! हे सगळे ' परमार्था 'ने घ्यावे– जातपात केवळ गमतीला आधार, म्हणून. पेशवाईत असे कोणी लिहिले असते, तर त्याचा, निदानपक्षी, हात कलम केला असता–असे आजही कोणी संस्कृतिसंरक्षक म्हणणार नाही, असे नाही !

पुन्हा विषयांतरात घसरलो. ते सगळे तळ्यावरून निघाले. शहराबाहेरच नव्हे, खुद्द शहरातही पुढे दोन–तीन मोठे तलाव पाहिले–एकमेकांशेजारी. त्यांतलेच एक ' रवींद्र सरोवर '. काही वर्षांपूर्वी राजकारण्यांनी गाजवलेले–गुंडांहून अधिक ! तो विशाल जलाशय पाहून मला मुंबईकराला थोडा हेवा, थोडा मत्सर, थोडे वैषम्य वाटले नसते, तरच नवल !

पण त्या ओल्या-हिरव्या वैभवाशी माझ्या मनातल्या बंगालचा सांधा जुळला. लहान वयापासून बंगालविषयीचे आकर्षण रुजले होते: चार–दोन मोठ्या नावांपलीकडे त्याविषयी काही माहिती नसली, तरी राजकारण कळत नसले, तरी महाराष्ट्र आणि बंगाल यांत राजकीय लागेबांधे असल्याचे ठाऊक होते. त्यांतील काहींना क्रांतीचा घट्ट पीळ असल्याचे ऐकलेवाचले होते. क्रांतिकारक, पिस्तुले, बॉंब, फाशी—असल्या शब्दांत आम्हां छोट्यांना चेतवण्याचा गुण होता. मग अर्धवट वाचलेल्या, अर्धवट ऐकलेल्या, तसल्या कथा एक-मेकांना साजेलशा खालच्या सुरात ऐकवताना होश चढे ! हा खेळ फार दिवस टिकला नाही, दुसरे खेळ आले, पण बंगालचे आकर्षण वाढतच राहिले. ते मुख्यतः साहित्यातून. ' वंदे मातरम् 'ने बंकिमचंद्रांची प्रतिष्ठापना केली होतीच. पुढे रवींद्रनाथांचे दिवस आले-गेले. नंतर शरच्चंद्रांनी घेरले. काही कवी होतेच. आपल्या इतर कोणत्याही भाषेतील साहित्याशी तेवढी जवळीक नव्हती. आणि केवळ साहित्यच नव्हे, शाळासुद्धा पुरी झाली नव्हती, तेव्हा रामानंद चतर्जींचे ' मॉडर्न रिव्ह्यू ' हे मासिक वाचण्याचा– निदान प्रयत्न करण्याचा–अकालप्रौढ छंद लागला होता. त्यात चित्रेही असत, ती नव्या ' बंगाल ' घराण्याची– आपल्याकडे दिसत, त्याहून फार वेगळ्या धर्तीची. चित्रकलेतील काही कळत नसे, तरी ती पाहावीशी वाटत. आपल्या ' रत्नाकर 'ने काही काळ ती चित्रे दिली; पण ती इकडे रुचतील–पचतील अशी, आणि मला वाटते, त्याच मासिकातून व अन्यत्र, नव्या ' बंगाली ' चित्रकलेची कुचेष्टा होऊ लागली. परिणामी–स्वभावधर्म म्हणून असेल–तसली ' बंगाली ' चित्रे मी अधिक उत्साहाने पाहू लागलो. ' शांतिनिकेतन 'भोवती तेव्हा वलय होते; तेथे काही दिवस तरी राहावे, असे त्या काळच्या आणि नंतरच्याही माझ्या अति-खासगी, अबोल, अशा पन्नास स्वप्नांपैकी एक होते !

पुढे बंगाल काहीसे एकाएकी फार जवळ आणले, ते चित्रपटांनी, विशेषतः न्यू थिएटर्सच्या. ' देवदास 'ने तर झपाटलेच—मला आणि माझ्या अनेक स्नेह्यांना. सैगल, पंकज मलिक, पहाडी संन्याल, प्रमथेश बरूआ ही मंडळीत चहाच्या घोटाबरोबर, आणि सिगरेटच्या झुरक्याबरोबर, घ्यायची नावे झाली. न्यू थिएटर्सचा जमाना संपला, त्याच्या फक्त आठवणी राहिल्या. काही वर्षांनी बंगाली चित्रपटात असा एक नवा झोत आला, की त्याने त्या आठवणी पुसून टाकल्या. तो झोत सत्यजित रायने आणलेला. बंगालच्याच नव्हे, तर देशाच्या चित्रपटसृष्टीत एक नवा अध्याय सुरू झाला. आणखी मोठमोठे कलावंत आले. बंगालचे दैन्य, वैफल्य, चैतन्य त्यांनी जिवंत केले—

बंगाली नाटके पाहण्यासाठी तरी कलकत्याला जावे, असे केव्हाचे घोकत आलो, पण गेल्या काही वर्षांत शंभू आणि तृप्ती मित्र, अजितेश बॅनर्जी यांसारख्या कित्येक कलावंतांनी आपली काही नाटके येथे केली. बादल सरकारची मराठी भाषांतरे आपल्या रंगभूमीवर आली. ही सगळी नाटके आवडीने पाहिली होती. वेगळे काहीतरी करून दाखविण्यासाठी धडपडणाऱ्या झोपडपट्टीवजा ' बस्तीत ' राहणाऱ्या असल्या कलावंतांबद्दल ऐकत आलो होतो.

त्यांचेच हे कलकत्ता. रवींद्रनाथांचे, ब्राह्मो समाजाचे, आशुतोष मुखर्जींचे कलकत्ता केव्हाच इतिहासजमा झाले, म्हणे. मधल्या काळात किती उत्पात घडले. बेचाळीसच्या दुष्काळात लाखो लोक टाचा घासून मेले. त्यांतील हजारो लोक कलकत्याच्या राजरस्त्यावर ...तीन वर्षांनी जातीय दंग्यात हजारोंची कत्तल झाली...एकाहत्तर साली पूर्व बंगालातून लाखांनी निर्वासित लोटले. आपल्या कोणत्याही शहराने असे भोगले नसेल...तरी ते उभे आहे, ठामपणे, पूर्वीपेक्षाही जळजळीतपणे. पुष्कळ वर्षे कलकत्यात काढलेले, त्याच्याशी समरस झालेले एक स्नेही मला म्हणाले, की आपल्या कोणत्याही शहरात इतका सर्वांगीण चैतन्याने सळसळणारा तरुणवर्ग आढळणार नाही...

या आणि यांसारख्या कितीतरी गोष्टींनी मन गजबजून गेले असताना या चिरतरुण शहराचे प्रथम दर्शन मी घेत होतो. वरून—आणि बघता बघता जमिनीला पाय लागले. कसलीतरी लहर अंगातून चमकून गेली.

मी कलकत्याच्या प्रेमात पडलो का ? पडायचे ठरवूनच आलो होतो मुळी, किंवा पूर्वीच, फारच पूर्वी, पडलो होतो, म्हणा ! फक्त भेटीचा उपचार किंवा संस्कार व्हायचा राहिला होता. तो आज पार पडला...आता डोळ्यांना काही दिसो, त्यामुळे त्या प्रेमात चलबिचल होणार नाही...अशा काहीशा निर्धाराने गावात शिरलो.

दुसरी, तिसरी, अशी आणखी दर्शने होतील.—त्याने ते प्रेम उठणार नाही, अधिकाधिक घट्ट बसणार आहे.

# ओटीपासून माजघरापर्यंत...

'ढवळे' मासिकाने आपला आवाका 'ओटीपासून माजघरापर्यंत' ह्या शब्दांनी आखला आहे. सरमिसळ कुटुंबांतील आवडीनिवडीचा लघुतम साधारण विभाज्य धरून ठेवण्याची ही आकांक्षा आहे. हे साहित्यिक अंकगणित सोपे नाही, हे खरेच; पण ते अगदी नवेही नाही. आजवर त्याच्या अनेक रीती आणि ताळे करून पाहिले गेले. पण उदाहरणाइतके सरळसोट उत्तर अजून गवसलेले नाही. गवसलेले वाटते, पण कोठेतरी अपूर्णांक गोता देतो. आपल्या साहित्याच्या नियतकालिक व्यवहारात ह्या फसव्या अपूर्णांकाने भल्याभल्यांना चकविले आहे.

'ओटीपासून माजघरापर्यंत' ह्याचा अर्थ लक्षणेने सर्वसंग्राहक 'कौटुंबिक' वळणाचे, असा घ्यायचा. मूळ शब्दांतील गृहस्थापत्य नामशेष होण्याच्या पंथाला लागले आहे. उघड्या शिळोप्याच्या ओटीचा अंतर्भाव दिवाणखान्यात झाला., ऐसपैस माजघराची दांपत्यवार शेजघरात फाळणी झाली, आणि माजघर–दिवाणखान्यातील लक्ष्मणरेषा पुसली गेली. स्त्री–पुरुषांची आत–बाहेरची चिरेबंदी वाटणी संपली. घरच्या भूगोलातील लिंगभेद जणू हरपले. खरे म्हणजे अघळपघळ कुटुंबाऐवजी नियमित विस्ताराचे अलग संसार असल्यामुळे घरेच इतकी आवळ झाली आहेत, की त्यांच्या अंगांची नावनिशी व त्यांमधील रेषा ही सगळीच मानीव झाली आहेत. पण तेवढ्या झपाट्याने वाक्प्रचार बदलत नाहीत आणि माजघराचा वास अजून स्मरणात रेंगाळत आहेच. स्मरणातील चित्रेही.

म्हणून ऐतिहासिक कादंबऱ्या आपण एवढ्या गोडीने वाचतो. त्या मुरलेल्या जुनेपणासाठी ' दिंडीपासून परसदारापर्यंत ' हा बासनातील वाक्प्रचारही गुणकारी ठरेल.

हा शब्दांचा खेळ सोडला, तरी हे खरे, की आपली बहुतेक मासिके आणि साप्ताहिके कौटुंबिक कार्यासाठी उपजली. पहिले मराठी नियतकालिक निघून यंदा नेमकी सव्वाशे वर्षे झाली. ते म्हणजे ' दर्पण '. पहिल्या अमदानीत ज्ञानलालसेवर जोर होता. ज्ञानदर्शन, ज्ञानप्रसार, ज्ञानप्रकाश अशी ज्ञानाची पूर्वपदी महती होती. अर्थात तत्कालीन परिस्थिती ध्यानात घेता, हे ज्ञान पुरुषनिष्ठ असावे, हे साहजिकच. पण एक ' स्त्रीज्ञानप्रदीप '— ही झळकला होता, म्हणे! पुढे मिशनऱ्यांशी हातघाई माजल्यावर ' धर्म ' शब्दाला भावात उठाव आला. नंतर ' नीती 'ला. पण ह्या खळबळी खास ओटीपुरत्याच. माजघरातील धर्मनीती शाबूत असल्याची बिनघोर शाश्वती होती. ती ढळली पुढे ज्ञानाने तेथे प्रवेश केल्यावर. तो धोका जाणून धर्मनीतिरक्षकांनी 'फीमेल स्कुलां ' वर शाब्दिक शेणमार केला—आणि जमला, तेथे अक्षरशःही ! पण ते ज्ञान संगदोषी होते, ते आवरेना. त्याने माजघराचा उंबरठा निषिद्ध मानला नाही. सगळ्या घरात ते काळवले. कित्येक मासिकांनी ह्या गोलंकाराला कसून हातभार लावला. उलट, तो टाळावा, म्हणून कोणी स्त्रियांना जुन्याचे वळसे दिले. पण एकंदरीने ह्या खटाटोपाला विपरीतच फळ आले! बाई ' बुक ' वाचू लागली, ह्यातच तडा गेला.

मरहूम ' विविधज्ञानविस्तार ' मासिकाची तारीफ कोणी वाचली नाही ! ( खुद्द ते फार थोड्यांनी वाचले! पण आपल्या बहुतेक ज्येष्ठ साहित्याचे असे उफराटे नशीब असते ! ) ते १८६७ चे. ' स्त्रीपुरुषांच्या सत्कालक्षेपार्थ ' आणि ' कल्याणार्थ व विश्रांती-स्तव ' असा त्याचा संकल्प होता. ( त्याचे पहिले संपादक श्री. रा. भि. गुंजीकर ह्यांची ' नावेले ' तसलाच उद्देश धरून होती ! ) दुसऱ्या वर्षी असे जाहीर करण्यात आले, की ते मासिक ' कुलस्त्रिया व गृहस्थ ' ह्यांच्या उपयोगासाठी आहे. ही दावण मौजेची आहे; पण तिचे धागेदोरे येथे तपासावयाचे नाहीत. इतकेच, की रंगभूमीच्या पासष्ट वर्षे अगोदर एका मासिकाने मन्वंतरासाठी स्त्रियांच्या कुळाबाबत कटाक्ष ठेवला ! असो. पुढे विस्ताराची विविधता आणि विषयकक्षा आकुंचित होऊन ते इतके ज्ञानवृद्ध—अगदी ज्ञानजर्जर—झाले, की बृहस्पतीच्या औरस वंशजांपुरताच त्याचा उपयोग होता. तशीच एखादी खडतर गार्गी -मैत्रेयी सोडल्यास, कुलस्त्रीला त्याच्याशी कर्तव्य नव्हते. ' विश्रांतीस्तव ' ते तिला सोयीचे पडले असेल. पण ते निराळ्या अर्थाने ! असो. तात्पर्य हेच, की ' विविधज्ञानविस्तारा '-सारख्या मासिकानेही प्रारंभी तरी अशीच कौटुंबिकता डोळ्यांपुढे ठेवली होती. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या ' निबंधमाले 'पुढे ती नसावी. कारण बुद्धिविलास, आणि तज्जन्य भानगडी, ह्या पुरुषांसाठीच, अशी त्यांच्या घराण्याची श्रद्धा होती. त्यांच्या शैलीतही पौरुषाचाच दिमाख अधिक होता. माजघराचे आणखी झरोके बुजविता आल्यास त्यांना हवे होते. पण हा अतिपुरुषी वाण मासिकाऐवजी एकंदरीने वृत्तपत्रप्रपंचातच अधिक रुळला.

ह्या पुरुषी तोऱ्याचे उट्टे मासिक 'मनोरंजन'ने वर्षानुवर्ष काढले. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते' (इत्यादी) हे ब्रीद त्याने मुखपृष्ठावर मिरविलेच, पण आतील साजही नारी-पूजेला शोभेल, असाच जमवला. अर्थात ह्या पूजेला योग्य स्थळ म्हणजे दिवाणखाना (किंवा त्याबाहेरचा बगीचा). त्याच्याशी मिळताजुळता सुबकपणा असलेली स्त्रीचित्रे आली. मग पुरुष कसला सुटतो! ओटीवरचा उघडाबंब मर्द आता स्त्री-पुजारी झाला. तो परटीचं खमीस (कधी वर जाकीट) घालून आणि घोट्यापर्यंत धोतर खेचून! डोक्याचा गोटा, चेऱ्याचा परीघ वाढवीत, 'क्राप'च्या तुळतुळीतपणापर्यंत आला. ओटी–माजघराची दिवाणखान्यात दिलजमाई झाली. ओटी कटाप झाली, निदान तिला छानदार कठडा आणि खुर्च्या लाभून ती दिवाणखान्यात सामील झाली. माजघर पडद्याआड लोपले. अख्ख्या घराचा दिवाणखाना झाला. संसाराचा देखील. ते संभावित शिष्टाचार नीट रुजले. ओटी-वरच्या तर्कटांचे आणि माजघरातील रगाड्याचे उग्र वास तेथील सुगंधी फवाऱ्यांनी मारले. हरिभाऊ आपट्यांप्रमाणे ही करमणूक 'सात्त्विक' होती, थोडी अधिकच. कारण हरि-भाऊंनी दिवाणखाना इतका गृहीत धरला नव्हता!

काही काळाने हेही फिके वाटू लागले; मनोरंजनाचा भर ओसरला. नारीपूजेची नवी तंत्रे आली. लालित्याचा सुकाळ झाला. साहित्यसाधनेला कशिदा–भरतकामाच्या क्लासाची गोंडस कळा आली. प्राचीन काळी एखादा अन्नंभट्ट न्यायदर्शनावरील आपला प्राथमिक ग्रंथ केवळ 'बालानां सुखबोधाय' लिहिला, असे कबूल करी; आता 'ललनानां सुख-बोधाय' (किंवा केवळ सुखाय) आपण सोपे, जणू पूर्व–प्राथमिक, साहित्य लिहितो, अशी प्रौढी आली. कथा–कादंबऱ्यांचे (पुरुष) नायक बायकी मापावर बेतले जाऊ लागले. एका काळचा अति–पुरुष नरम होत होत किंचित–पुरुष (अगदी उप–स्त्री) बनेल, असा संदेह वाटण्याइतकी विपरीत परिस्थिती आली. तेव्हा जणू स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व ठासून सांगण्यासाठी त्यांची निराळी मासिके आवश्यक वाटू लागली. 'किर्लोस्करा'तूनच 'स्त्री' निघावी, ह्याचा अर्थ हाच! वरेरकरांच्या माईंची 'महिला' तेव्हाचीच. 'गृहलक्ष्मी', 'संजीवनी' ही पुरुषांनी स्त्रियांसाठी काढली. लेखिकांचे कौतुक इतके वाढले, की जणू बाई लिहिते, हा चमत्कार वाटावा! लेखकांचे फोटो देण्याची टूम तेव्हाच निघाली का?

ह्या स्त्रियांच्या खास प्रश्नांची चिकित्सा होणे साहजिक होते. बव्हंशी हे प्रश्न पुरुषांमुळे उपस्थित झालेले, म्हणून त्यांनाही त्यांत रस फार! आताही कित्येक साप्ताहिकांत, विशेषतः दैनिकांच्या रविवार–आवृत्तीत, स्त्रियांचे पान असते. (त्याला 'महिला-विश्व' असे काही तरी भव्य नाव असते.) त्यात एखादी वहिनी किंवा मावशी नाजूक अडचणींबाबत ठाम सल्ला देते. ते सगळे पुरुषच अधिक भाविकपणे वाचतात, म्हणे! (झंपरचा अथवा बटाटावड्याचा नवा प्रकार, असले साहित्य स्त्रियाच वाचीत असतील, पण काही सावध पुरुष आगामी संकटांचा इशारा म्हणून तिकडेही नजर ठेवून असतात, असे ऐकतो. असले, तरी थोडे.) असे स्त्री–पुरुषांतील साहित्यद्वैत लोपत आले. 'मुमुक्षु', 'पुरुषार्थ'

असल्या आपल्या भगव्या नावाला जागणाऱ्या मासिकांनी स्त्रियांना दूर ठेवले ( म्हणजे सती, साध्वी वगैरे सोडून ), तरी ते पवित्र अपवाद. एरव्ही स्त्री हळूहळू मासिकांची आणि ग्रंथांची मुखपृष्ठे बळकावून बसली.

साहित्य स्त्रियांपर्यंत पोचलेले नव्हते, तोपर्यंत अश्लीलतेचा प्रश्न कोणी काढला नाही. केवळ पुरुषी साहित्याला तो विधिनिषेध नसतो. जुन्या साहित्यात सगळेच श्लील म्हणून खपले ! त्यावर जे पोसले, ते नव्यातील अश्लीलता बारीक नजरेने हुडकून काढतात ! आणि छापील अश्लील हे तोंडी अश्लीलाहून अधिक नीतिविघातक असावे ! संस्कृति–नीति–पावित्र्य इत्यादी उच्च लचांडांचा भार आपण स्त्रियांवर टाकल्यामुळे त्यांच्याबाबत इतकी जागरूकता. ‘ फक्त पुरुषांसाठी ’ मासिके असतात, तशी ‘ फक्त स्त्रियांसाठी ’– खऱ्या स्त्रियांनी खऱ्या स्त्रियांसाठी काढलेली–मासिके निघाली, तर ती बिनधोक श्लील असतीलच, असे नाही. एकूण, अश्लीलतेचा प्रश्न मिश्र–साहित्याचा, म्हणजे मिश्र–समाजाचा, आहे. सोज्ज्वळ साहित्याची व्याख्या तात्यासाहेब केळकरांनी ‘ स्त्री–पुरुषांनी एकत्र बसून वाचण्याजोगे ’ अशी काहीशी केली आहे. अभिप्राय असा, की लहान–थोर स्त्रीपुरुष–कुटुंबीयांना ते एकत्र वाचायला अवघड वाटू नये. तसे पाहू जाता व्याख्या थोडीशी सैलच आहे. त्या स्त्री–पुरुषांची बौद्धिक कुवत, त्यांचे परस्परसंबंध, ह्यावर बरेचसे अवलंबून राहील. तात्यासाहेबांच्या तरुणपणी चांगली नाटके–कादंबऱ्यादेखील बाळबोध कुटुंबात चोरून वाचाव्या लागत ! आणि एकत्र वाचायची ( वा ऐकायची ) सक्ती का ? पण हे आक्षेप बाजूला ठेवले, तर त्या व्याख्येत तडजोडीपुरते तथ्य आहे, हे मान्य करावे लागेल. भरल्या घरात वाचण्यासाठी साहित्य येते. ( ते उघड्यावर ठेवायचे झाल्यास ) त्याचे कप्पे पाडण्याचा प्रसंग येऊ नये. कप्पे पाडल्यास दुसऱ्याच्या कप्प्यात डोकावून पाहण्याचा मोह आवरत नाही. हा मनुष्यस्वभाव आहे. असे चोरून पाहिले–वाचले, की कल्पनाशक्ती बेचैन होते आणि तिला भल्यात बुरे दिसते. अर्थात भलेबुरे हे शब्द शिष्टमान्य अर्थाने घ्यावयाचे. तेव्हा सर्वांना जे भले, ते समन्वयाने सिद्ध करायचे, असे हे अनुपान आहे. लिंगभेदानेच ‘ सर्व ’ नव्हे, तर वयभेदानेही. पोक्त, अकालपोक्त, तरुण, अकालतरुण, आणि ज्यांना ‘ कुमार ’ म्हणायची प्रथा पडली आहे, ती धड–ना–पोर, धड–ना–थोर, अशा बिकट अवस्थेत कुचंबणारा प्राणी, ह्या सर्वांच्या वाचनाची सोय पाहायची, अशी ढवळ्यांची साहित्यिक सर्वोदयाची योजना असावी. फिरून एकवार प्रयत्न म्हणून तिचे महत्त्व आहेच.

# क्रिकेटच्या गप्पा

खेळाचे, म्हणे, दोन प्रकार असतात. स्वतः खेळणे हा एक, आणि इतरांचा खेळ पाहणे हा दुसरा. हा दुसरा प्रकार अर्थातच लोकप्रिय असतो. नव्वद काय, नव्याण्णव टक्के लोक त्यात सामील असतात– म्हणजे या एकूण दोन प्रकारांपैकी. तेच बरे. नाहीतर अनवस्था प्रसंग ओढवायचा. ब्रेबॉर्न स्टेडिअमवरील क्रिकेट सामन्यात भाग घेणारे, अगदी राखीव खेळाडूच काय, अंपायरदेखील मोजून तीस–बत्तीसवर भरत नाहीत. पण पाहणारे कधी कधी पन्नास हजारांच्या घरातदेखील असतात. त्यांतले खेळ पाहणारे किती, ते सोडा! पण ते बघ्यांचे लोंढे खेळायला म्हणून मैदानात उतरले, तर काय घ्या! तेच जरा कमी प्रमाणात इतर खेळांचे. अर्थात पंचांचा निकाल पटला नाही, या किंवा अशाच काही सबबीवरून कधी प्रेक्षक मैदानात उतरतात– पण तो खेळ निराळा! असो. स्वतः खेळण्याच्या आनंदापेक्षा खेळ पाहण्याचा आनंद गौण प्रतीचा–सेकंडहँड, असे कोणी म्हणतील. म्हणोत. पण गायकाच्या मस्तीहून रसिक श्रोत्यांची मस्ती कमअस्सल असते का? विषय बिकट आहे. तो विद्वानांच्या परिसंवादावर सोपवावा, म्हणजे तो अधिक बिकट होईल. त्याचे ते सौंदर्यशास्त्र करून टाकतील!

असा एक मनात विचार येत राहतो, की प्रेक्षकच नसतील, तर सामन्यांना रंगत यायचे सोडा, मुळात सामनेच होतील का? नाटकासारखे आहे थोडेसे ते. वृत्तपत्रांत बातमी यायची बंद झाली, म्हणून लढाईच बंद केल्याचे कारल चापेकच्या एका पुस्तकात

आहे, त्याची आठवण होते.

आपण आता ' प्रस्तुत ' म्हणतात, त्या विषयाकडे वळू. क्रीडानंदाच्या त्या दोन प्रकारां-शिवाय तिसरा एक प्रकार आहे. आणि आकडेवारीने पाहिले, तर तो दुसऱ्या म्हणजे दर्शनसुखाच्या प्रकाराहूनही अधिक लोकप्रिय ठरेल. तो प्रकार म्हणजे खेळाविषयी गप्पा मारणे. त्याला वाणीसुख किंवा जिव्हाभोग असे नाव देता येईल, पण असला भारदस्तपणा लेखनात शोभून दिसेल, बोलण्यात नको !

क्रिकेट हा खेळांचा राजा, हे सूत्र आपण त्या खेळाबरोबरच इंग्रजांकडून उचलले. त्याच चालीवर गप्पा मारण्याच्या खेळात क्रिकेट हा राजा, नव्हे सम्राट, असे म्हणता येईल.

–आणि त्याचे हे साम्राज्य वाढत आहे.

एकाहत्तर साली या देशाने युद्धात एका राष्ट्रावर जय मिळवला, आणि क्रिकेटमध्ये दोन राष्ट्रांवर. त्यामुळे देशप्रेमाला भरते आले, तसे किंवा त्याहून, क्रिकेट–प्रेमाला आले. कधी नव्हे, अशी त्याची लागण झाली. नेहमीप्रमाणे रेडिओ, वृत्तपत्रे यांच्यामुळे साथ आणखी बळावली. त्यातच बहात्तर साली आपण— म्हणजे आपल्या क्रिकेट–संघाने— इंग्लंडचा आणखी एकदा पराजय केल्यामुळे कहर झाला. सामन्यांच्या दिवसांत त्यांवर लाखांनी तोंडे वाजत असतातच. पण यंदा तो मोसम केव्हाच संपला, तरी ते कवित्व अजून संपलेले नाही ! तिन्ही त्रिकाळ, उठताबसता; घरीदारी गजर चालूच आहे. अहो, इतक्या सात-त्याने भगवंताचे नाव घेतले, तर मोक्षाची गॅरंटी मिळेल, असे कोणीही लहानमोठा संत ठासून सांगेल !

त्यातच यावर्षी मुंबईत टी. व्ही. सुरू झाल्यामुळे ज्यांना खेळ समक्ष बघता आला नाही, त्यांचीही थोडी सोय झाली. तोंडाला आधार मिळाला.

–म्हणजे असा आधार लागतोच, असे नाही. क्रिकेटच्या गप्पा मारणाऱ्यांपैकी अनेकांनी कधी त्याचा सामना पाहिलेला नसतो–गल्ली–क्रिकेट सोडल्यास. काहींनी धड तोही पाहिलेला नसतो. पाहणाऱ्यांपैकी कित्येकांना काय पाहावे, काय चालले आहे, तेच नीटसे कळत नसते. पण त्याने काही बिघडत नाही. शिवाय दुसऱ्याचे ऐकून बोलता येते. त्याने कदाचित तिसऱ्याचे ऐकलेले असते. दोन लेख वाचून तिसरा तयार करण्याचे, किंवा चार पुस्तके वाचून पाचवे बनवण्याचे कसब असते. त्यापैकीच हे ! त्याशिवाय, वर्तमानपत्रातले लिखाण आहे, आणि आकाशवाणीवरील ' वृत्तान्त ' आहे...

या गुणाबाबतही ' गुणिषु नच लिंगं नच वयः ' हे खरे आहे. क्रिकेटचा खेळ एके काळी पुरा पौरुषेय असे– म्हणजे नेत्रसुखाबाबतही. पुढे सामन्याच्या ठिकाणी महिलाही बसायला येऊ लागल्या. अर्थात त्यामुळे काही पुरुषांबाबत तरी, वक्रतुंडाच्या भाषेत, नेत्र-सुखाचा प्रकोप झाला असणार. अलीकडे तेथे महिलांचा वावर इतका वाढला आहे, की आर्टस् कॉलेजचा किंवा सचिवालयाचा भास व्हावा. आणि आता तर महिलांचे आंतर-

विभागीय क्रिकेट सामने सुरू झाले आहेत. आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या वावड्या भिरभिरत आहेत. ' जे जे होईल, ते ते पाहावे ', असे आमचे पंडितराव वैतागाने म्हणतात. तो वैताग खरा, की दाखवण्याचा, हे त्यांनाच ठाऊक! आतापर्यंत महिला सठीसामासी क्रिकेट-सामन्यात खेळत–कॉलेजच्या उत्सवी सामन्यात, वगैरे. अलीकडे, चित्रतारका कसल्यातरी सत्कार्यासाठी निधी जमवण्याच्या सद्हेतूने किंवा सन्निमित्ताने भरवल्या जाणाऱ्या अशा सामन्यात उतरू लागल्या आहेत. पण हे सामने म्हणजे एकंदरीत विनोदाचे उत्सव असतात, आणि ते सहसा ' मिश्र ' असतात. म्हणजे पुन्हा विनोदाचा प्रकोप. हे महिलांनी क्रिकेट खेळण्या–पाहण्याविषयी झाले. त्यांच्या बोलण्याविषयी–आपण काय बोलावे ? आधीच महिला –तशात ही क्रिकेटची नवी फॅशन ! क्रिकेटच्या गप्पा हे आता पुरुषांचे राखीव क्षेत्र राहणार नाही. कोण जाणे, इतर काही क्षेत्रांप्रमाणे ते हेही गमावून बसतील, किंवा त्यात अंग म्हणजे तोंड, चोरून वावरतील, आणि निमूटपणे ऐकून घेतील ! महिला–मंडळ जमले आहे, गप्पांच्या वाती वळता वळता गावसकर आणि वाडेकर यांच्याविषयी ' तौलनिक ' बोलणे तावातावाने होत आहे– त्याचा ' स्टान्स '; म्हणजे उभे राहण्याची ढब, आणि केसांची स्टाईल, इत्यादींविषयी... असे चित्र कानांपुढे वाजत राहते !

त्याचप्रमाणे क्रिकेटच्या गप्पांत वयाबाबतही भेदाभेद नाही. ती बाधा गोवर–कांजिण्या-प्रमाणे लहान मुलांनाच व्हावी, अथवा प्रेमात पडण्याप्रमाणे तरुण लोकांनाच व्हावी, असे नाही. जून झालेल्याच नव्हे, तर अगदी पिकलेल्या बाप्यांनाही ती सोडत नाही. ' नन्ना करते मान ' अशा अवस्थेतही कधी ती मान नायडूंच्या सिक्सरच्या आठवणीला दाद देण्यासाठी उत्साहाने डगडगली असेल. अशा आठवणींचा होश चढू लागला, की ढगळ वर्षे गळून पडतात, सुरकुत्या नितळ होतात, केसांना कलप चढतो... आणि तोंड वाजू लागते, किंवा कवळी वाजू लागते, म्हणा ! आजचे–कालचे–परवाचे, सगळे भरून येते, आणि पोर-उत्साह सळसळू लागतो. पण काही अभाग्यांत मात्र सगळे परवापाशीच थबक-लेले, थिजलेले असते. आजकालचे वारे लागू नये, म्हणून त्यांनी सगळ्या खिडक्या बंद केलेल्या असतात, जुन्यापान्या आठवणींचे ठेवणीतले मफलर घट्ट बांधलेले असतात– आणि मग हे बुजुर्ग ' गेले ते दिवस 'चा दमेकरी सूर लावतात. पंचेचाळीस वर्षांपूर्वी अस्तंगत झालेल्या चंदाराणासाठी चुकचुकायचे; चंद्रशेखरच्या पराक्रमाची दखल नाही. अमरनाथचे तेहतीस सालचे एकुलते एक कसोटीशतक पुन्हापुन्हा पिंजायचे. पण विश्वनाथचे शतक ? ' छे, छे, अमरनाथसारखे काही ते व्हेरिटी आणि निकल्स आणि कोण–तो, असल्यांच्या बोलिंगला ते काढले नव्हते, ' असे चिरचिरायचे. मिलिटरी अकांउंटस्‌ची सेवा संपवून पंचवीस वर्षे पेन्शनीत काढलेल्यांनी आपण लागलो, तेव्हाचे साहेब कसे लालबुंद असत आणि नंतरचे कसे फिकट होते, असे अलीकडे पेन्शनीत निघालेल्यांना हिणवण्यासारखे झाले ते !

अर्थात ही मंडळी नेहमीच पेन्शनीत नव्हती. कोणे एके काळी तेही जवान होते. त्यांच्या

ज्येष्ठांनीही पी. बाळू आणि कांगा आणि अब्दुस्सलाम आणि ऱ्होडस् अशी जुन्या दैवतांची नामावळी संध्या म्हटल्यासारखी उच्चारून आणि चालू दैवतांची हेटाळणी करून त्यांना गांगरून सोडले असणार. त्याकाळचे ज्येष्ठ असे गांगरून सोडण्यात पटाईत होते, आणि कनिष्ठ गांगरून गेल्याचे दाखवणे हे आपले कर्तव्य समजत...

पण क्रिकेटच्या गप्पांचे परमसुख हवे असेल, तर आपली तोंडे बंद ठेवा. आणि लहान मुलांच्या गप्पांकडे कान द्या. एखादा-दुसरा मोठा सामना पाहण्याचे भाग्य त्यांच्यापैकी फार थोड्यांना लाभलेले असते, पण तो पाहणे आवश्यकही नसते. त्यांच्या कोणी मित्राने तो पाहिलेला असतो, किंवा घरातल्या, निदान शेजारच्या, वडीलधाऱ्यांनी. तेवढे पुरे असते. उरलेले वर्तमानपत्रे, त्यांतील चित्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, इत्यादींतून काय अर्धेमुर्धे समजले असते, ते! पण या सगळ्यांशी हे छोटे लोक इतके समरस झालेले असतात, की आपण तो सामना पाहिल्याचा त्यांना भास होत असतो- आणि तो ते पाहतातही- अर्धजागृतीत किंवा स्वप्नात. एखाद्या माणसाचे छायाचित्र वारंवार पाहिल्यावर तो माणूस आपण समक्ष पाहिल्याचा भ्रम मोठ्यांनाही होतोच, अशा अर्ध्यापुऱ्या स्वप्नात तो मुलगा सामना पाहतच नाही, खेळतोसुद्धा. अकस्मात झोपमोड झाली, तर काही क्षण तरी तो स्टेडिअममधून बाहेर पडू शकत नाही, किंवा खुद्द मैदान सोडू शकत नाही. माझ्या एका स्नेह्यांच्या मुलाला जेवण्यासाठी म्हणून आईने झोपेतून उठवले, तेव्हा चिरंजीवांनी मातुःश्रीला बजावले,

'थांब, अजून एक विकेट पडायची आहे!'

अशा क्रिकेटवेड्या मुलांच्या बोलण्यात कल्पनेला खऱ्याचे अवसान चढते, आणि त्यात अगदीच कट्टी नसली, तर सगळेजण सामील असतात. कोणी कोणाच्या सत्यतेबद्दल शंका घेत नाही. तो अनुभव, आणि आनंद, सामायिक असतो. प्रत्येक गल्लीच्या संघात भारतीय कसोटीवीरांचे अवतार असतात. कोणी वाडेकर, कोणी बेदी, तर कोणी सोलकर. गुण्या-गोविंदाने मुले भूमिका वाटून घेतात. मग कोणाला मध्येच शंका येते, की वाडेकर डावखोरा बॅटिंग करतो, की उजव्याने? संघात एकमत होत नाही, चित्रांवरून नक्की बोध होत नाही, तेव्हा कोणाच्या तरी दादाला विचारले जाते आणि त्याप्रमाणे विन्याला, म्हणजे गल्लीच्या वाडेकरला, डावखोरे खेळावे लागते! पण त्याने काही बिघडत नाही. खेळ चालू राहतो, गप्पा संपत नाहीत. रेडिओवरील कॉमेंटरीची बोबडी आवृत्तीही भरीला असते...

नाही, अशा गप्पा ऐकण्याचा आनंद केवळ त्यामागील भावडेपणातून, अज्ञानातून आलेला नसतो. भाबडेपणा ही छोट्यांची मिरास नव्हे, अज्ञान तर नव्हेच नव्हे! फक्त मोठ्यांच्या अज्ञानावर ज्ञानाची आणि भाबडेपणावर चलाखीची झूल असते. त्यामुळे त्यांच्याही गप्पांत लज्जत येते— त्यांना स्वतःला ती कळत नसली, तरी!

पण, खरं म्हणजे, गप्पा चवदार व्हायला थोडा अज्ञानाचा मसाला हवाच. ज्ञानी लोक गप्पा मारीत नाहीत, ते ठाम मते मांडतात- स्वतःची किंवा दुसऱ्यांची!- वाद घालतात,

आणि वैताग आणतात. गप्पांचा शुद्ध आनंद त्यांना कोठचा मिळणार ? साहित्य, कला, राजकारण यांवरच्या गप्पा कशा अर्ध्यामुर्ध्या माहितीमुळे रंगतात ! पण त्यांत तट पडतात, रागलोभ उपटतात. क्रिकेटच्या गप्पांचे तसे नाही. त्या निर्मळ असतात...त्यात स्वार्थ नसतो, पोटदुखी नसते, हेवेदावे नसतात.

## ग्रंथ वाचणारा ग्रंथपाल

गेल्या दिवाळीच्या मोसमात सालाबादप्रमाणे जे थोडेसे लेखन स्नेहाच्या सक्तीने हातून घडविले, त्यापैकीच 'प्रस्तावना कशी लिहावी ?' हा लेख. खरोखरच तो दिवाळीतील मातबर कंत्राटदारांप्रमाणे एक डोळा कॅलेंडरवर, नव्हे घड्याळावर, ठेवून लिहिलेला, म्हणून लांबीतही जरा उणा उतरला. कधीकाळी त्याचे पुनर्लेखन केले, तर 'सक्तीची प्रस्तावना' हा प्रकार त्यात घातला पाहिजे. अर्थात, त्या लेखात आहेत, ते प्रकार तऱ्हेतऱ्हेच्या सक्तीचेच आहेत, पण ही तऱ्हा निराळी. ही केवळ स्नेहाची, आणि तो स्नेहही साहित्यिक नाही–त्या धंद्यातील लागेबांधे जमवण्यासाठी अथवा सांभाळण्यासाठी उबवलेला उमाळा नाही. तो नवथरही नाही. प्रस्तावना लिहिणारा आणि प्रस्तावना लिहविणारा हे अडीच तपांचे अगदी विद्यार्थिदशेपासून, स्नेही आहेत. तेव्हा साहित्यिक हा शब्दही ऐकिवात नव्हता–कोणाच्याच ! ती नंतरची टूम. साहित्याची आवड मात्र होती. इतर काही बऱ्यावाईट आवडींप्रमाणे तिने आमची मैत्री पोसली. ती मैत्री या मधल्या वर्षांत इतकी घट्ट झाली आहे, की ( उघड ) स्तुती करणे अवघड वाटावे. ती पोकळ असती, तर वजनदार विशेषणांचा उपचार लीलेने पार पडला असता. म्हणून तर, एका अर्थाने, ही सक्ती अधिक कडक.

किंबहुना, श्री. शांताराम शंकर रेगे हे संपूर्ण नाव ( इतकेच नव्हे, तर श्री.शां.शं. रेगे हा 'नियतकालिक' संक्षेप ) लिहितानाही हात अडखळतो. लहानपणचे घरातील

कौतुकाचे नाव बाबी : अशी नावे मोठेपणी विसरतात; पण रेग्यांबाबत ते विसरायचे राहून गेले. तेव्हा आमच्यासारखे जुने मित्रच नव्हेत, तर अल्पपरिचितही त्यांना बाबी म्हणतात. दुसरे फार तर तोंडावर म्हणत नसतील. आणि ते केवळ मोठ्यांशी घसट दाखविण्याची क्लृप्ती म्हणून नव्हे. त्याला उपाय नसतो. अगदीच आडनाव वापरण्याचा कोरडेपणा सोडल्यास, त्यांना ' शांतारामपंत ' म्हणवणारच नाही. ' पंता 'चा बोजडपणा त्यांच्या वृत्तीवर चढणे कठीण ! या वृत्तीमुळेच फार काळ अंतर उरत नाही आणि माणसे जवळ येतात. माझ्या सगळ्या स्नेह्यांत रेग्यांइतका लोकसंग्रह दुसऱ्या कोणी क्वचितच केला असेल; आणि इतक्या विविध उद्योगांतील माणसांचा कोणीच केला नसेल. सिद्धार्थ कॉलेजइतकाच तेथील ग्रंथसंग्रहातील रेग्यांचा दरबार प्रसिद्ध आहे; आणि त्या दरबारात कॉलेजातील अध्यापक व विद्यार्थी यांच्याइतकेच बाहेरचेही असतात; आणि हा अनेकावधानी पुरुष ' एकसमयावच्छेदेकरून ' म्हणतात, तशी प्रत्येकाची वास्तपुस्त करून आपले प्राथमिक आणि प्रामाणिक, म्हणजे ग्रंथपालाचे कर्तव्य अत्यंत कसोशीने पार पाडीत असतो. आणि हे सगळे विशेष न बोलता ! ते काहीसे पानाच्या तोबऱ्यामुळे असेल; पण त्याची सवय जडण्यापूर्वीही रेगे वाचाळपणाविषयी प्रसिद्ध नव्हते. मला वाटते, ते बोलण्यापेक्षा ऐकतात अधिक आस्थेने, आणि जे ऐकतात, ते त्यांच्या व्यावसायिक चटपटीतपणाने वर्गीकरण करून स्मरणाच्या कप्प्यात साठवून ठेवतात; आणि हे कप्पे त्यांच्या ग्रंथालयाच्या कपाटांप्रमाणेच आल्यागेल्यासाठी खुले राखतात. रेग्यांकडील पुस्तकांप्रमाणेच त्यांच्याकडील तोंडी माहितीवर आजवर कित्येकांनी आपले लिखाण सजवले असेल. पण अशा गरजू लेखकसंपादकांप्रमाणे इतर माणसांचीही त्यांच्या भोवती गर्दी असते. कित्येक पुस्तकांच्या वासाने येतात. ग्रंथपाल म्हणून रेग्यांनी गेल्या पंधरा वर्षांत एवढा लौकिक मिळविला आहे, तो उगाच नव्हे. कसल्या भलभलत्या विषयांवरील नव्याजुन्या पुस्तकांची ती एक बोलकी जंत्री आहे. नुसती नावनिशीची जंत्री नव्हे, तर त्यांतील बऱ्यावाईटाच्या संक्षिप्त चिकित्सेचीही ! म्हणून अडलेला विद्यार्थी, घाईला आलेला प्राध्यापक, अन्य ग्रंथपाल, या सर्वांची सोय ते बसल्या जागी– सूचीही न पाहता– करतात. नाहीतर, कांद्या–बटाट्याइतक्याच अलिप्तपणे पुस्तकेही हाताळणारे ग्रंथपाल आहेतच. पुस्तकांची संख्या, निवड आणि व्यवस्था यांबाबत ' सिद्धार्थ 'ने जे असाधारण यश मिळविले, ते पुष्कळसे रेग्यांच्या कर्तृत्वामुळे. पण ते नुसते कारभारी कर्तृत्व नव्हे; पुस्तकांवरील निष्ठेचे ते फळ आहे.

पण जे रेग्यांकडे केवळ पुस्तकांच्या वासाने ( अथवा निकडीने ) येतात, ते बहुधा कार्यभाग उरकल्यावरही थोडा वेळ तेथे विसावतात, कारण रेग्यांना पुस्तकांप्रमाणेच माणसांची चहा आणि समज आहे. कोठे परिशिष्टापुरता लहानसा गुण असला, तरी ग्रंथालयात ते पुस्तक हवे; त्याप्रमाणे ते माणसे खपवून घेतात. म्हणजे हे सर्वांभूती दया दाखविण्याचे भाबडे संताळे नव्हे, पुस्तकांसारखीच माणसांचीही त्यांना बारीक पारख आहे. पण माणसे म्हणून सगळी हवी, ते वैचित्र्य हवे, उच्चभ्रूपणाचा माणूसघाणा टेंभा नाही.

पण पुस्तके हा रेग्यांच्या अनेक बलिष्ठ छंदांपैकी एक ! संगीतातही ते तेवढेच बहुश्रुत आहेत. विद्यार्थिदशेपासूनच त्यांच्याजवळील रेकॉर्ड्सच्या चोखंदळ संग्रहाचा बोलबाला आहे. पण संगीत श्रवणभक्तीपुरतेच नाही. कोण्या एके काळी त्यांनी ते सुनविले देखील ! तेच रंगभूमीबाबत. अगणित नाटके वाचली, पाहिली; पण कित्येक केली देखील. ती सुद्धा स्त्रीवेषात ! गणेशोत्सवांच्या त्या जुन्या धाईगर्दीत एका ठिकाणचे ऐतिहासिक नाटक आटपून रंगभूषा न उतरता गाडीतून दुसरीकडे जायचे व थोडे वरवरचे बदल करून ' सामाजिक ' नायिका व्हायचे, या त्यांच्या झटपट कसबाविषयी आम्ही तेव्हा विनोदाने बोलत असू. आणि या नायिका सहसा ' संगीत ' असत. चित्रकलेचे तेच. उत्तमोत्तम कलाकृतींचा संग्रह केलेला ' अगदी खाजगीत ' पाहण्याच्या कृतींचाही ! ( तसल्या पुस्तकांप्रमाणेच ! ) अशी सर्वंकष रसिकता. माणसांप्रमाणेच कलांचाही व्याप ऐसपैस. पाककलेचा असला जाणकार विरळा. दत्तगुरू म्हणे, स्नानाला एका क्षेत्री, संध्येला दुसऱ्या, मध्यान्हाच्या पुडीला तिसऱ्याच, अशी त्यांच्या अतिमानुष संचाराची तारीफ. जुन्या काळी या माणसाचीही अशी तारीफ असे, की फराळाला निघाला, की एका दुकानात बटाटेपोहे, दुसरीकडे थालिपीठ, तर तिसरीकडे चहा ! ( तोही चौथीकडच्या बिस्किटांची आठवण काढीत ! ) अशी तयार आणि तौलनिक रुची ! काळ बदलला, तसे रुचीचे खाद्यपेयादी विषय बदलले. पण अजूनही तोच रस. ' कोठे काय सापडेल ' हे पुस्तकांप्रमाणे खाण्यापिण्याबाबतही जिव्हाग्री असते. देह– आणि– व्यवसाय– वशात् संचार जरा रुद्ध झाला, तरी या विषयाचाही ' तोंडी कोश ' म्हणण्याइतका अद्ययावत व्यासंग आहे.

रेग्यांच्या चतुरस्र रसिकतेचे हे आख्यान हवे तेवढे लांबवता येईल, इतकी त्यांची कमाई आहे; पण ते आवरावे. तरीही जाताजाता सांगितले पाहिजे, की अजूनही मला चांगलेसे कापड हवे असले, तर तज्ज्ञ म्हणून रेग्यांना पुसतो; कोठल्या गिरणीचा, कसला नवा माल, कोठल्या दुकानात आहे, ते ते सराईतपणे सांगतात. उलट, माझ्या अंगावर ( चुकून ) काही चांगले दिसले, तर त्याची माहिती घेतात— अशी जिज्ञासा !

रेग्यांच्या व्यक्तिवर्णनाचा हा प्रपंच येथे केला, तो निष्कारण नव्हे. त्यांच्या लेखनाचे संदर्भ त्यात आहेत. हे लेखन सर्वस्वी ' विनोदी ' म्हणतात, त्या जातीचे. तो शिक्का आता रेग्यांवर चांगलाच बसला आहे. दिवाळी अंकांच्या जाहिरातींत त्यांची ती जातवारी ठळकपणे सांगतातही. रेडिओची तर बारमहा दिवाळी; आणि तेथे ही तयार जातवारी सोयीची म्हणून उचलतात. या संग्रहात रेडिओवरील तसली काही ' विनोदी ' भाषणे आहेत. ती सांगूनसवरून ' हलकीफुलकी,' बिनधोक ' कौटुंबिक ' विषयांवरची आहेत आणि रेग्यांनी ती फुलवलीतही हलक्या हाताने. पण त्यांचा खरा बाज ' आताशी मगाशी ,' ' काही साहित्यिक रोग आणि त्यांवर उपाय ' अशा लेखांचा.

रेग्यांनी आजवर बेसुमार वाचले ( ते ग्रंथ वाचणारे ग्रंथपाल आहेत ! ) आणि ते वाचन

त्यांच्या अंगी लागले. ते भारवाही, अवतरणपटू, बोथट विद्वानाचे वाचन नव्हे. रेग्यांनी पुस्तकांतला कस पचवला; त्यांच्या जाणकारीला त्याने धार दिली. अस्सल आणि नकल, सत्त्व आणि कोंडा, ही पाखडून अलग करण्याचे कसब त्यांनी मिळविले. अशी सरमिसळ बनावट सर्वत्र असणारच. पण ज्या साहित्याच्या क्षेत्रात उच्चतेचा आणि शुद्धतेचा आणि कलात्मकतेचा गोंगाट फार, तेथे अशी भेसळ अनेकदा चढ्या भावाने खपते. कोणाची कसली पुण्याई उपयोगी पडते. स्वतःचा किंवा गोताचा दबदबा असतो. पताका फडकवलेल्या असतात. जातिवंत विनोदबुद्धीला यात केवढे आव्हान मिळते! फोलकटे उघडी करून दाखवता येतात, उसनी रंगोटी पुसता येते; वेळप्रसंगी नकली दातांचा फार उपद्रव झाला, तर तेही पाडावे लागतात. पण हे सगळे कुशलतेने करायचे, म्हणजे वाङ्मयीन ग्रहण-शक्ती तल्लख आणि प्रगल्भ हवी; नाहीतर बऱ्यावाईटाचा विवेक राहणार नाही. विनोदाचे नुसते उपजत इंद्रिय असून भागणार नाही; त्याची निकोप वाढ व्हायला हवी. हिरवट विनोदाने काम नासेल. तसे झाल्याचे आपण वारंवार पाहतो.

रेग्यांच्या साहित्य-विडंबनातील विनोदाला वजन आहे, आणि ते त्यांच्या दीर्घ व्यासंगा-तून आलेले आहे. ते शस्त्र त्यांनी उगाच घिसाडी धसमुसळेपणाने चालवले नाही, थिल्लर-पणेही नाही. आणि शस्त्र धरले, ते सोंगाढोंगावर. माणसावर नव्हे. माणसाची विटंबना करणारा आडदांड आणि अधम विनोद किळस यावी, एवढा बुजबुजला आहे, त्याला कधी-कधी साहित्यिक सबब मिळते. अशी क्षुद्र सबब म्हणून साहित्याचा उपयोग न करण्या-इतकी रेग्यांची साहित्यावर निष्ठा आहे.

——आणि माणसावरही आहे. त्यांनी माणसांचाही व्यासंग केला आहे. सदैव पुस्तकांच्या पुठ्यांत वावरणाऱ्या पढिकांचे जग कित्येकदा किरटे आणि फिकट असते. रेग्यांचा वावर असा चौफेर, त्यांनी पाहिले-भोगले, ते अशा खुलेपणाने, की या भोवतालच्या समृद्धीने त्यांच्या दृष्टीत चौरसपणा आणि वृत्तीत उदारपणा आला आहे. माणसांच्या मौजा टिपल्या, त्या बैठकीत गमतीने सांगितल्याही. पण उगाच बदनामी करण्याच्या बुद्धीने नव्हे. बोलण्या-लिहिण्यातले अंतर ओळखले आणि राखले. नाहीतर एखादी 'खाजगी' भानगड ऐकताच तसल्या एखाद्या नियतकालिकाला ती भडक करून पुरविणारे झटपट-रंगारी विनोदकार आहेतच. वस्तुतः खुद्द रेग्यांकडे अशा 'भानगडीं'चा मुबलक साठा आहे. (त्यातून मसाला उचलणारे स्नेहीही असल्याची कुणकुण आहे.) खालच्या मानेने चालणारे रेगे चश्म्याच्या जाड भिंगांआडून पाताळ कसे धुंडतात, यावर आम्ही कॉलेजच्या दिवसांपासून बोलत आलो आहोत, आणि तसल्या सुरस पाताळ-कथांचा कधी कधी आस्वादही घेतला आहे. पण रेग्यांनी लेखनात मर्यादा पाळली. तशीच एक मर्यादा निर्मळतेची. अश्लील साहित्याचा (आणि चित्रांचा) रेग्यांचा अभ्यास गाढा आणि फार जुना आहे, तोही सोवळेपणाचा आव न आणता, मोकळ्या आणि रसिक मनाने केलेला. पण त्यांच्या लिखाणाला 'तसला' उडता वासही नाही; संशयग्रस्त संस्कृति-संरक्षक नाकाला येण्याइतकाही नाही.

या पुस्तकातील विडंबने अशी वाङ्मयीन आहेत. लिहिण्यातील लकबी, कल्पत्या आणि खोटारडेपणा यांवर विनोदी टीका आहे. 'आताशी मगाशी' या लेखात लालित्याच्या आणि लैंगिकतेच्या सोसावर आंतर-राष्ट्रीय वेष किमोनोसारखा चढविण्याची चालू खटपट उघडी केली आहे. पण तसल्या खटपट्यांचा साक्षात उपहास नाही-निंदानालस्ती नाहीच नाही. तेच 'रवि गेला, रे, सोडुनि आकाशाला' अथवा 'कविवर्य म्हाळसाकांत' असल्या लेखांचे. त्यांतील विनोद अगदीच अधांत्री नाही, त्याला विशिष्ट व्यक्तींचा आधार आहे. ज्या वाचकाला आजच्या साहित्याच्या बारीक खाणाखुणा नीट ठाऊक आहेत, त्याला त्या व्यक्तींचा पत्ता लागायला अडचण पडू नये, पण तो लागला नाही, तरी बिघडत नाही. त्यामागील वृत्तींची, सुचविलेल्या दंभांची ओळख पटणे अधिक महत्त्वाचे. व्यक्तींची मातबरी नाही. म्हाळसाकांतांची रंगभूषा रेग्यांनी किती चलाखीने, किती तपशील बदलून, केली आहे, ते पाहण्यासारखे आहे.

रेग्यांबाबत एक चमत्कार असा, की कालपरवापर्यंत त्यांनी विशेष लिहिलेच नाही. या पाच वर्षांत त्यांनी लेखनसंसार थाटला. वर्षानुवर्षे ज्यांनी इतक्या उत्साहाने आणि मर्म जाणून देशी-परदेशी साहित्य वाचले, इतर कलांतही रस घेतला, आणि एवढ्या मिस्किल-पणे ज्यांनी माणसांची चालरीत टिपली, गप्पाष्टके रंगविली, त्यांनी स्वतः लिहू नये, याचे आम्हांला कोडे वाटे. त्यांनी पुरविलेल्या पुस्तकांतून कित्येक लेखकांनी आपल्या पुस्तकांचा वा लेखांचा साज जमवून घेतला असेल, पण त्यांना स्वतःला तो मोह झाला नाही खरा. वाङ्मयचौर्य हा तर मोठा आकर्षक विषय. त्यात तपासाचे काम केल्याबद्दल काही जणांनी स्वतःला बिल्ले लावून घेतले आहेत. पण तो विषय महाबिकट. एक सापडला, तर दहा निसटतात. म्हणजे त्यांचा गुन्हा जाहीर होत नाही. पण रेग्यांकडे अशा उजेडात न आलेल्या गुन्ह्यांची पद्धतशीर जंत्री आहे. तिचा सार्वजनिक उपयोग त्यांनी केला असता, तर तसल्या बिल्ल्यांखाली ते लवले असते. ते असो. पण लिहायचेच, असा रेग्यांनी काही लेखकांप्रमाणे निर्धार केला असता, तर...!

कालच ही प्रस्तावना अर्धवट लिहून झाली, तेव्हा रेगे भेटायला आले. काही नवीन ढंगाच्या पाश्चात्त्य कादंबऱ्यांविषयी ते ऊर्मीने बोलत होते. मी म्हटले, हे सगळे लिहिले पाहिजेस. तेवढ्यात पुण्यातील एका नव्या मराठी पुस्तकाकडे बोलणे वळले. पाश्चात्त्य साहित्यावरील त्या जाडजूड ग्रंथात शलाका पद्धतीने पाहिले, त्यावरून शेकड्यांनी चुका असाव्यात, कोठूनतरी उचललेली माहिती त्यात (गबाळ) भाषांतर करून कोंबलेली आहे. त्या विद्वानाने रेग्यांना नुसते विचारले असते, तरी पुस्तक, निदान माहितीपुरते, चांगले झाले असते. आणि असल्या पानभरू विद्वत्तेचा, म्हणजे तसल्या कीर्तीचा, हव्यास असता, तर या पंधरा-वीस वर्षांत रेग्यांनी असले पंधरा-वीस पोटफुगे ग्रंथ निर्माण करून विद्वानांच्या पहिल्या पंक्तीत पान धरले असते.

सुदैवाने त्यांनी तसले काही केले नाही आणि तसले ते करणार नाहीत, इतकी त्यांची

विनोदबुद्धी शाबूत आहे. किंबहुना हल्ली ते लिहितात–पद्य आणि गद्य विडंबने आणि विनोदी लेख–त्यासाठी तरी त्यांना आपल्या अनेक उद्योगांतून वेळ कसा मिळतो, याचेही माझ्यासारख्या चेंगट लेखणीच्या माणसाला कोडे पडते. अर्थात ते जलद लिहीत असावेत. पण त्यांनी इतक्या घाईने लिहू नये, असेही कधीकधी वाटते...

पण विनोद हे त्यांचे एक अंग झाले. दुसरी अंगे त्यांनी का सुकू द्यावीत ? काल त्यांना म्हटले, तसे. त्यांनी उत्तमोत्तम पुस्तकांचा गाभा उकलून दाखविणारे, निरनिराळ्या कलांवरचे आणि कितीतरी विषयांवरचे लेखन केले पाहिजे. फक्त विनोदी लेखक हा शिक्का मिरवायला ते इतर अंगांनी अधू नाहीत.

येथेच थांबावे, नाही तर प्रस्तावनाकारांना येणाऱ्या गंभीर झटक्यांचे ते विडंबन करतील आणि तो मीच, हे सुमार वाचक ( आणि संपादक देखील ) ओळखतील.

# सुंदर मुंबई

शाखा (स्थळ प्रत)

मुंबईला मी सुंदर म्हटले, तर काहींना तो विनोद वाटेल, काहींना त्यात उपरोध भासेल, कोणाला ते ढोंगही वाटेल कदाचित. खरे म्हणजे Bombay : The Beautiful हे तिचे जुने इंग्रजी वर्णन आपण अनेकदा उद्धृत करतो. पण इंग्रजी अवतरण हे अकारण किंवा शोभेसाठी वापरायचे, त्याच्या अर्थासाठी नव्हे, हाही आपला जुना बाणा आहे. अलीकडे तर मुंबईसारखा नावे ठेवायला अन्य सोयीचा विषय नाही, असे झाले आहे. येथील गर्दी, गोंगाट, धावपळ, झोपडपट्टी, इत्यादींचे कोणीही आख्यान लावावे. भाविक श्रोत्यांना वाण नसते. बकाल हे तर लोकमान्य विशेषण. ते मात्र अलिकडचे नाही. तीस-चाळीस वर्षांपूर्वीची मुंबई बरीच निराळी होती. लहान, अटकर, शांत. पण तिलाही बकाल म्हणावे, असा सोज्ज्वळ लोकांचा संकेत असे. असेच आणखी एक सोवळ्यातले विशेषण म्हणजे, मोहमयी. मुंबई तऱ्हेतऱ्हेच्या मोहांनी बुजबुजलेली आहे, पाऊल वाकडेच पडावे, असे रस्ते येथे फार आहेत, निष्पाप माणूस येथे बघता बघता बिघडतो, अशी या नगरीची दुष्कीर्ती तेव्हाचे बोधवादी सज्जन नेमाने गात. त्यांत कथा-कादंबरीकारही आले. प्रेमात पडायला माणूस मुंबईला पाठवत. म्हणजेच बिघडायला. किंवा व्यसने लागायला. ते व्यसन रंडीबाजीपासून चहाबाजीपर्यंत कसलेही चाले. उदात्त ध्येय वगैरे आचरायला नायकाला एखाद्या खेड्यात पाठवत, किंवा फार तर पुण्यात.

मला वाटते, अशा नीतिबाजांनी या मोहमयी मुंबईला नाके मुरडली. ' शांतम् पापम् 'चा

पवित्रा घेतला, तरी मनातून ते तिच्यावर आशक होते. त्या मोहांची त्यांना हाव होती. पण उघड तसे म्हणणे त्यांच्या संभावितपणाला शोभून दिसले नसते. म्हणून अशा एखाद्या पात्राकरवी, शब्दांनी स्वतःला चेतवीत, ते विपरीत इच्छापूर्ती करून घेत असावेत. सुंदर स्त्रीला भुललेल्या, पण बुजलेल्या, ढोंगी माणसाला, ती वाईट चालीची आहे, असा बोभाटा करण्यात कसले तरी सुख मिळते, त्यापैकीच हा प्रकार.

—आणि सुंदर गाव असे म्हटले, की मनातील एक जुनी गाठ ठसठसू लागते. खेडे-गाव सुंदर असते, शहर नसते. शाळेत लिहिलेल्या निबंधांपासून ती सोंगाडी कवाईत अंगवळणी पडलेली असते. अजूनही काही पोटभरू सिनेमावाले त्या पोपटपंचीची उजळणी करीत असतात. खेडे नाही, तर खेडेवजा शहर चालेल, पण पन्नास लाखांचे शहर आणि ते सुंदर !

—हो, पन्नास लाखांची ही मुंबई खरोखरच सुंदर आहे. अर्थात सौंदर्याची तुमची कल्पना काय, यावर ते अवलंबून आहे. ती अगदीच शाळकरी असली, किंवा अर्धकच्च्या तारुण्याला शोभेशी असली, तर तुम्हांला हे पटणार नाही. म्हणजे ते केवळ वयावर नसते. रुची आणि समजदारी यांवर असते. चित्रांबाबत पाहा. पानपट्टीच्या दुकानातील ती चित्रे आठवा, किंवा त्याच जातीची कॅलेंडरे आणि पुस्तकांची मुखपृष्ठे ! त्यातील तो गरगरीत, पिवडी फासलेला चंद्र, ती फाजील फुललेली फुले, आणि त्या साजाला शोभून दिसणारी ती अतिपुष्ट स्त्री. असले भडक चिताडकाम ज्यांना सुंदर वाटते, त्यांतील बहुतेक माणसे वयाने वाढलेली असतात ! पण एखाद्या प्रतिभावान चित्रकाराने काढलेले निसर्गदृश्य त्यांना नीरस वाटते. तेच साहित्यात, तेच संगीतात. दृष्टी प्रगल्भ नसेल, तर मुलामा दिलेल्या शिळ्या गोष्टीही भारून टाकतात, म्हणजे मुलामाच भारून टाकतो.

मुंबई कधी शिळवटली नाही. तिची काही वळणे कोणाला आवडोत, न आवडोत, तिचा प्रवाह सदा जिवंत राहिला, त्याने शेवाळ धरले नाही. मग शेवाळ कोणाला कितीही मोहक वाटो ! ही कोण्या एके काळची मुंबई नाही, अगदी आजची मुंबई. जुन्या आठवणींच्या वासनात जपून ठेवलेली, माझ्या लहानपणची, किंवा त्यापूर्वीची, ऐकिवातली मुंबई नव्हे. काळाच्या किमयेने कसल्याही गावाला तसे छान रंग आणि वास चढतात. मग जुन्याबद्दल गहिवर काढणे सोपे असते. आपला धर्मच आहे तो. गहिवराने ते जुने जिवंत होणार नाही, ही अर्थात खात्री असतेच. मी मात्र आजच्या, अलिकडच्या, या महानगराबद्दल बोलत आहे.

याचा अर्थ माझ्या लहानपणची मुंबई अशीच होती, तिच्यात फारसा बदल झाला नाही, असे मुळीच नव्हे. तेव्हाचा तिचा विस्तार आणि लोकसंख्या आटोपशीर होती. झाड-झाडोरा अधिक होता, आवाज कमी होते, प्रवास आरामात होई. पण ती तेथेच थबकली नाही, किंवा थिजली नाही. ती सर्वांगांनी वाढत राहिली. नुसत्या क्षेत्रफळाने किंवा लोक-संख्येने नव्हे. वाढ म्हटली, की आपदा आणि अडचणी आल्याच. पण वैभवेही आली,

सुखसोयी वाढल्या. आजचे अनेक राजरस्ते तेव्हा नव्हतेच, किंवा अरुंद आणि वाकडे-तिकडे होते. त्यांवर साधी खडी असे, आणि पावसाळ्यात चिखल. बहुतेक रस्त्यांवर गॅसबत्त्या मिणमिणत. चार–पाच मजली इमारत प्रेक्षणीय वाटायची. बहुतेक वाहने फार संथ असत. ज्या विजेच्या ट्रॅमबद्दल आजच्या पंचविशीपारच्या कित्येक मुंबईकरांना उमाळे येतात आणि त्याआतील मंडळींना कुतूहल वाटते, ती भरधाव सुटली, तर दहा-बारा मैलांच्या वेगाने जाई, आणि कर्कश आवाज करी. अर्थात तिचीही मौज वाटे, बैलांच्या रेकल्याची वाटे, आणि झुकझुक करणाऱ्या वाफेच्या लोकलगाड्यांचीही वाटे. पण आधुनिक शहरात अशा मौजा विसंगत आणि व्यत्ययकारक होत्या. कार्यभाग संपताच त्यांनी काढता पाय घेतला, हे शहाणपणाचे. मुंबईही त्यांच्याबद्दल उसासे टाकीत नाही.

कोणी म्हणेल, मुंबईतील अशा गोष्टींचे जुनेपण ते केवढे ? या शे–सवाशे वर्षांत मुंबईला शहराची कळा आली. मग त्याला इतिहास, परंपरा, इत्यादी तीर्थरूप प्रतिष्ठा कोठल्या ? ते बरेच झाले ! शतकांच्या कोळिष्टकांनी आणि जळमटांनी या शहराला बांधून टाकलेले नाही. ते आपल्या तालात आणि जोशात पुढे चालत आले आहे. कधीकाळच्या मानीव मोठेपणाच्या गुंगीत ते आपल्याच भोवती घुमत अडखळत राहिले नाही.

–आणि गावाची सुंदरता म्हणजे फक्त निसर्गाने दिलेली सुंदरताच का ? ती चित्रातल्या-सारखी असते, आणि चित्रासारखी अचेतन असते. माणसाच्या कर्तबगारीने आणलेली सुंदरता जिवंत; सर्वांगी, प्रवाही असते. विटासिमिटात आणि यंत्रांत, इमल्यांत आणि कारखान्यांत ती सामावलेली नसते. माणसांच्या जीवनात ती उतरते, ते व्यापून टाकते.

म्हणजे मुंबईबाबत निसर्ग कद्रू किंवा कोरडा आहे, असे मुळीच नव्हे. ही नगरी सागराने लपेटलेली आहे. याहून मोठे वरदान निसर्गापाशी असेल, तर एखादेच. या सागराच्या कळा ऋतुमानाप्रमाणे बदलत असतात, रंगांच्या विविध छटा एकाच वेळी त्याच्यावर खेळत असतात. हा अथांग सागर हीच मुंबईची पश्चिमदिशा. पूर्वेला त्याचीच बंदिस्त किनार व तिच्या पलीकडे खाड्या आणि डोंगर आणि टेकड्या. आणि आभाळ नितळ असेल, तर त्या निळाईतून निसर्गाचे अनेक ढंग खुणावत असतात. मुंबईला हे सगळे लाभले आहे. आणखीही कितीतरी. जुन्या शहरातल्या ठुसक्या टेकड्या उठून दिसतात. त्यांपैकी मलबार हिलची शान परस्थांनाही ऐकून वाचून ठाऊक असते, ती मुख्यतः त्यावरील बागांची, जुन्या बंगल्यांची आणि नव्या वीस-पंचवीस मजली इमारतींची. ही पोशाखी स्थळे झाली. पण ती बाकदार हिरवी टेकडी सागरजळात पाय टाकून बसली आहे. खुद्द तिची शोभा फार निराळी आहे. आणि आता शहरात सामील झालेल्या पूर्वीच्या उपनगरांतील टेकड्या आणि राने, आणि विहार, पवई, तुळसीसारखे देखणे तलाव. त्या निवांत परिसरात बहुतेक सृष्टि-सौंदर्याची विनासायास उजळणी होते. आणि समुद्रकिनारे. जुनी चौपाटी तशी वीतभर, पण तिचे नाव पिढीजादपणे गाजत आले, ते सौंदर्यासाठी. म्हणजे निसर्गाच्या सौंदर्यासाठी नव्हे. दादर चौपाटी, जुहू, वेसावे, मढ, मारवे हे किनारे डोळ्यांत अधिक भरतात. सौंदर्याच्या

आस्वादाला जमेल तेवढा एकांत हवा, हे खरे. पण या किनाऱ्यांवर झुंडी लोटतात, हा काही त्यांचा अपराध नाही.

त्याशिवाय अपोलो बंदर, राणीचा बाग, आरे गौळीवाडा, नॅशनल पार्क यांसारखी ‘रजिस्टर्ड’ प्रेक्षणीय स्थळे आहेतच. पण हे काही ‘टूरिस्ट गाईड’ नव्हे.

तरीसुद्धा मरीन ड्राइव्हूची महती सांगायलाच हवी. अनेक मुंबईकरांना अतिपरिचयामुळे त्या वळणदार राजरस्त्याचे अप्रूप वाटत नसावे. त्याच्याकडे परस्थाच्या नजरेने पाहिले पाहिजे. त्याला ‘राणीचा रत्नहार’ म्हणतात, असा तो रात्री चमचमतो. असल्या रत्नहाराला शोभायला राणीही पऱ्यांचीच हवी. पण रात्री विमानातून पाहिले, की सगळी नगरी झगमगत असते. डोळे ठरत नाहीत. एखाद्या बादशाही पण गैदी जवाहरखान्यातल्यासारखा अगणित हारांचा गुंतवळा झालेला असतो. मुंबई इंद्रनीळाचे बेट बनते.

मुंबईतील वैभवे अशी बेहिशेबीपणे उधळलेली आहेत. खुद्द मुंबईकरांनाच त्यांतली कित्येक नीटशी ठाऊक नसतात. स्थानिक अभिमानाने आपल्या शहर गावातील क्षुल्लक गोष्टींचे उच्च रवात कीर्तन करणारी माणसे पाहिली, की मुंबईकरांना विनयशीलच म्हणावे लागेल. राजाबाई टॉवर हा कुतुबमिनारहून उंच आहे, यावर त्यांचाच विश्वास बसत नाही. आणि आता तर तो टॉवरही खुजा करून टाकणारे उंचीचे चमत्कार शहरभर वाढत आहेत !

पण मुंबईची खरी उंची तिने आजवर घडवीत आणलेल्या जीवनवृत्तीत आहे. त्या जीवनात केवढी विविधता आहे. त्याला दुरभिमानाची, क्षुद्र आत्मगौरवाची झापडे नाहीत. धर्मांच्या आणि जातींच्या सगळ्या तऱ्हा येथे आहेत. पण अमंगळ भेदाभेद नाहीत— अर्थात तसले काही रोगट जीव सोडल्यास ! जाती—पोटजातींच्या कडेकोट आळ्या बनवून आपल्या आळीपुरता गावाचा— गावाचा कशाला, महाराष्ट्राचा आणि राष्ट्राचाही—संक्षेप करणाऱ्यांना मुंबई बकाल आणि सबगोलंकारी वाटणारच. खरे सांगायचे, तर सबगोलंकार म्हणजेच एकात्मता—जिच्याविषयी आपण सदैव तोंड आणि लेखणी वाजवीत असतो, ती मुंबईइतकी महाराष्ट्रातील— कदाचित राष्ट्रातील— कोणत्याच शहराने आचरणात आणलेली नाही. मुंबईने रोटीबंदी केव्हाच तोडली. बेटीबंदी सैल होत आहे, मराठी समाजापुरती तरी.

रोटीशिवाय माणूस जगू शकत नाही, मग तुस्त अध्यात्मवादी काहीही म्हणोत. पण जितक्या निरनिराळ्या तऱ्हांची रोटी माणूस खातो, तेवढा तो अधिक चांगला जगतो. खऱ्या मुंबईकरांच्या रुचीचे कुतूहल चौरस असते, म्हणून ती घरातल्याइतकीच बाहेरही पोसली जाते. तिला पाककलेचे सगळे ढंग मानवतात. मसालेभाताइतकीच मुघलाई बिर्याणी, पारसी धानसाक, गोव्याची शितकढी, चिनी फ्राईड-राईस असल्या भाताच्या विविध अवतारांवर त्याची भक्ती असते. तेच कोंबडी, मटण, मासे यांवर होणाऱ्या विविध संस्कारांचे. मराठी समाजापुरते बोलायचे, म्हणजे परवा परवापर्यंत प्रत्येक पोटजातीने आपापली रस-रहस्ये आपल्या स्वयंपाकघरात झाकून ठेवली होती, त्यांची आता सुटका आणि प्रसार होत आहे. आता

एकाच पानात देशस्थी पुरणपोळीच्या पंगतीला कोकणस्थांचे अळू, कायस्थांचे बिरडे, पाठारे प्रभूंचे खडखडले, सारस्वतांचे मासळीचे दबदबीत ही गुण्यागोविंदाने बसू शकतात. त्याशिवाय इतर प्रांतांतील नवलाई असतातच. अन्यत्र सहसा आजोबा जे ओरपीत, तेच नातू ओरपीत असतो. आणि आपल्यासारखे इतरांना ओरपायला मिळत नाही, असला जातीचा वा जिल्ह्याचा अहंकार तो सदैव तोंडात घोळगून असतो. 'हजार पाकक्रिया' हा ग्रंथ एका मुंबईकरणीने लिहिला, आणि तोही पन्नास वर्षांपूर्वी, यात मोठा अर्थ आहे. मुंबईच्या रसनेला कोता राष्ट्राभिमानही नाही. एखाद्या देशाची राजनीती तिला अमान्य असली, तरी तिची पाकनीती तिला पसंत असू शकते. चाऊ एन् लाय मुळे चिनी जनता आमच्यापासून दुरावली असली, तरी चाऊ चाऊ मुळे तिच्याशी आंतरिक जवळीक निर्माण झाली आहे. हे रसपुराण वाढवावे तितके वाढेल.

पण मुंबईची रसिकता आहारापुरती नाही. विहाराच्या आणि कलेच्या अनेक क्षेत्रांत ती रंगते. कित्येक खेळांत मुंबई भारताच्या अग्रभागी आहे. विशेषतः, क्रिकेटमध्ये ती वर्षानुवर्षं अजिंक्य राहिली आहे. मराठी रंगभूमीचे जन्मस्थान सांगली असो, तिला आसरा मिळाला, प्रतिष्ठा मिळाली आणि तिचा विकास झाला, तो मुंबईत. तिचा इतिहासच मुळी येथे घडला, जुने जोपासले आणि नव्याचे स्वागत केले. मुंबईत इतर भाषिक रंगभूमीही आहेत. त्यांनी एकमेकांना बळ दिले. रंगभूमीप्रमाणे संगीताचीही मुंबई मायपोट ठरली आहे. सगळ्या घराण्यांना, सगळ्या ढंगांना येथे उदार आश्रय मिळतो. कडक शास्त्रीय संगीतापासून नखरेल गझल–कवाल्यापर्यंत. तिन्ही त्रिकाळ मैफली झडत असतात. आणि त्या उजळ माथ्याने. पुरुषांइतक्याच स्त्रियाही सरमिसळपणे त्या कलानंदात सामील होतात. पूर्वीप्रमाणे गाणे ऐकण्यासाठी माडीचा चोरटा आश्रय घ्यावा लागत नाही; की कसल्या धार्मिक उत्सवाची सोवळी सबब लागत नाही. आणि रुचिभिन्नतेप्रमाणे दाक्षिणात्य आणि पाश्चात्त्य संगीत ऐकण्याचीही संधी लाभते. तेच इतर कलांचे. नृत्यालाही प्रतिष्ठा आली. येथे चित्रकलेपासून पुष्परचनेपर्यंत प्रदर्शने भरतात. मुंबईच्या हौसेला सीमा नाही, आणि हौस म्हणजे पातक, असे मानण्याचा करंटेपणा तिला मंजूर नाही.

मुंबईच्या जिवंतपणाचे एक बोलके लक्षण म्हणजे तिची भाषा. आजवरचा कर्मठ प्रघात असा, की मुंबईची भाषा ही हलकी, अशुद्ध, बाटगी असे नाक उडवून म्हणायचे. आपली (म्हणजे आपल्या जाती-पोटजातीची अथवा प्रदेशाची) भाषा ही उच्च, शुद्ध, कुलीन, इत्यादी. कोणाची भाषा, म्हणे, अगदी चिपळूणकरांनी घालून दिली, तशी, कोणाची तर चक्क ज्ञानदेवापासून सरळ वारशाने चालत आलेली ! ही भाषा अर्थात पाच टक्के लोकांची —पंचाण्णव टक्क्यांच्या भाषेचे तिला सोयरसुतक नाही ! आणि भाषा अशी बासनात ठेवतो, तिचे लोणचे घालतो, तिला बाहेरचे वारे आम्ही लागू देत नाही, अशी त्यांची अडाणी प्रौढी ! मुंबईची भाषा तिच्याप्रमाणेच सळसळती आणि सदाफुली राहिली आहे. तिच्यावर भोवतालच्या जीवनाचे संस्कार होत राहिले, ती नवनव्या शब्दांनी समृद्ध होत

आहे—अपशब्दांनी सुद्धा. आजचे अपशब्द उद्याच्या कोशात येणार, हे सत्य ज्यांना ठाऊक नाही किंवा पचत नाही, ते अनाचार झाल्याचा ढोंगी आव आणतात. 'वासूनाका' आपापल्या परीने सगळीकडेच आहे. मुंबईने त्याला भाषेत जागा करून दिली.

पण हौसामौजांपलीकडेही मुंबईने खूपखूप केले. व्यासंग केला आणि राजकारण केले. काँग्रेसचा जन्मच नव्हे, तर आपल्या राजकारणातील प्रारंभीच्या चळवळी येथल्याच. कामगार चळवळीचे उगमस्थान आणि भारतीय साम्यवादाचे आद्यपीठ हेच. मुंबईइतके संप कोठे झाले नसतील, पण मुंबईइतकी सार्वजनिक शिस्त कोठे नसेल. येथे लाखांच्या सभेत कोणी चेंगरत नाही, आणि बससाठी माणसे रांगा धरतात–निदान बहुधा !

असे हे आधुनिक शहर, त्यांचे नवनवे उन्मेष फुलून येत असतात. ते चिरतरुण आहे. निधड्या बेफिकिरीने त्याने अनेक आव्हाने स्वीकारली, पार पाडली. आधुनिकता ज्यांना पचत नाही, अशा भित्र्या जीवांना तिचा दुस्वास वाटतो. कोणाला मुंबईचे प्रखर भाग्य सहन होत नाही, तिचे चैतन्य भावत नाही. तिचे एक दुर्भाग्य असे, की जे तिच्याकडे ओढले जातात, तिच्या सौन्दर्यात आणि वैभवात रमतात, त्यांच्यापैकी अनेक जण उपरतीचा आव आणून तिला बकाल, मोहमयी वगैरे नावे ठेवतात. मग त्यांना आपल्या गावाच्या आणि प्रदेशाच्या अभिमानाचे कढ येऊ लागतात. अशा सोंगाड्यांना मुंबईतून सगळे गाव सुंदर दिसतात. म्हणून मुंबई सुंदर आहे म्हणा, वाटले तर !

# खोटी पत्रे कशी लिहावी ?

खरे सांगायचे, म्हणजे या लेखाची कल्पना उचलली, ती अनुभवातून– इंग्रजीतून नव्हे ! अनुभवही अगदी ताजाच. नुकतेच माझे एक लहानसे पुस्तक प्रसिद्ध झाले. रीतभात म्हणून अनेकांना त्याच्या प्रती पाठवल्या. त्यांपैकी एक माझ्या एका जुन्या स्नेह्यांना पाठवली. ते मोठे रसिक आहेत– साहित्याचे बारकावे जाणणारे; आणि शिवाय प्रामाणिक. त्यांचा अभिप्राय कळण्यासाठी मी आतुर होतो. पण महिना– दीड महिना लोटला, तरी त्यांनी काही कळवले नाही. दिवसगतीने अधिकाधिक खट्टू होत होतो. तशी इतरांची स्तुति–पत्रे इतकी आली, की टेक दिल्याशिवाय त्यांची चवड उभी राहीना. पोस्टकार्डावरील घाईच्या पाठथोपटीपासून तो चार पाठपोट तावांच्या कष्टाळू रसग्रहणापर्यंत तऱ्हातऱ्हा त्यांत होत्या. गौरवाची झाडून सारी विशेषणे हजेरी लावून गेली. लहान, मोठी; जुनी, नवी; टणक, फोपशी; बाळबोध मराठी आणि दुर्बोध संस्कृत– म्हणजे इंग्रजीतून भाषांतर केलेली; कधीकधी तर चक्क इंग्रजी ! त्यांचे तात्पर्य हेच, की असला ग्रंथ कित्येक वर्षांत, अथवा शतकांत, अथवा आजवर, जाहला नाही ! ते मला आवडले किंवा पटले नाही, असे नव्हे. पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वीच, किंबहुना ते लिहिण्यापूर्वीच, ते मला पटले होते– बहुतेक साहित्यिकांप्रमाणे ! आणि त्यांच्याप्रमाणेच इतरांनी तसे म्हणून दाखवणे आवडलेही. पण त्या रसिक ( आणि प्रामाणिक ) स्नेह्यांनी बरे म्हटले असते, तर अगदी हात पोचले असते. पण त्यांचे पत्रच नव्हते. साधी पोचदेखील दिली नाही गृहस्थाने.

—आणि परवाच त्यांची अकस्मात रस्त्यात गाठ पडली. नमस्कार–चमत्कार पार पडेपर्यंत मी अर्धवट भीतीने आणि अर्धवट लाजत त्यांना पुस्तकाविषयी विचारण्याच्या घाईला आलो.

" अहो, माझं पुस्तक मिळालं ना ? "

" हो ! मिळालं, तर ! केव्हाच ! "

" मग आपलं मत नाही कळवलंत ? " पडलेल्या आवाजाने मी विचारले.

" अगदी खरं सांगू तुम्हांला ? " त्यांनी संथपणे सुरुवात केली. आणि मी खचलो. " तुम्हांला पत्रानं तसं काही कळवलं नाही, कारण– " येथे पुन्हा एक दीर्घ विराम त्यांनी घेतला– तंबाखूची रेखीव पिंक टाकायला. तोपर्यंत माझा आतल्या आत चोथा होऊन गेला होता. शिवाय त्यांच्या बोलण्याची लय एवढ्या विलंपतीची होती, की गृहस्थ आताच मैलाची शर्यत धावून आला आहे, जणू काही !

" कारण, अगदी खरंखुरं कारण, म्हणजे मला तुमचं पुस्तक फार फार आवडलं—इतकं, की मी ते पुन्हा पुन्हा वाचलं. "

" आँ ? "

" हो ! म्हणूनच पत्र लिहिलं नाही. खोटं वाटायचं लिहिणं तुम्हांला ! "

ही अढी पत्रलेखनाविषयी, की सर्वच लेखनाविषयी ?– म्हणजे आपण ज्याला साहित्य म्हणतो, तसल्या मयसृष्टी निर्माण करणाऱ्या ललित लेखनाविषयी. असत्याचे नसते करणारे ते तत्त्वज्ञान आणि नसत्याचे असते करणारे ते लालित्य. दुसरे फसवे, मायावी; म्हणून त्यापासून सावधान, असा इशारा दोन पिढ्यांपूर्वीची वडील ( आणि विद्वान ) माणसे देत असत. गेली ती माणसे. आजची स्वतःच लालित्य करतात– लिखाणात. म्हातारपणी अधिक चेकाळून आणि चेव येऊन कादंबऱ्या लिहितात. आणि त्या कितव्या, हे प्रौढीने, आणि कधी समारंभानेही सांगतात. असो. आपल्या एका प्रसिद्ध कादंबरीकाराने तरुण वयातच साहित्य–संन्यास घेतला. ' ते सगळे खोटे ' असा एक दिवशी त्यांना साक्षात्कार घडला, आणि तेव्हापासून ते केवळ भगवे लिहू लागले. ( वस्तुतः त्यांना प्रसिद्धी मिळाली होती, ती मुख्यतः ' समाजाला अधोगतीला नेणाऱ्या ' कादंबऱ्या लिहिल्याबद्दल त्या काळच्या भगव्यांनी त्यांचा निषेध केल्यामुळे ! ) पण युगधर्म म्हणा किंवा पिंडाचा गुण म्हणा, आज अध्यात्मावर लिहितानाही त्यांच्या भाषेला कादंबरीची डूब येते !

पण पत्रलेखनाचे काय ? ते ललितसाहित्यात मोडते का ? फडक्यांचे ' प्रतिभा–साधन' आणि तत्सम साहित्य–वाटाड्यांत ते प्रकरण असल्याचे आठवत नाही. तिकडचीही (म्हणजे इंग्रजीत ) तशी रीत नाही. तिकडे पत्रलेखनावर पुस्तके असतात, ती औपचारिक, नैमित्तिक, कामचलाऊ पत्रव्यवहाराविषयी. त्यांत कलाबिला नाही. पण आपल्याकडे या पंधरावीस वर्षांत साहित्यिक धर्माचे पत्रलेखन बरेच झाले–म्हणजे प्रसिद्ध झाले. ते प्रसिद्धी-

साठीच लिहिले होते, म्हणून त्याला साहित्यिक रंग आला असावा. अर्थात, अपवाद सोडल्यास. कोणी तुरुंगातून, प्रवासातून, कोणी आणखी कोठून. कोणी मुलांना, कोणी स्वपत्नीला, कोणी शिष्यांना. बहुतेक पत्रे उपदेशाची. इतकेच, की जुन्या काळाप्रमाणे तो कोरडा, उग्र, जरब दाखविणारा उपदेश नव्हे, तर नव्या काळाला शोभेलसा मवाळ, खेळकर, पाठीवर हात फिरवणारा. पण उपदेशच. आणि तो कसल्याही निमित्ताला टेकलेला. असली पत्रे खोटी कशी लिहावी, हे सांगणे अनावश्यक आहे. ती खरी कशी लिहावी, हे सांगायला फार आटापिटा करावा लागेल– आणि शेवटी तो व्यर्थ जाईल! अशी ही प्रसिद्धीसाठी लिहिलेली खाजगी पत्रे.

पत्रे खरी असतात, म्हणजे काल्पनिक नसतात, असा समज असतो; म्हणून ती खोटी असतात, तेव्हा फार खोटी असतात. ( दुसऱ्याने लिहिलेले ) पत्र खोटे ठरले, की आपल्याला कसा सात्त्विक संताप येतो! आपली नीती कशी फणा काढून उठते! अर्थात ते योग्यच– नीतीच्या प्रकृतीच्या दृष्टीने, नाहीतर मरगळून जाईल ती; नेभळट होईल.

पण सर्वच पत्रे अगदी खरी लिहायची, जे मनात, ते पत्रांत, असे व्रत घेतले, तर काय अनर्थ होतील, याचाही विचार हवा. सत्याचे प्रयोग करून चिमणराव तोंडघशी पडला, बायाबापड्याही त्याला हसल्या, आजवर हसत आल्या; पण ते तोंडी प्रयोग. मागे पुरावा नाही, कोर्टकचेरीला वाव नाही. काय रागद्वेष उफाळले असतील, ते चार दिवसांनी निवले. अपशब्द कसा, तोंडातल्या वाफेबरोबर गरमागरम बाहेर पडला, की चरचरीत डाग देतो, पण पुढे खूणसुद्धा उरत नाही. पण तोच शाईत कोरला, की अमर होतो, बासनात जाऊन बसतो. ते रागद्वेष वारशाने पसरतात. कुटुंबांत आणि घराण्यांत ते लोणच्यासारखे सोवळ्यात जतन करून ठेवतात. एकूण, वाईट ( म्हणजे सत्य ) बोलणे जरा गैरसोयीचे, पण लिहिणे फार धोक्याचे. चिमणरावाने लेखी सत्याचे प्रयोग केले असते, तर त्याचे काय झाले असते, या विचाराने अंगावर काटा उभा राहतो!

अगदी या वसंत ऋतूला योग्य असे उदाहरण घेऊ या. हवेसे वाटणारे पत्र आले, असे म्हणून मोठ्या आशेने पोस्टमनला सामोरे जावे, तर तो हाती देतो लग्नपत्रिका. थोड्याफार फरकाने त्या एकसारख्याच असतात. उधळायला पैसा असला, तर रंगाचे फराटे अधिक किंवा अधिक सचित्र. वधूवरांची बटबटीत नावेच काय ती निराळी, आणि आपल्या कृपाभिलाषींची. कोणीतरी **विश्वकुमार S. T. C.** आणि चि. सौ. कां. **भीमाबाला** साहित्यस्नातक ( हिंदी )– म्हणजेच बोडसांचा विश्या आणि रिसबुडांची भीमी यांचा कोठे परगावी संसार–सामना सुरू व्हायचा असतो. नाव वाचताच तुम्ही सहजोद्गार काढता,

"म्हसोबाला नाही बायको आणि सटवाईला नाही नवरा!"

कोणी पुस्ती जोडते,

"तो वेडबंबू आणि ती ढालगज!"

आणखी कोणी,

" कसं व्हायचं त्याचं ? लग्नाआधीच ती अशी तोंडाळ! मग हक्काचा मिळाल्यावर त्याला कच्चा खाईल ! "

—याच सुरात त्यांच्या भावी संसारसुखाचे एकमुखाने शुभभविष्य वर्तविले जाते. तुमच्या जागी चिमणराव असता, तर त्याने विश्याला त्या प्रसंगीच हातात पडेल, अशा बेताने मनमोकळे पत्र लिहिले असते :

' चि. विसू यास अनेक आशीर्वाद, वि. वि.

तुझ्या विवाहाचे आमंत्रण वाचून आम्हां सर्वांना फार दुःख झाले. आजवर तुझे लग्न कसे होणार, याची चिंता समस्तांस लागून राहिली होती. यापुढे तुझे या लग्नामुळे कसे होणार, याची चिंता लागणार. ती अधिक घोर असेल, हे लिहिणे नलगे. रिसबुडांच्या भीमीसारख्या अडाणी, आचरट आणि आक्रस्ताळ्या स्त्रीबरोबर संसार करण्यापेक्षा घरासमोरील विजेच्या खांबावर उलटा टांगून घेण्याने तुला बहुशः अधिक सुख मिळाले असते. असो. ईश्वरेच्छा बलीयसी. दैवात आहे, ते चुकत नाही. तेव्हा या अमंगल प्रसंगी हीच आशा व्यक्त करावयाची, की अक्कलहुशारीने वागून तू शक्य तेवढा हातीपायी सुरक्षित राहशील.

हेच पत्री वडीलमंडळीस दंडवत आणि लहानांस आशीर्वाद.

वधूला हे पत्र हयगय न करता दाखवशीलच !

कळावे, लोभ असावा, ही विज्ञापना.

आपला,

चिमणराव जोग '

पण तुमच्यासारखा शहाणासुर्ता माणूस असे लिहिणार नाही. तुम्ही लिहाल :

' चि. विश्वकुमार यास सप्रेम आशीर्वाद.

तुझ्या विवाहाची निमंत्रणपत्रिका पाहून आम्हां सर्वांना इतका आनंद झाला, की त्याचे शब्दांत वर्णन करणे अशक्य. या मंगलप्रसंगी जातीने हजर राहून त्या सोहळ्यात सहभागी व्हावे, अशी येथे प्रत्येकाची उत्कट इच्छा आहे. पण त्याच वेळी सौभाग्यवतीच्या चुलत आतेबहिणीच्या ( किंवा अशाच कोणाच्यातरी ) पहिल्याच मुलाचा नामकरणविधी येथे होणार असल्यामुळे ( किंवा अशाच काही काल्पनिक कारणामुळे ) आम्हांला तेथे येणे शक्य होणार नाही, याचे राहूनराहून वाईट वाटत आहे. पण देहाने नसलो, तरी मनाने आम्ही सर्वजण तेथे आहोत, हे लिहिणे नकोच ! ( अशीच आणखी दोन-तीन पोकळ वाक्ये भरावीत. म्हणजे पत्राला वजनही येते. )

चि. भीमाबाला रिसबूड ही तुझी सहधर्मचारिणी होणार, हे वाचून तर आनंदात आणखी भर पडली. तुझा शांत, गोड स्वभाव आणि तिची तडफ आणि कर्तृत्व यांचा

विचार करता हा दुग्धशर्करायोग आहे, असे कोणीही म्हणेल. असल्या अनुरूप वधूवरांचे वैवाहिक जीवन इतरांना आदर्शवत होईल, असा आम्हां सर्वांना विश्वास वाटत आहे. असो.

तुमचा संसार सफळ आणि सुमधुर होवो, हीच या शुभप्रसंगी त्या जगन्नियंत्यापाशी आमची मनःपूर्वक प्रार्थना आहे.

कळावे, इत्यादी.

आपला,
तुम्ही '

वर शुभेच्छेची सवलतीच्या दराची तारही ठोकावी, म्हणजे खुंटा बळकट होईल.

यालाच व्यवहारज्ञान म्हणतात. विसूचे काय व्हायचे, ते होणारच; चुकत नाही. पण तुम्ही उद्या त्याच्या घरी गेलात, तरी सौ. भीमाताई तुमच्यासाठी बरेवाईट चहापोहे बहुतेक करतील. तुमच्याबरोबर त्यालाही मिळतील. चिमणराव गेल्यास मात्र त्याचे त्या काय करतील, याची आपल्याला कल्पना करवत नाही!

व्यवहाराच्या इतर काही क्षेत्रांत हे ज्ञान कसे उपयोगात आणावे, याचे थोडक्यात पण सोदाहरण विवरण पुढे करीत आहे.

### कोणी परीक्षेत उत्तीर्ण झाला, म्हणून लिहावयाचे पत्र :

पत्रनायक मठ्ठ असून त्याने पूर्वी दोन-तीन हापट्या खाल्ल्या, हे विसरावे. परीक्षकांकडे खेटे घालून व तशाच आणखी बुऱ्या मार्गांनीच तो परीक्षेतून सुटला असणार, ही सार्वत्रिक खात्री मनात येऊ देऊ नये. त्याचे भरल्या लेखणीने अभिनंदन करावे :

' सप्रेम आशीर्वाद वगैरे.

परीक्षेतील तुझ्या यशाची अपेक्षित सुवार्ता वृत्तपत्रात वाचून ( म्हणजे नंबर पाहून ) आम्हांला धन्य झाले. तुझ्या बुद्धीच्या कर्तबगारीने कुळाची प्रतिष्ठा वाढली. या आनंदाच्या प्रसंगी कै.XXX आणिXXX (कोणीही मृत आप्तांची नावे टाकावीत ) हयात नाहीत, हे केवढे बरे दुर्दैव! त्यांना काय वाटले असते, हे कोण बरे सांगू शकणार?

आमचे मनःपूर्वक अभिनंदन स्वीकारशीलच. यापुढील शैक्षणिक जीवनक्रमात उत्तरोत्तर याहून अधिकाधिक उज्ज्वल यश तुला मिळून तुझ्या बुद्धीचे तेज फाकत राहो, ही आमची शुभेच्छाही स्वीकारावी. '

येथेही अभिनंदनाची ( सवलतीच्या दराची ) तार हाणावी! ' अधिकस्याधिकं फलम् ' असे संस्कृतातच म्हटले गेले आहे.

**कोणाच्या पुस्तकाला पारितोषिक मिळाले, म्हणून लिहावयाचे पत्र :**

वरीलप्रमाणे हेही यश वशिल्यानेच प्राप्त झालेले, पुस्तकाच्या गुणापेक्षा जात–पोटजात आणि/अथवा प्रदेश यांच्या पुण्याईवर दिले गेलेले या वदंतीवर, आणि पुस्तक व लेखक उभयताही क्षुद्र आहेत, यावर तुमचा संपूर्ण विश्वास असला, तरी असे लिहावयाचे असते :

' प्रिय अण्णासाहेब, ( हा अण्णा–आप्पाचा घरगुती ओलावा अवश्य आहे. )

तुम्हांला मिळालेल्या बहुमानाबद्दल तुमचे हार्दिक अभिनंदन करतो. वस्तुतः तुमच्या ग्रंथाचे मोठेपण इतके स्वयंसिद्ध आहे, की त्याला मान्यता देऊन परीक्षकांनी स्वतःचाच गौरव करून घेतला आहे, हे निर्विवाद. तुमच्या कलात्मक पातळीवर ते पोचू शकले, हे त्यांचे भाग्य.

मी तुमचे पुस्तक प्रथम वाचले, तेव्हा त्याने भारावून गेलो; त्याची पुन्हापुन्हा पारायणे केली. तेव्हाच मी तात्या ( किंवा काका ) साहेबांना म्हटलेही, की यंदाचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ हा; यंदाचाचा नव्हे, तर अनेक वर्षांत इतके विचारघन, भावभरित, तंत्रशुद्ध ( यांपैकी कोणतीही दोन विशेषणे वापरावीत; तिन्ही नकोत. बरी दिसणार नाहीत ) लेखन वाचले नव्हते. त्यात टॉल्स्टॉयचा आवाका आणि बर्नार्ड शॉचा भेदकपणा, शिलरची उत्कटता आणि मिलरची वास्तवता ( अशी आणखी एखादी जोडी घालणे, पण ती परदेशी हवी ) यांचा प्रत्यय येतो. मराठीतील या वाङ्मयप्रकाराला तुमच्या समर्थ लेखणीने एक आगळेच वळण लावले, असे साहित्याचे भावी इतिहासकार कृतज्ञतेने कबूल करतील. आशय आणि आकृती यांचे सामरस्य याच्या अल्पांशानेदेखील मराठी साहित्यात आले, तर ' अमृतातेंहि पैजा जिंकण्या'चा ज्ञानदेवाचा मंगल मानस आपल्या मायबोलीकरवी सफळ होईल. ( असलाच परंपरेविषयी वगैरे मसाला भरावा. )

तुमच्या साहित्यिक जीवनात असेच चढतेवाढते यश तुम्हांला प्राप्त होवो. खरे म्हणजे महाराष्ट्र साहित्य–संमेलनाचे अध्यक्षपद तुम्हांला मिळावयाला हवे, अशी तुमची प्रतिभा आणि तपश्चर्या आहे. पण तो मान नेहमीच लायकीमुळे दिला जात नाही, हे दुर्दैव. असो. पण आमच्या जिल्हा वाङ्मय–परिषदेतर्फे आपला सत्कार आणि आपल्या साहित्यावर परि-संवाद घडविण्याची मी खटपट करीत आहे.

असाच लोभ राहावा, ही विनंती. '

यातील शब्दन् शब्द अगदी खणखणीत खोटा वाजतो, असे तुम्ही म्हणाल; पण हे बोलूनचालून एका साहित्यिकाने दुसऱ्या साहित्यिकाला लिहिलेले पत्र आहे. ते शोभले पाहिजे. यातील विशेष असा, की अण्णासाहेबांना ते खोटे आहे, हे छान माहीत असते. पण तसे लिहावे लागते, हेही त्यांना माहीत असते. उद्या तेही बाबासाहेबांना तसेच लिहितील.

**कोणाचे तरी निधन झाले, म्हणून (दुसऱ्या कोणास) लिहावयाचे—म्हणजेच शोक-प्रदर्शक पत्र :**

हा फार गंभीर उपचार आहे. म्हणून तो शब्दशः घ्यावयाचा नसतो. पण याचे खोटे-पण इतरांहून जरा कमी. कारण ( १ ) असले पत्र सहसा लांबीने लहान असते, आणि ( २ ) यातील भावना सर्वसाधारण म्हणजे मोघम असते – मृत्यू आणि मानव यांचा संबंध वगैरे.

समजा ' अ 'चे वडील वारले. त्यांची वागणूक अशी होती, की ' अ ' ला आणि इतर नातेवाइकांना ' सुटलो ' असेच वाटले असणार. ' अ ' ला त्यांचा पूर्ण तिटकारा होता; आणि एकुलता एक मुलगा म्हणून त्याच्याकडे खूपशी मालमत्ताही आली, आजवरची ओढाताणही थांबली. पण त्याला पत्र असेच लिहावयाचे :

' प्रिय ' अ ',

तुझ्या पूज्य पित्याच्या ( किंवा बाबांच्या ) निधनाचे आकस्मिक वृत्त ऐकून ( वस्तुतः ते पाच-सहा महिने दुर्धर रोगाने अंथरुणाला खिळून होते ! ) आम्हांला मोठा धक्का बसला. तुम्हां सर्वांवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला आहे. पण जगरहाटीकडे लक्ष देऊन ( अथवा ' मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ' हे स्मरून ) दुःख आवरणे आणि इतरांना धीर देणे हे तुझे कर्तव्य आहे. तुमच्या कुटुंबावरील मायेचे छत्र नाहीसे झाले आहे; त्याचा आधार नष्ट झाला आहे. मृतांचे गुण आठवले, की आम्हांलाही असह्य दुःख होते, मग तुमचे काय झाले असणार, या विचाराने तर जिवाचे पाणीपाणी होते. कवि बसवंत म्हणतात, त्याप्रमाणे ' आता मला न बाबा ' असा पोरकेपणाचा आक्रोश तू करशील. पण ईश्वरेच्छा मानून, राहिले त्यातच सुख मानून घ्यावे, व कैलासवासी बाबांच्या पवित्र स्मृतीस सदैव पुजावे.

अधिक काय लिहिणार ! '

हे केवळ मासले. व्यवहारात उद्‌भवणाऱ्या सर्व प्रसंगांना उचित अशी नमुनेदार खोटी पत्रे लिहावयाची, म्हणजे ग्रंथ होईल. ( तो यथावकाश आम्ही लिहूच. ) पण सुज्ञ वाचकांस वर दिलेल्या पत्रांत योग्य ते फेरफार करून निरनिराळ्या प्रसंगी ती वापरता येतील. उदाहरणार्थ, लग्नाप्रमाणेच मुंजीचे. अर्थात अशी पत्रे लिहिताना मुंजीला मुंज म्हणावयाचे नसते; उपनयन, व्रतबंध, निदान मौंजीबंधन म्हणावे. एरव्ही वापरात नसणाऱ्या असल्या ठेवणीतील शब्दांनी सांस्कृतिक प्रतिष्ठा येते. हेच सर्व पत्रांबाबत खरे आहे, हे दिसेलच. साध्या शब्दांत सफाईने खोटे लिहिता येत नाही. असो. पत्राच्या विषयानुरूप शब्द आणावेत. उदाहरणार्थ, ' बटू ' ला लिहिताना ब्रह्मचर्य, शीलसंपन्नता, विद्याव्यासंग असली कलमे हवीत. त्याच्या कुळाचा आणि पित्याचा उच्च आदर्श त्याच्यापुढे धरावा. मग त्याचे कुळ कसेही असो आणि त्याच्या पित्याचे वर्तन कितीही अधम असो !

थोडक्यात, काहीही असो, अशी पत्रे लिहावीत, की ती खरी असणे शक्य नाही, अशी शंका येऊनही वाचणारा क्षणभर गार झाला पाहिजे. जन्मोजन्मीचे ऋणानुबंध असावेत, असा भास निर्माण व्हायला हवा. ('ऋणानुबंध' हा शब्द वेळोवेळी वापरावा.)

हे सगळे सरावाने, पण सहजपणे करता येऊ लागले, की तुम्हांला सज्जन म्हणतील!

पण प्रेमपत्रांचे काय? पत्रलेखनाचा तो लोकप्रिय आणि रोमांचकारक प्रकार शेवटचा वास म्हणून मी राखून ठेवला, असा तुमचा अंदाज असणार. तसे नाही. प्रेमपत्रात खऱ्या-खोट्याच्या विचारालाच जागा नसते— लिहिणाऱ्याबाबत आणि ज्याला (अथवा जिला) लिहिले, त्याबाबतही. आणि, खरे प्रेमपत्र पाहिले आहे का कुणी?

REFBK-0024570